CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, १ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २४१ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपले लक्ष्य प्राप्त करायचे असेल तर संघटित कार्यशक्ती आवश्यक आहे. कोणताही चमत्कार किंवा ऐतिहासिक कारणांनी विजय मिळावा, हे आम्हाला अपेक्षित नाही. हे कार्य भारत धर्म तथा संस्कृतीचे रक्षण करून करायचे आहे. हे राष्ट्र परम वैभवाला जावे ही आपली आकांक्षा आहे. आपले राष्ट्र सामर्थ्यशाली आणि समृद्ध झाले पाहिजे. थोडक्यात, 'भारत माता की जय'चा जयघोष व्हावा, याकरिता आपल्याला कार्य करायचे आहे.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# एमपीएससी राज्यसेवा परीक्षेत सोलापूरचा डंका

## मोहाळचे विजय लामकाने राज्यात पहिले तर सांगोल्याचे डॉ. हिमालय घोरपडे दुसरे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ | सांगोला, दि. ३१ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी घोषित करण्यात आला असून कोन्हेरी (ता. मोहोळ) चे सुपुत्र विजय नागनाथ लामकाने यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात पुनर्वसन तहसीलदार म्हणून कार्यरत असणारे मूळचे मळोली (ता. माळशिरस) येथील व सध्या सांगोला येथील रहिवासी डॉ.हिमालय घोरपडे यांनी राज्यात दुसरा क्रमांक पटकावला.

मोहोळचे विजय लामकाने यांचे प्राथमिक शिक्षणमोहोळ तालुक्यातील कोन्हेरी येथील



**विजय लामकाने**



**डॉ.हिमालय घोरपडे**

जिल्हा परिषद शाळेत झाले. ७ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सुद्धा त्यांनी राज्यात ४ था क्रमांक पटकावला होता. आठवी ते दहावी शिक्षण नागनाथ विद्यालय मोहोळ येथे झाले.अकरावी बारावीचे शिक्षण एडीजोशी महाविद्यालय सोलापूर येथे झाले आणि बीएससी पर्यंत शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले.२०२१ म ध्येबीएससी पूर्ण केल्यानंतर त्यांनी सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर या परीक्षा दिली. तिथे सन २०२२ त्यांची निवड झाली.त्यानंतर २०२३ मध्ये त्याने गटविकास अधिकारी ही परीक्षा उत्तीर्ण केली आणि त्याचे ट्रेनिंग सध्या सुरू आहे.

याच दरम्यान सन २०२४ मध्ये परत त्यांनी एम पी एस सी ची परीक्षा दिली त्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी लागला असून डेप्युटी कलेक्टर या पदासाठी त्यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.त्यांच्या कुटुंबात त्यांचे वडील आई आणि बहीण असा परिवार आहे. शेती करणाऱ्या त्यांच्या वडिलांनी सातत्याने मुलाच्या शिक्षणासाठी मुलाची पाठराखण केली.आणि मुलगा विजयने त्यांच्या प्रयत्नांचे चीज केले आणि ही निवड झाली.हा निकाल लागल्यानंतर गावात आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

**तहसीलदार डॉ. हिमालय यांचेही कौतुक**

अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.डॉ.बाळकृष्ण घोरपडे व सांगोला येथील वामनराव शिंदे विद्यालयाच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुवर्णप्रभा घोरपडे यांचे ते चिरंजीव आहेत. डॉ. हिमालय घोरपडे यांचे प्राथमिक शिक्षण सांगोला येथे, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद सायन्स कॉलेज, कोल्हापूर येथे तर मुंबईतील नायर हॉस्पिटल सेंटर येथे एमबीबीएस पदवी प्राप्त केली. सन २०१९ मध्ये त्यांनी प्रथमच एमपीएससी परीक्षेत यश संपादन करून तहसीलदार पद मिळवले. यशदा, पुणे येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी हिंगोली येथे पर्यवेक्षाधीन तहसीलदार म्हणून सेवा दिली.

त्यानंतर सन २०२२ ते २४ या कालावधीत अप्पर तहसीलदार म्हणून कार्यरत राहून उल्लेखनीय प्रशासनिक कामगिरी बजावली. सध्या ते २०२४ पासून अहील्यानगर येथे पुनर्वसन तहसीलदार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. डॉ.हिमालय घोरपडे यांच्या या यशाबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# देशाच्या एकता-अखंडतेला घुसखोरांचे मोठे आव्हान

## अवैध निर्वासितांमुळे बिघडतेय लोकसंख्येचे संतुलन : पंतप्रधान मोदी

**◆ एकता नगर (गुजरात), ३१ ऑक्टोबर**

अनेक दशकांपासून घुसखोरी होत असल्याने देशाची अखंडता आणि एकतेसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे तसेच अंतर्गत सुरक्षाही धोक्यात आली आहे. देशाच्या अनेक भागात अवैध निर्वासितांमुळे लोकसंख्येचे संतुलन बिघडत आहे. त्यामुळे देशात एकही घुसखोर राहता कामा नये, असे स्पष्ट प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता नगर येथे आयोजित 'राष्ट्रीय एकता दिवस परेड' निमित्त ते बोलत होते.

देशाने घुसखोरांविरोधात निर्णायक लढा सुरू केला आहे. गेल्या अनेक दशकापांसून घुसखोर देशात प्रवेश करीत आहेत. त्यांनी देशाची एकता आणि अंतर्गत सुरक्षेसमोर आव्हान उभे केले आहे तसेच लोकसंख्येचे संतुलन घुसखोरांमुळे बिघडत आहे. त्यामुळे प्रत्येक घुसखोर देशाबाहेर काढला जाईल. प्रत्येक नागरिकाने या घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी निर्धार करावा, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले. देशातील अन्य संस्थानांप्रमाणे संपूर्ण जम्मू-काश्मीरचे भारतात विलीनीकरण व्हावे, असे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना वाटत होते, पण याला तेव्हाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विरोध केला, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार पटेल यांनी देशातील संस्थाने भारतात सामील केली. संपूर्ण काश्मीरही भारतात सामील व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. पण, पंडित नेहरूंनी ती पूर्ण होऊ दिली नाही. काश्मीरचे विभाजन करण्यात आले आणि काश्मीरला स्वतःचा ध्वज आणि घटना मंजूर केली. काँग्रेस पक्षाने केलेल्या चुकीचे परिणाम दशकांपासून देश भोगत आहे. इतिहास लिहिण्यापेक्षा इतिहास घडविण्यावर सरदार पटेलांचा विश्वास होता, असा टोलाही त्यांनी लगावला.

पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' समोर निघालेल्या परेडमध्ये बीएसएफ, सीआयएसएफ, सीआरपीएफ आणि एसएसबी या निमलष्करी दलांसह विविध राज्यांमधील पोलिस दलाच्या तुकड्या सहभागी झाल्या होत्या. ◀(वृत्तसंस्था)




'स्टॅच्यू ऑफ युनिटी'समोर पथसंचलन करताना पोलिस आणि निमलष्करी दलाचे जवान

### 'ऑपरेशन सिंदूर'मधील वीर परेडमध्ये सहभागी

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पराक्रम गाजविलेले आणि शौर्यपदक जिंकलेले सीमा सुरक्षा दलाचे १६ जवान परेडमध्ये सहभागी झाले होते. याशिवाय देशी प्रजातीच्या श्वानांचाही सहभाग होता. मुधोळ आणि रामपूर प्रजातीच्या श्वानांनी याप्रसंगी कौशल्याचे प्रदर्शन केले. ■

### भाषणातील महत्त्वाचे मुद्दे



- काँग्रेसने राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही त्रास दिला.
- ज्यांना देशाचे विभाजन पुन्हा व्हावे, असे वाटत आहे त्यांचा घुसखोरांना पाठिंबा
- घुसखोरांकडून स्थानिकांच्या नोकऱ्यांवर गंडांतर; संसाधनाची लूट
- यापूर्वीच्या सरकारांचे मतांसाठी घुसखोरीकडे दुर्लक्ष
- प्रथमच घुसखोरीविरोधात निर्णायक लढाईला सुरुवात
- घुसखोरीला गंभीरतेने घेण्याऐवजी काही पक्षांकडून राजकीय फायद्यासाठी संरक्षण देण्याचे प्रयत्न
- मुद्दा गंभीर झाल्यास त्याचा सर्वांनाच धोका
- माओवादाचा समूळ नायनाट होईपर्यंत थांबणार नाही
- सरदार पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयप्रकाश नारायण यांच्याकडे काँग्रेसचे दुर्लक्ष
- 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीतातील काही भाग धर्माच्या आधारावर गाळला
- अनेक भाषा ह्या भारतीय एकतेचा स्तंभ ■

# दिव्यांगत्व आल्यास कर्मचाऱ्यांना सेवेतून काढता येणार नाही

## शासनाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित

**◆ मुंबई, ३१ ऑक्टोबर**

शासकीय सेवेत कार्यरत असताना दिव्यांगत्व प्राप्त झाल्यास कर्मचाऱ्याला आता सेवेतून काढता येणार नाही किंवा त्याच्या पदाचा दर्जा कमी करता येणार नाही. जर कर्मचारी सध्याच्या पदावर कार्य करण्यास असमर्थ असेल, तर त्याला समान वेतनश्रेणीतील दुसऱ्या योग्य पदावर पदस्थापित करणार. तसेच कोणत्याही पदावर समायोजन शक्य नसल्यास, तो योग्य पद मिळेपर्यंत किंवा सेवानिवृत्तीपर्यंत अधिसंख्य पदावर पदस्थापना करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे तसेच स्वायत्त संस्थांमधील सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे आणि नोकरीतील सुरक्षिततेचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने या कर्मचाऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २० (४) नुसार अधिसंख्य पद निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)


### कर्मचाऱ्यांचे समायोजन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार

अधिसंख्य पदांची निर्मिती करताना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमातील कलम ३३ नुसार दिव्यांगांसाठी राखीव पदांच्या तरतुदींचा आधार घेण्यात येईल. अशा पदांसाठी सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची प्रशासकीय व अर्थसंकल्पीय मंजुरी आवश्यक असेल. सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त कर्मचाऱ्यांचे समायोजन सध्याच्या किंवा अन्य योग्य पदावर करण्याबाबत नियुक्त प्राधिकारी वैद्यकीय मंडळ किंवा दिव्यांग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार निर्णय घेण्यात येईल, असे मुंढे म्हणाले. ■

# महिला डॉक्टर आत्महत्येच्या तपासासाठी एसआयटी गठित

**मुंबई :** फलटणच्या महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास आता एसआयटीकडून करण्यात येणार आहे. या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांना दिले. आत्महत्येचा तपास महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात करण्यात येणार आहे. फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयातील एका महिला डॉक्टरने आत्महत्या केली होती. या प्रकरणात तिने हातावर सुसाईड नोट लिहिल्याचे समोर आले. ■

## महत्त्वाचे



### महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखला अटक

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि 'महाराष्ट्र केसरी' विजेता पैलवान सिकंदर शेख याला पंजाब पोलिसांनी अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात अटक केली आहे. प्राथमिक तपासानुसार सिकंदरचा या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचा आरोप आहे. राजस्थानमधील पपला गुर्जर टोळीशी त्याचे संबंध असल्याचे पोलीस तपासातून समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. सिकंदरच्या अटकेमुळे महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.'खोट्या गुन्ह्यात आमच्या मुलाला अडकवले जात आहे,' असा दावा सिकंदर शेखच्या कुटुंबाने केला आहे. दरम्यान, एकीकडे कुस्तीत मिळालेले यश आणि दुसरीकडे अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात अटक यामुळे सिकंदर शेखच्या नावाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. या अटकेनंतर कुस्ती क्षेत्रातील अनेक दिग्गजांकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. पंजाब पोलीस लवकरच या प्रकरणाची अधिक माहिती उघड करतील, अशी शक्यता आहे. पुणे येथे झालेल्या 'महाराष्ट्र केसरी २०२३' स्पर्धेच्या माती गटातील अंतिम लढतीत पंचांच्या वादग्रस्त निर्णयामुळे सिकंदर शेख चर्चेत आला होता. या निर्णयावर सोशल मीडियावर मोठे ट्रोलिंग झाले होते.

### टांझानियात हिंसक आंदोलनात ७०० जणांचा मृत्यू

**दोदोमा :** देशभरात तीन दिवसांपासून सुरू असलेल्या निवडणुकीतील गैरप्रकारांच्या विरोधातील हिंसक आंदोलनात सुमारे ७०० लोकांचा मृत्यू झाला आहे, असा दावा टांझानियाच्या चाडेमा या प्रमुख विरोधी पक्षाने केला आहे. चाडेमा पक्षाचे प्रवक्ते जॉन किटोका यांनी शुक्रवारी सांगितले की, देशभरातून मिळालेल्या आकडेवारीनुसार एकूण ७०० जणांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर टांझानियात देशभर आंदोलने सुरू झालीत. आंदोलकांचा आरोप आहे की, अध्यक्ष सामिया सुलुहू हसन आणि त्यांच्या सत्ताधारी चामा चा मापिंडुझी पक्षाने निवडणुकीत गैरप्रकार केला आहे. ■

### दहावी, बारावी परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा १०, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या बारावी, दहावीच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. आता अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर माहिती-तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत घेतली जाणार आहे.

# अमेरिका-भारत यांच्यात संरक्षण करार

### संरक्षण सहकार्य आराखड्यावर सहमती

**◆ वॉशिंग्टन, ३१ ऑक्टोबर**

भारत आणि अमेरिकेमध्ये वॉशिंग्टन येथे शुक्रवारी १० वर्षांचा संरक्षण करार झाला असून भारताचे संक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे दोन्ही देशात लष्करी सराव, प्रशिक्षणासाठी सैन्याला मदत आणि सुरक्षासंदर्भातील गोपनीय माहितीची देवाणघेवाण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर, अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले, की माझी भारताच्या संरक्षण मंत्र्यांसोबत बैठक झाली. संरक्षणविषयक अनेक मुद्यांवर चर्चा केल्यानंतर आम्ही संरक्षण करारावर स्वाक्षरी केली.

भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण करारामुळे प्रादेशिक स्थिरता मजबूत होईल. माहितीची देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्य, एकत्र लष्करी सराव करणे यासारखे मुद्यांचा करारात समावेश आहे. त्याचवेळी राजनाथ सिंह म्हणाले, दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये संरक्षण हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. संरक्षण आराखडा करारावर स्वाक्षरी झाल्याने एक नवीन अध्याय सुरू होईल. करार भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण भागीदारीच्या धोरणांना मार्गदर्शन करेल. संरक्षण हा आमच्या द्विपक्षीय संबंधांमध्ये एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मुक्त, नियमांवर आधारित इंडो-पॅसिफिक प्रदेशासाठी आमची भागीदारी महत्त्वाची आहे. हा करार दोन्ही देशांमधील वाढत्या धोरणात्मक सहकार्याचा केंद्रबिंदू आहे. ◀(वृत्तसंस्था)

> ऐतिहासिक संरक्षण करार भारत-अमेरिका संरक्षण संबंधांना धोरणात्मक दिशा प्रदान करेल. हे आमच्या वाढत्या धोरणात्मक एकत्र येण्याचे संकेत आहेत आणि भागीदारीच्या नवीन दशकाची सुरुवात ठरेल. संरक्षण करार आमच्या द्विपक्षीय संबंधांचा एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून राहील,
>
> **- राजनाथ सिंह,** संरक्षण मंत्री



वॉशिंग्टन येथे भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह व अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी संरक्षण करारावर स्वाक्षरी केली

### करारातील प्रमुख मुद्दे

- दोन्ही देश संरक्षण आणि गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करतील
- संरक्षण तंत्रज्ञान आणि क्षमता विकास क्षेत्रात सहकार्य वाढवले जाईल
- हिंद प्रशांत महासागरात लष्करी सराव, प्रशिक्षण आणि सुरक्षा उपक्रम राबवले जातील
- क्षेत्रीय स्थैर्य राखण्यासाठी संरक्षण धोरणांमध्ये समन्वय साधला जाईल
- करारामुळे अमेरिकेला चीनविरोधी रणनीतिक संतुलन साधता येईल ■



# गुरू तेगबहादूर यांचा आदर्श बाळगणे हीच खरी आदरांजली

## रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

### अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची जबलपुरात बैठक

**◆ जबलपूर, ३१ ऑक्टोबर**

यावर्षी शीख परंपरेचे नववे गुरू तेगबहादूर यांच्या ३५० व्या बलिदान दिनी त्यांना आदरांजली अर्पण करण्याकरिता विविध धार्मिक, सामाजिक संघटनांसह सर्व जण अनेक कार्यक्रम आयोजित करत आहेत. गुरू तेगबहादूर यांच्या कार्याचे स्मरण करून त्या मार्गावर चालणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.

रा. स्व. संघाची अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक जबलपूर येथे होत आहे. त्यावेळी ते बोलत होते. सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, त्या संघर्षाच्या काळात, भारताचा बराचसा भाग परदेशी शासक औरंगजेबाच्या क्रूर अत्याचारांना बळी पडत होता. प्राचीन धार्मिक संस्कृती आणि श्रद्धा नष्ट करण्यासाठी संपूर्ण भारतात जबरदस्तीने धर्मांतर केले जात होते. त्याच काळात, समाजातील प्रमुख व्यक्ती एकत्र आल्या आणि त्यांनी पंडित कृपाराम दत्त यांच्या नेतृत्वात गुरू तेगबहादूर यांची भेट घेतली. परिस्थितीचे गांभीर्य समजून गुरू तेगबहादूर यांनी समाजाची चेतना आणि संकल्पशक्ती जागवण्यासाठी बलिदानाचा निश्चय केला आणि औरंगजेबाच्या क्रूर राजवटीला आव्हान दिले. धर्मांध औरंगजेबाने त्यांना अटक केली आणि एकतर इस्लाम धर्म स्वीकारा किंवा मृत्युदंडाला सामोरे जाण्यास सांगितले. स्वाभिमानी गुरू तेगबहादूर यांनी जुलमी राजवटीसमोर झुकण्याऐवजी बलिदानाचा मार्ग निवडला. मुगल शासकाने गुरू तेगबहादूर यांचा संकल्प तोडण्यासाठी त्यांचे शिष्य, भाई दयाला, भाई सतीदास आणि भाई मतिदास यांची निर्घृण हत्या केली. त्यानंतर गुरू तेगबहादूर मार्गशीर्ष शुक्ल ५, संवत १७३२ (सन १६७५) रोजी दिल्लीतील चांदणी चौकात धर्माचे रक्षण करताना दिव्य ज्योतीत विलीन झाले.

भारतीय परंपरेतील अशा महान तेजस्वी ताऱ्याची शिकवण आणि बलिदानाचे महत्त्व प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या आदर्शांचे स्मरण करीत आपले आयुष्य घडवावे आणि या वर्षी होणाऱ्या सर्व कार्यक्रमांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व स्वयंसेवकांनी आणि संपूर्ण समाजाने श्रद्धापूर्वक सहभागी व्हावे, असे आवाहन सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले. ◀(वृत्तसंस्था)



अखिल भारतीय कार्यकारी मंडळाच्या बैठकीत बोलताना सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे. यावेळी उपस्थित सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

# कार्तिकी यात्रेच्या स्वच्छतेसाठी राबताहेत दीड हजार कर्मचारी

## मुख्याधिकारी महेश रोकडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

कार्तिकी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

कार्तिकी यात्रा कालावधीत शहरासह नदी पात्र, वाळवंट, पासष्ठ एकर परिसर ,पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी जवळपास एक हजार ५९८ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून यामध्ये नगरपरिषद पंढरपूरचे ३५० कायम इतर १०० कर्मचारी तर जवळपास एक हजार ६८ हंगामी कर्मचारी व ८० सुपरवायझर तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून ५० स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पथक, जिल्ह्यातील इतर नगरपालिकेकडून जिल्हा प्रशासनामार्फत ३० पथके स्वच्छतेसाठी नेमण्यात आले आहेत.

प्रशासनामार्फत पाणीपुरवठ्याच्या सर्व यंत्रणा सुस्थितीत असल्याची खात्री करण्यात आली आहे. कार्तिकी यात्रा कालावधीत महिलांच्या स्वच्छतेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरामध्ये वेगळ्या शौचालयांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**घंटागाड्या दोनवेळेस कचरा उचलणार**

शहरासह पासष्ठ एकर, वाळवंट, पत्राशेड आदी ठिकाणी जंतनाशक फवारणीसह ,मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे.घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या ,कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी, जेटींग, सक्शन मशीन आदी वाहनांच्या माध्यमातून स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा कालावधीत या घंटागाड्या सकाळी व रात्री अशा दोन वेळेस घरोघरीचा कचरा गोळा करतील.





**उघड्यावर शौच विधी करू नये यासाठी प्रतिबंधक पथके**

पत्राशेड, वाळवंट, पासष्ठ एकर परिसर, रेल्वे मैदान आदी ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात आले आहेत. तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी पाण्याच्या टिपा ठेऊन त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. वारकरी भाविकांनी उघड्यावर शौच विधी करू नये म्हणून ९ प्रतिबंधक पथकांची नेमणूक देखील करण्यात आली आहे.

**पाणी व ज्युस बॉटलचे केले जाणार वाटप**

भक्तीसागर, पत्राशेड, वाळवंट या ठिकाणी मोफत ६ लाख पाणी बॉटल व ३ लाख ज्युस बॉटल वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.शहरातील सुरक्षेसाठी १४३ सीसीटीव्ही, शहरातील मुख्य रस्त्यावर विद्युत रोषणाई, शहरातील १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्थेचे स्वच्छता व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

**धोकायदायक इमारतींना नोटीसा**

सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील जीर्ण व धोकादायक इमारतींना नोटीसा देण्यात आल्या असून, शहरातील व वाळवंटातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. वाहनतळावरती दिशादर्शक फलक लावण्यात आले असून, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात येणार आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यासह प्रदक्षिणा मार्ग, दर्शन बारी येथील लाईट दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच नदीपात्रात व घाटावर अखंडित व पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी नदीपात्रात हायमास्ट पॉइंट्स, घाटांवर एलईडी दिवे चालू करण्यात आले आहेत.

**हिरकणी कक्षात सॅनिटरी नॅपकिनची सोय**

या बरोबरच वाळवंट परिसरात १५ ठिकाणी चेंजिंग रूमची व्यवस्था करण्यात आली आहे. नदी पात्र, वाळवंट परिसर, पासष्ठ एकर येथे हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले असून, कक्षाच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन बसविण्यात आले आहेत. भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी शहरातील सार्वजनिक बोअरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे.तसेच दररोज पिण्याच्या पाण्याची क्लोरीन टेस्ट केली जाणार आहे.

**सिंगलयुज प्लास्टिकचा वापर टाळावा**

यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या भाविकांनी शौचालयाचा वापर करावा, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही रोकडे यांनी यावेळी केले आहे.

# विशेष कर संकलन करणाऱ्या ६६ ग्रामपंचायतींचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मिशन स्वाभिमान ही विशेष कर संकलन मोहीम जिल्हा परिषद सोलापूर मार्फत राबविण्यात येत आहे. या मोहिमेत उत्कृष्ठ करसंकलन केलेल्या ६६ ग्रामपंचायतीचा गौरव जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आला.




जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तालुक्यातील ३००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या तीन ग्रामपंचायती व ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या तीन ग्राम पंचायतींना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वर्ग (१) .मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन स्मिता पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे , पं.स उत्तर सोलापूर चे सहाय्यक गट विकास अधिकारी चे बी.सी.पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव प्रमुख उपस्थित होते. या मोहिमेचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींच्या स्वारस्यपूर्ण सहभागातून १००% कर संकलन साध्य करणे असून, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मार्च २०२६ अखेरपर्यंत हे उद्दिष्ट गाठण्याचा निर्धार आहे.विशेष कर संकलन दिन या मोहिमेअंतर्गत दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विशेष कर संकलन दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रास्तविक भाषणात उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. या दिवशी अधिकाधिक कर संकलन करणाऱ्या कार्यक्रमास सन्मानीय सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व एक ग्राम पंचायत कर्मचारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. मिशन स्वाभिमान कार्यक्रमाचे संचालन शिवराज राठोड, सुहास चेळेकर यांनी केले. आभार सचिन जाधव यांनी मानले. बाहेर गावी गेलेले, उच्च पदावर कार्यरत असणारे, वेगवेगळ्या क्षेत्रात नावलौकिक केलेल्या भूमि पुत्राकडून लोकवर्गणी जमा करून गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत बळकटीकरण करणार असल्याचे भूजबळ यांनी सांगितले.




## सांगोला पेन्शनर संघटनेतर्फे सदस्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑक्टोबर-**

सांगोला तालुका पेन्शनर संघटनेतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल व पुरस्कार प्राप्त झालेबद्दल संघटनेतील सदस्यांचा सत्कार सांगोला येथील कार्यालयात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष वसंतराव दिघे होते. सुरुवातीस संघटनेतील मयत झालेल्या सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर शंकर सावंत, वसंतराव दिघे, प्रतिभा शेंडे, दिनकर घोडके, अभिमन्यू कांबळे, दत्तात्रय खामकर, रविराज शेटे या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्कारमूर्ती व प्रभाकर कसबे, सिद्धेश्वर झाडबुके, जयवंतराव नागणे, अरुण वाघमोडे, बापूसाहेब लवटे, लक्ष्मण सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संघटनेचे गंगाराम इमडे, अंबिका शिंदे, एकनाथ शिंदे, शिवाजी काशीद, महादेव चौगुले, दत्तात्रय शिंदे, मच्छिंद्र मिसाळ, शिवाजी राजमाने, दत्तात्रय शास्त्रे, तात्या काबुगडे, जालिंदर केंगार, दिगंबर गायकवाड, अरुण टेळे, बाबासाहेब मोठे उपस्थित होते.

# अक्कलकोटमधील ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी एक कोटी पाच लाख मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि ३१ ऑक्टोबर-**

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील पाच ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी एक कोटी पाच लाख रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.



ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणखी मजबूत करण्यासाठी आणि गावचा कारभार करताना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पाठपुरावा करून सदर पाच ग्रामपंचायतींना एकूण एक कोटी पाच लाख रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत.यामुळे या पाच ग्रामपंचायतिना आणखी चांगली सेवा देता येणार आहे.

**- सचिन कल्याणशेट्टी**
आमदार, अक्कलकोट

ज्या पाच गावांना इमारत बांधकामासाठी निधी मंजूर झालेले आहेत ती गावे आणि कंसात मंजूर झालेली रक्कम अशी आहे. अंकलगे (२० लाख),शावळ (२० लाख),भोसगे (२० लाख),संगदरी (२० लाख),तांदुळवाडी (२५ लाख). याबाबत अधिक माहिती अशी की राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशाग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना संदर्भात शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधांची असणारी आवश्यकता व त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या स्त्रोतांची मर्यादा विचारात घेऊन शासन निर्णयान्वये मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेच्या निधी निकषात बदल करून मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अक्कलकोट विधानसभेतील ५ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याने मंजूर झाल्याने या पाच ग्रामपंचायतींना गावाचा कारभार करण्यासाठी नजीकच्या काळात स्वतंत्र इमारत उपलब्ध होणार आहे.यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे सहकार्य लाभले असे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले.



# एमपीएससी परिक्षेतील रोहित क्षीरसागरचे यश अभिमानास्पद : सेठिया

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

श्रीपूर येथील शामराव क्षीरसागर या आमच्या कंपनीतील सामान्य कुटुंबातील कामगाराचा मुलगा रोहीत याने कर निरीक्षक (Tax Insperctors) परिक्षेत जिद्द, चिकाटी व प्रामाणिकपणाच्या जोरावर यश संपादन करून आई-वडिलांच्या कष्टाचे सार्थक केले हे आमच्या ब्रिमा सागर परिवारासाठी अभिमानास्पद असून सर्वांना प्रेरणा देणारे यश असल्याचे प्रतिपादन ब्रिमा सागर डिस्टलरीजचे व्यवस्थापकीय संचालक भरतकुमार सेठीया यांनी केले.

रोहीत क्षिरसागर याने मिळवलेल्या यशाबद्दल कामगारांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात भरतकुमार सेठीया बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर हे होते. याप्रसंगी रोहित क्षीरसागर, त्यांचे वडील शामराव क्षीरसागर आणि आई लक्ष्मी क्षीरसागर यांचा हार, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

येवेळी डी. बी. कुलकर्णी यांनी आपल्या मनोगता मध्ये मेहनती व सामान्य कुटुंबातील तरुणांनीही चिकाटी ठेवल्यास मोठी स्वप्ने पूर्ण करता येतात, याचे रोहीत हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले . याप्रसंगी डेप्युटी मॅनेजर नरेश पाठक, सतीश डिंगरे, निवृत्ती पवार, डी. बी. कुलकर्णी, सत्यजित पाटील, भागवत पारसे, सुरज शिंदे, गणेश विभुते, उमेश मिसाळ, बाळासाहेब पिसाळ, रोहन क्षीरसागर, राम क्षीरसागर, महादेव जाधव, दावल शिवशरण, नितीन वाघमारे, आण्णा शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन महादेव जाधव यांनी केले तर आभार सत्यजित पाटील यांनी मानले.

# महाड येथील रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिनास बहुसंख्य कार्यकर्ते जाणार

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुक्याची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष लोकनेते राजा सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली माळशिरस तालुक्याची बैठक अकलूज येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.

या बैठकीस युवक राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस. एम. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले, जिल्हा सचिव रमेश धाईंजे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोरे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे, अकलूज शहर अध्यक्ष अजित मोरे यांच्यासह प्रवीण साळवे, बापूसाहेब पोळके, संजय भोसले, अण्णासाहेब भोसले, भास्कर बनसोडे, सुनील ओव्हाळ, प्रकाश कांबळे, गणेश सावंत, गौतम वाघंबरे, दिनेश भोसले, असिफ शेख, संजय खरे, दीपक दळवी, भगवान भोसले उपस्थित होते.



बैठकीत ३ नोव्हेंबर रोजी ऐतिहासिक महाड क्रांतीभूमी येथे होणाऱ्या रिपाइंच्या ६८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमास माळशिरस तालुक्यातून भव्य प्रमाणात उपस्थिती राहावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन बळकट करणे, विभागनिहाय नियोजन आणि इच्छुक उमेदवारांची नावे निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. दरम्यान, अकलूज नगरपरिषदेसह तालुक्यातील जि.प. व पंचायत समितीच्या आरक्षित जागांसह इतर योग्य जागांवरही रिपब्लिकन पक्ष आपला ठाम दावा करणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. आभार अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे यांनी मानले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये रिपब्लिकन पक्षाचा कार्यकर्ता निवडून जाण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करणार यावेळी पक्ष निवडणूक लढणार.

- मिलिंद सरतापे,
तालुकाध्यक्ष रि.पा.इं.

## महत्वाचे...



### पिलीव येथे नागरी आघाडीतर्फे पोलिसांच्या विरोधात जनआक्रोश मोर्चा

**पिलीव, दि. ३१ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या भागात वारंवार घरफोड्या तसेच चोऱ्यांचा ताबडतोब तपास व्हावा यासाठी पिलीव येथील नागरी आघाडीच्या वतीने पोलीस प्रशासनाविरोधात जनआक्रोश मोर्चा शुक्रवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता काढण्यात आला. या मोर्चाची सुरुवात पिलीव येथील हनुमान मंदिरापासून करुन बसस्थानकावरील पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.या निवेदनात पिलीव व आसपासच्या परिसरात वारंवार घरफोड्या तसेच मोटारसायकली, सोने, नाणे, शेळ्या, मेंढ्या यासारख्या अनेक चोऱ्या झाल्या आहेत. पण पोलीस प्रशासनाकडून एकाही चोरीचा तपास लागलेला नाही.यासाठी पोलीस प्रशासनाने ताबडतोब पावले उचलावीत रात्री गस्त वाढवावी,पेट्रोलींग करावे,पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, पोलीस व्हॅनची सोय करावी आपण ताबडतोब या बाबीची अंमलबजावणी करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरी आघाडीच्यावतीने पोलीस प्रशासनाला देण्यात आला. यावेळी नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी सरपंच अमोल मदने, उमेश सरवदे, माजी सरपंच संग्राम पाटील, राजेंद्र जामदार, संतोष शेंडगे ,कल्याण जावळे, गोविंद भैस, कुमार भैस, विजय पिसे, रुषीकेश मदने, जिवन गोरे, दादासाहेब वगरे, दामोदर लोखंडे, प्रकाश तावरे, वैभव पिसे, दत्तात्रय भैस, कुमार लोखंडे,श्यामराव गलांडे,निलेश झेंडे मोर्चात सहभागी झाले होते. यावेळेस आरिफखान पठाण, अमोल मदने, ऋषीकेश मदने, संतोष शेंडगे, राजेंद्र जामदार, विजय पिसे, सुजित सातपुते यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सदरचे निवेदन पोलीस हवालदार स्वरुप शिंदे व धनाजी झगडे यांनी स्वीकारले.

### पंढरपूरच्या राजाराम शिक्षण संकुलाच्या प्राचार्यपदी शरद चव्हाण

सुस्ते, दि.३१ ऑक्टोबर-



पंढरपूर येथील इंडियन नॅशनल हयुमन डेव्हलपमेंट इंटेग्रेटीव्ह असोसिएशन पंढरपूर संचलित, छत्रपती शिवाजी हायस्कूल व राजाराम ज्युनिअर कॉलेज पंढरपूर या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी सुस्ते येथील शरद चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. राजाराम शिक्षण संस्थेच्या प्राचार्या ॲड. रजनी जाधव सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या या पदावर ही निवड करण्यात आली आहे. प्रा.शरद चव्हाण यांना मागील वर्षी राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार महासंघ संचलित राष्ट्रीय विश्वगामी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. या निवडीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरविंद जाधव, सचिव राज जाधव, पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत, पंढरपूर- मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण यांनी प्रा. शरद चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे.




### श्रेया कालेकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

लैंगिक छळ प्रतिबंधक (POSH) क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ॲड. श्रेया कालेकर यांना सन्मानित केले असून सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी त्यांचा सत्कार केला. या स्तरावर त्यांच्या समर्पणाचे आणि कठोर परिश्रमाचे कौतुक होत आहे हे पाहणे आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा क्षण आहे.

### पिलीव परीसरात अवकाळी पाऊस; ऊस तोडणी हंगाम लांबणीवर?

**पिलीव, दि. ३१ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र शासनाने यंदाचा गळीत हंगाम एक नोव्हेंबर पासुन सुरु करण्यास परवानगी दिली आहे. सर्व कारखाने गाळपास सज्ज झाले आहेत. मध्य प्रदेश व इतर ठिकाणाहून गावा गावात टोळ्या दाखल झाल्या आहेत. कधी नव्हे त्या यंदा टोळ्या वेळेवर आल्या आहेत. पण सध्या गेल्या चार पाच दिवसांपुर्वी झालेला पाऊस यामुळे गळीत हंगाम थोडा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.पाऊस झाल्यामुळे सध्या वापसा नाही .यामुळेच कोयता थांबला आहे.ह्या अवकाळी पावसामुळे ऊस तोडणी थांबली आहे.पिलीव परीसरात अजुनही अवकाळी पावसाचे सावट आहे .यामुळेच शेतकरी सध्या ऊस तोडणी करण्यास घाबरत आहेत. पाऊस येतो की काय अशी परिस्थिती असल्यामुळे पिलीव परिसरातील ऊस तोडणी हंगाम लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. कधी नव्हे ते यंदा ऊस तोडणी कामगार वेळेवर आले आहेत पण पावसामुळे वापसा नसल्यामुळेच ऊस तोडणी सध्या थांबली आहे.

### बाबुराव डिसले स्मृती गौरव पुरस्काराचे आयोजन

**बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-**

ज्येष्ठ उद्योगपती शिवाजीराव डिसले यांच्या जयंतीनिमित्त सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने येत्या ६ जानेवारी २०२६ रोजी कै. बाबुराव डिसले स्मृती जीवन गौरव पुरस्कार विविध उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांना व कै. शिवाजीराव डिसले शेठ युवा उद्योजक पूरस्कार दिले जाणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष रविंद्र कापसे यांनी दिली. पुरस्काराचे हे २१ वे वर्ष आहे. विविध क्षेत्रातील गुणवंतांनी पुरस्कारासाठी आपल्या माहितीचे अर्ज- श्री. रवींद्र कापसे, रचना निवास, १०० फुटी रोड, उपळाई रस्ता, बार्शी, जि. सोलापूर येथे १० डिसेंबर २०२५ पर्यंत द्यावेत, असे आवाहन मंडळाचे सचिव प्रताप दराडे संपर्क ९०२८४५२२०७ यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### एका वर्षात ५५ हजार लिटर दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकाला मोटरसायकल भेट

**सुस्ते, दि.३१ ऑक्टोबर-**

एका वर्षात ५५ हजार लिटर दूध पुरवठा करणाऱ्या प्रथम क्रमांकाच्या दूध उत्पादकाला पुढील दिवाळीला मोटारसायकल, दोन नंबरला दूध काढण्याची मशीन व तिसऱ्या क्रमांकाला कडबा कुट्टी गिफ्ट म्हणून भेट देण्यात येईल, अशी घोषणा पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील अंबिका दूध केंद्राचे चेअरमन प्रशांत चव्हाण यांनी केली. दीपावली सणाचे औचित्य साधून संस्थेला दूध पुरवठा करणाऱ्या सभासदाला येथील प्रगतशील बागायतदार श्रीकांत चव्हाण यांच्या हस्ते लाभांश वाटप करण्यात आला. यावेळी श्री. चव्हाण बोलत होते. ते म्हणाले की, आमच्या संस्थेवर विश्वास ठेवून दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकांनी आतापर्यंत आमच्या संस्थेला मोठ्या प्रमाणावर चांगल्या क्वालिटीच्या दुधाचा पुरवठा केला आहे. सध्या सगळीकडे दुध खेचण्यासाठी दूध संस्थांमध्ये स्पर्धा लागल्या आहेत. पुढील काळातही आमच्या संस्थेला चांगल्या क्वालिटीचा दूध पुरवठा केल्यास आम्हीही दूध दरही चांगला देऊ व दिवाळीला देण्यात येणाऱ्या बोनसामध्येही वाढ करू. प्रारंभी या दूध संस्थेला २०२४-२५ या वर्षात सर्वाधिक दूध पुरवठा करून शिवाजी मधुकर पवार या दूध उत्पादकांने प्रथम क्रमांक मिळवला, गणेश गोपीनाथ चव्हाण यांनी द्वितीय तर गणेश मोरे यांनी तिसरा क्रमांक पटकावला आहे. यावेळी विनायक चव्हाण, गणपत चहाण,रामेश्वर चव्हाण,अक्षय कांबळे अजिंक्य चव्हाण, विष्णू चव्हाण, गणेश गवळी, राजू कदम, बालाजी चव्हाण, तानाजी चव्हाण, संतोष चव्हाण, शुभम चव्हाण, रामचंद्र साहविठ्ठल, नवनाथ नागटीळक, धनाजी यावले, उमेश करपे, रमेश माने, अरुण शिंगण, नानासाहेब चव्हाण, किशन रनदिवे, रनजित चव्हाण,माऊली गायकवाड, अंबादास वायदंडे, प्रताप चव्हाण, कुमार गायकवाड, अनिकेत भोसले या दूध उत्पादकांनाही लाभांश वाटप करण्यात आला. बालाजी चव्हाण यांनी आभार मांनले.



### रोहित आर्यला केसरकरांशी बोलायचे होते; ओलीस धरलेल्या आजी, तरुणाने कथन केला थरारक अनुभव

**मुंबई, दि.३१ ऑक्टोबर-**

रोहित आर्याने आम्हाला ओलीस धरल्यानंतर कोणतेही जबरदस्ती केली नव्हती. तो माझी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा करावयाची आहे, असे वारंवार सांगत होता, अशी माहिती या थरारक घटनेतील एक बळीत असलेल्या रोहन अहिरे या तरुणाने सांगितले. वेब सिरीजच्या कामासाठी आर्याला अहिरे हा सहकार्य करत होता,मात्र त्याने १७ मुले, आजीसह त्यालाही काही तास बंदी बनविले होते. पोलिसांच्या सांगण्यावरून त्याने शिर्डीच्या हॉलचा काचेचा दरवाजा दगड मारून फोडला होता. त्यामध्ये त्याच्या हातालाही दुखापत झाली आहे. गुरुवारी मुंबईतील पवई इथं महावीर क्लासिक इमारतीत १७ शाळकरी मुलांना रोहित आर्य यानं ओलीस ठेवलं होतं. मुलांची सुटका करताना ओलीस ठेवलेल्या रोहित आर्या या माथेफिरूचा मुंबई पोलिसांनी एन्काऊंटर केला. आरोपी रोहित आर्य हा मुलांवर हल्ला करण्याच्या तयारीत असताना सहायक पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांनी त्याच्यावर गोळी झाडली, असं पोलिसांनी म्हटलं आहे. दरम्यान, पोलिसांनी तत्परता दाखवत खिडकीतून घुसत मुलांची सुखरुप सुटका केली. मात्र या प्रकरणानंतर काँग्रेसनं याला सरकार जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडं घटना नेमकी कशी घडली, याबाबत ओलिसांनी घटनेचा थरारक अनुभव सांगितला आहे. अहिरे म्हणाला, २०१२-१३पासून मी काही वर्षे रोहित समवेत काम केले होते. त्याच्या एका चित्रपटाचे लॉंचिग २०१४मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी करण्यात आले होते. त्यानंतर ५,६ वर्षे आम्ही संपर्कात नव्हतो, २,३ महिन्यापूर्वी त्याने वेबसिरीज बनवत असल्याचे सांगून त्यासाठी साही मागितले होते त्यानुसार आपण त्याच्या समवेत काम करत होतो. मात्र कालच्या घटनेपर्यंत तू असे काही करणार आहे याची आम्हाला थोडीही कल्पना नव्हती. त्याने आम्हाला बंदी बनवल्यानंतर त्याचा डाव लक्षात आला. तो पोलिसांशी बोलत असताना मी त्याला पुण्यातील एका आमदाराशी संपर्क साधून देतो, असे म्हणाले असता त्याने मला अडविले मला दीपक केसरकर यांच्याशीच बोलायचे आहे, त्यांनी माझे खूप नुकसान केले आहे. तू आत जा तुला माहित नाही, असे दडवल्याचे त्याने सांगितले.तर एक आजी म्हणाल्या ''माझ्या नातीची शूटींग होती, म्हणून दररोज इथं यायची. २६ ऑक्टोबरपासून मी तिला घेऊन येत होते. यानंतर आम्हाला पहिल्या मजल्यावर बसवले. थोड्या वेळानं दंगा झाला म्हणून आम्हाला शंका आली. मुलांना कोंडून ठेवलंय हे कळल्यावर सगळेच घाबरले आणि रडायला लागले,'' तर ''तळ मजल्यावर स्टोडीओमध्ये मोठमोठ्यानं आवाज येत होता. आम्हांला वाटलं की शूटींग सुरू असेल म्हणून दरवाजा बंद केला असावा. पण खालून रडण्याचा आवाज आल्यानंतर माझ्या आजीला कळलं की, काहीतरी झालं आहे. मग माझ्या आजीनं माझ्या आईला कॉल केला. नंतर पोलीस आले,'' असा अनुभव शूटींगसाठी गेलेल्या एका मुलीनं सांगितला आहे. घटनेला सरकार जबाबदार आहे, काँग्रेसची टीका : दुसरीकडं ''रोहित आर्यनं केलेला प्रकार हा अतिशय निंदनीय आहे. मुलांना ओलीस ठेवलं याला राज्य सरकार जबाबदार आहे, सरकारनं त्याचं म्हणणं काय आहे, ऐकलं पाहिजे होतं. त्यामुळं या घटनेला राज्य सरकार जबाबदार आहे,'' अशी प्रतिक्रिया खासदार वर्षा गायकवाड यांनी दिली. यावेळी त्यांनी सरकारवर टीका केली आहे. तर ''रोहित आर्य कोण आहे? ऑडिशनसाठी ज्याच्याकडं आपण पाठवतोय, ती व्यक्ती कोण आहे? याची खातरजमा करुन पालकांनी मुलांना शूटींगसाठी पाठवलं पाहिजे. पालकांनी मुलांची काळजी घ्यायला हवी होती, पण तसं झाले नाही,'' अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी दिली आहे.

# सोलापूर महापालिका निवडणूक; ११ नोव्हेंबरला आरक्षण सोडत

## हरकती व सूचनांसाठी १७ ते २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे महिलांचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार आहे. या प्रारूप आरक्षण सोडती नंतर हरकती व सूचना मागविण्यासाठी दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आता राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचना आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. यामध्ये दि. ३० ऑक्टोबर २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आरक्षित जागांची संख्या निश्चित करुन त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता मिळण्यासाठी सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या कडून प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. ८ नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडतीची जाहिर सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येणार असून दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे महिलांचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. प्रारूप आरक्षण सोडती नंतर प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यासाठी विहित नमुन्यात दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन महानगरपालिका आयुक्त हे दि. २५ नोव्हेंबर २०२५ ते दि. १ डिसेंबर २०२५ या कालावधीत निर्णय घेणार असून अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात सादर करण्याचा दि. २ डिसेंबर २०२५ असा आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरीता, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित कशापध्दतीने करण्यात येणार आहे. याची माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या https://www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात आलेली आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी म्हटले आहे.



# जिल्हा व्यवसाय सुधारणेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना जादा अधिकार

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात उद्योग विभागाचा घेतला आढावा**

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-**

राज्यात 'जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजनातर्गत १५४ सुधारणांचा समावेश असलेल्या या उपक्रमाची अंमलबजावणी पुढील वर्षाच्या १४ ऑगस्टपर्यंत केली जाणार आहे. त्यानंतर्ग विभागीय बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याधिकाऱ्यांना अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली 'इज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी मुख्य सचिव राजेशकुमार, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ६ विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपले अहवाल सादर करतील.



# जिजाऊ गुरुकुलला माजी आमदार दत्तात्रय सावंतांची भेट

**तभा वृत्तसेवा, बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-**

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार दत्तात्रय सावंत यांनी जिजाऊ गुरुकुल खांडवी येथे भेट देऊन विद्यालयातील विविध उपक्रमांची पाहणी केली. भेटीदरम्यान जिजाऊ गुरुकुलच्या वतीने दत्तात्रय सावंत यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे डायरेक्टर संदेश कदम यांनी प्रास्ताविक करताना जिजाऊ गुरुकुलमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांची तसेच संस्थेच्या भविष्यातील नियोजनाची सविस्तर माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे यांनी आपल्या भाषणात स्वय: अर्थसाहित शाळांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच सरकारी सहकार्याची आवश्यकता या विषयावर आपले विचार मांडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. जिजाऊ गुरुकुलसारख्या संस्थांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. भविष्यात या संस्थेच्या प्रगतीसाठी मी खंबीरपणे उभा राहीन, असा विश्वास सावंत यांनी व्यक्त केला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली क्षीरसागर यांनी केले.सुवर्णा देवकर यांनी आभार मानले.

## आशिया चषकाचा मुद्दा उपस्थित होणार

**मुंबई, ३१ ऑक्टोबर**

आशिया चषक विजेत्या भारतीय संघाच्या मुंबईतील बीसीसीआयच्या मुख्यालयात एक किंवा दोन दिवसांत पोहोचेल अशी बीसीसीआयला आशा आहे, परंतु जर हीच अडचण कायम राहिली तर बीसीसीआय ४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आयसीसीच्या बैठकीत हा विषय उपस्थित करू शकते.

दुबई येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला पाच गड्यांनी पराभूत करून आशिया चषक जिंकला, परंतु पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नक्की यांच्याकडून चषक स्विकारण्यास भारतीय खेळाडूंनी नकार दिला. नक्वी हे आशिया क्रिकेट परिषदगेचे आणि पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष देखील आहेत.दोन्ही देशांमधील संघर्षामुळे पाकिस्तानच्या सम कक्षांशी हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यानंतर हे घडले.

# ठाकरेंची मुलुख मैदानी तोफेला लागला ब्रेक

## तब्येतीच्या कारणास्तव संजय राऊत दोन महिने अलिप्त



**तभा वृत्तसेवा, मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-**

राज्यात महाविकास आघाडी अस्तित्वात आल्यापासून एकहाती किल्ला लढविणाऱ्या त्यातही विशेषत: उद्धव ठाकरे गटाची भूमिका आक्रमकपणे मांडीत विरोधकांवर हल्ला चढविणाऱ्या खा. संजय राऊत आता प्रकृतीच्या कारणास्तव दोन महिने सार्वजनिक कार्यक्रमातून अलिप्त राहणार आहेत. पुढील दोन महिने पूर्णपणे उपचारात व्यस्त राहणार असून कोणालाही भेटू शकणार नाही. नव्या वर्षात नव्या जोमाने भेटू, असे भावनिक आवाहन करून त्यांनी शुक्रवारी आपल्या आजाराबाबत कार्यकर्ते व हितचिंतकांना पत्र लिहून ही माहिती दिली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची धामधूम व निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभाराविरोधात विरोधक संघटित होत आहेत, अशावेळी ही मुलुख मैदानी तोफ काही काळासाठी थंडावणार असल्याने महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. खासदार संजय राऊत दररोज सकाळी पत्रकार परिषद घेऊन सत्ताधाऱ्यांची डोकेदुखी वाढवणारे संजय राऊत यांना आज रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची तब्येत अचानक बिघडल्याचे त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून कळविले.

कार्यकर्त्यांना उद्देशून त्यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, ''सर्व मित्र परिवार आणि कार्यकर्त्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केलं, पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचं समोर आले असून उपचार सुरू आहेत, मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणं व गर्दीत मिसळणं यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे की, मी ठणठणीत बरा होऊन साधारणत: नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच राहू द्या'' असे ही म्हटले आहे. त्यामुळे विरोधी पक्षांकडून १ नोव्हेंबर निवडणूक आयोगावर काढण्यात येणाऱ्या सत्याच्या मोर्चात पण संजय राऊत उपस्थित राहू शकणार नाहीत.

**पंतप्रधान मोदींचे ट्वीट :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राऊतांच्या चांगल्या आरोग्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, ''संजय राऊत जी, तुमच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी. तुमच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो''.

# निवडणूक आयोगाविरुद्ध आज मुंबईत सत्याचा मोर्चा!

## ईव्हीएम, बोगस मतदारा विरुद्ध विरोधक एकवटले

**तभा वृत्तसेवा, मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-**

ईव्हीम मशीन घोटाळ्याबरोबर राज्यातील मतदारयाद्यांतील घोटाळा, दुबार आणि बोगस मतदारांविरोधात महाविकास आघाडी, मनसे आणि इतर सर्वपक्षीय संघटना शनिवारी (१ नोव्हेंबर) मुंबईत राज्य निवडणूक आयोगाविरोधात सत्याचा मोर्चा निघणार आहे.

दुपारी एक वाजता फॅशन स्ट्रीट येथून मोर्चाला सुरवात होणार असून त्यामध्ये जेष्ठ नेते शरद पवार यांच्यासह उद्धव व राज ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.

आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात सर्वजण एकवटले असल्याचे यातून दाखवले जाणारा असून जोपर्यंत मतदार याद्या सदोष होत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेण्याची मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे.

**आयोगावर दबाव वाढवण्याची रणनीती**

या मोर्चात शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), काँग्रेस आणि मनसेचा सहभाग आहे. महाविकास आघाडी आणि मनसे यांची एकमुखी मागणी आहे की, ''जोपर्यंत मतदार याद्या स्वच्छ होत नाहीत, तोपर्यंत राज्यात निवडणुका घेऊ नयेत.'' मोर्चानंतर सर्व विरोधी पक्षांकडून एकत्रित घोषणा केली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने मतदार याद्यांमधील बोगस मतदार वगळेपर्यंत निवडणुका घेऊ नयेत.

**न्यायालयात याचिका दाखल करणार**

विरोधी पक्षांकडून या मुद्द्यावर आता न्यायालयीन लढाई उभी करण्याची तयारी सुरू आहे. ठाकरे गटाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ''मतदार याद्यांतील गोंधळ आणि बोगस मतदारांचा मुद्दा न्यायालयात नेऊन याचिका दाखल केली जाणार आहे.'' तसेच, जोपर्यंत राज्य निवडणूक आयोग हे घोळ दूर करत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणी कोर्टात जाणार आहे. मागील सर्वपक्षीय बैठकीत तीन ते चार पर्यायांवर चर्चा झाली, त्यामध्ये न्यायालयात जाणं, निवडणुकांवर बहिष्कार टाकणं आणि निवडणूक आयोगावर सार्वजनिक दबाव आणणं हे पर्याय चर्चेत आले.

# फलटण प्रकरणातील मोबाईल चॅटिंगमधून भयानक 'ट्रँगल' : मंत्री जयकुमार गोरे

**सातारा, दि. ३१ ऑक्टोबर-**

फलटण येथील डॉक्टर महिलेच्या आत्महत्येमुळे राज्यात जोरदार राजकारण तापले आहे. विरोधकांकडून या प्रकरणावरून भाजपचे माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांचे नाव घेत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. विरोधकांच्या या भूमिकेवर राज्याचे मंत्री जयकुमार गोरे यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, आम्ही त्या मृत भगिनीचा आदर करतो, परंतु आत्महत्या प्रकरणातील मोबाईल चॅटिंगमधून जो 'ट्रँगल' समोर आला आहे, तो सार्वजनिकरीत्या लोकांसमोर आणण्यासारखा नाही. त्यामुळे, कुणीही या संवेदनशील विषयावरून राजकारण करू नये, असे गोरे यांनी विरोधकांना उद्देशून म्हटले आहे. या प्रकरणाच्या तपासावर शंका उपस्थित करणाऱ्या विरोधकांना जयकुमार गोरे यांनी चोख उत्तर दिले. ते म्हणाले की, या डॉक्टर महिलेला न्याय मिळालाच पाहिजे आणि त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य ते निर्देश तपास यंत्रणांना दिले आहेत.



असे असूनही विरोधक सातत्याने तपास यंत्रणेवर शंका उपस्थित करून वातावरण गढूळ करत आहेत. या घटनेमध्ये सर्व पुरावे उपलब्ध आहेत आणि त्या आधारावरच निष्पक्ष तपास पूर्ण केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

जयकुमार गोरे यांनी विश्वास व्यक्त केला की, या आत्महत्येप्रकरणी कायद्याचे पालन केले जाईल. त्यांनी ठामपणे सांगितले की, सर्व उपलब्ध पुराव्यांच्या आधारावर तपास पूर्ण होईल आणि न्यायालय दोषी आरोपींना निश्चितपणे शिक्षा देईल.

**वेगळाच 'ट्रँगल' :** जयकुमार गोरे म्हणाले, मृत्यू पावलेली संपदा मुंडे आणि दोन आरोपी यांचे मोबाइल पाहिल्यानंतर परिस्थिती खूप गंभीर आणि वेगळी आहे. तिन्ही मोबाइल बघितल्यानंतर जो ट्रँगल समोर येत आहे तो खूप भयानक आहे आणि ती परिस्थिती लोकांसमोर आणण्यासारखी नाही. आता या मृत्यूवर सुरू असलेले राजकारण थांबवावे आणि वस्तुदर्शक सुरू असलेला तपास होऊन न्यायालयातून आरोपींना शिक्षा मिळू दे.

**निंबाळकरांना टोला :** रामराजे निंबाळकरांवर टोला लगावताना जयकुमार गोरे म्हणाले, वस्तुस्थिती सोडून संपदा मुंडे हिच्या मृत्यूचे राजकारण करीत तिसऱ्याच कोणाचे तरी नाव घेत आकांडतांडव करण्याचे काम स्थानिक नेते करीत आहेत.

# 'स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाला यंदा मंजुरी नसल्याचा शिक्षण विभागाचा खुलासा

## रोहित आर्य प्रकरणात नवे वळण

**तभा वृत्तसेवा, मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-**

पवईतल्या इमारतीत १७ लहान मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्य प्रकरणात आता एक नवीन वळण आलं आहे. सरकारकडील थकीत दोन कोटीच्या बिलासाठी आर्यने हे कृत्य केले असल्याचे व्हिडिओतून सांगितले असले तरी शिक्षण विभागाने मात्र त्याचा इन्कार केला आहे.

पोलिसांच्या एन्काऊंटर मध्ये मारला गेलेल्या रोहितने 'स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाच्या पैशांसाठी याआधी अनेक वेळा आंदोलनं केली होती, अशी माहिती समोर येत आहे. त्या आंदोलनांच्या काळात तत्कालीन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर वादाच्या केंद्रस्थानी आले. आहे. याच प्रकल्पाचे पैसे मिळावेत, यासाठी आर्यने वेळोवेळी प्रयत्न केल्याचं सांगितलं जात आहे. यंदा प्रकल्पाला मंजुरी नाही : ''मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा'' या उपक्रमाअंतर्गत सुरू केलेला स्वच्छता मॉनिटर प्रकल्प याला महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाने प्रथम २७ सप्टेंबर २०२२ रोजी आणि पुन्हा ३० जून २०२३ रोजी मान्यता दिली होती. परंतु, २०२४२५ या शैक्षणिक वर्षासाठी या प्रकल्पाला कोणतीही नवी मंजुरी दिली गेलेली नाही, असं शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे शाळांमधील स्वच्छतेची गुणांकन व्यवस्था, स्वच्छतेचे मॉनिटर आणि शाळांना मिळणारी बक्षिसं सध्या बंद आहेत. हा उपक्रम नेमका काय होता? : ''मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा'' उपक्रमाअंतर्गत सुरू केलेला स्वच्छता मॉनिटर प्रकल्प हा शाळांमधील स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकता वाढवण्यासाठी राबवला जात होता. या प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये काही विद्यार्थी किंवा विभागांना ''स्वच्छता मॉनिटर'' म्हणून नेमण्यात येत होतं. त्यांचा मुख्य कार्य होता, शाळेतील स्वच्छतेच्या नियमांचं पालन सुनिश्चित करणं, जसं की शाळेत थुंकणं, कचरा टाकणं किंवा घाण करणं यावर नियंत्रण ठेवणं.या प्रकल्पाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकता निर्माण करणं आणि ''बघूनही दुर्लक्ष न करणं'' या सवयीचा प्रचार करणे होता. लेट्स चेंज या ब्रिदवाक्याखाली हा प्रकल्प अप्सरा मीडिया एंटरटेनमेंट नेटवर्क या कंपनीमार्फत राबवला जात होता. तसेच, शाळांकडून ५०० ते २,००० रुपये नोंदणी शुल्क घेतल्याची माहिती काही शिक्षकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितली. या उपक्रमाला प्रथम २७ सप्टेंबर २०२२ रोजी आणि पुन्हा ३० जून २०२३ रोजी मान्यता देण्यात आली होती. ही मान्यता सीएसआर निधीमार्फत होती आणि त्या टप्प्यात एकूण ९.९ लाख देयकाची नोंद आहे. २०२३२४ मध्ये फेज -२ अंतर्गत २ कोटींचं बजेट मंजूर झालं, पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. रोहित आर्यला हटवल्यानंतर काय घडलं? : या प्रकल्पाचे संचालक रोहित आर्य यांचं नाव काही गंभीर प्रकरणात आल्यानंतर शिक्षण विभागानं पुढील वर्षासाठीची मंजुरी थांबवली. २०२४२५ साठी मंजुरी नाकारताना विभागानं शाळांकडून घेतलेली फीस परत करण्याच्या सूचना दिल्या आणि संस्थेकडून अपेक्षित कागदपत्रं न आल्यानं पुढील कारवाईही थांबवण्यात आली. परिणामी ''स्वच्छता मॉनिटर'' प्रकल्प सध्या अनधिकृत स्थितीत आहे. तसेच काल झालेल्या आर्य प्रकरणानंतर शिक्षण विभागानं या वर्षी संबंधित प्रकल्पाला मंजुरी दिली नव्हती, असा खुलासा केला आहे.

**पोलिसांकडून हत्या : ॲड. सातपुते**

रोहित आर्या हा पोलिसांचा एन्काऊंटर मध्ये मारला गेला असल्याने आता त्याबाबत ही संशय उपस्थित केला जात आहे. त्याने केलेले हे कृत्य चुकीचे असले तरीही त्याला छातीत गोळ्या घालण्याऐवजी गोळी मारून जखमी करता आले असते, त्यामुळे पोलिसांनी त्याची हत्या केली आहे असा आरोप ज्येष्ठ वकील नितीन सातपुते यांनी केला आहे याबाबत पोलीस व संबंधित नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची त्यांनी मागणी केली. सरकारकडून कारवाई न झाल्यास त्याविरुद्ध याचिका दाखल करणार असल्याचाही इशारा त्यांनी दिला आहे. विरोधी पक्षाने ही या एन्काऊंटर बाबत नाराजी व्यक्त करीत महायुती सरकारला जबाबदार धरले आहे. हजारो कोटीची ठेकेदारांची बिले प्रलंबित असल्यानेत्यांच्याकडून असे कृत्य पुन्हा केला धोका निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आंदोलन संपले, आव्हाने कायम

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही देशातील जवळपास अर्धी अधिक टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित उद्योगावर अवलंबून आहे. शेतकरी हा जगाचा अन्नदाता म्हणवला जातो. शेतकऱ्याने शेतात कष्ट करून धान्य पिकवले नाही तर सर्वांनाच उपाशी राहावे लागेल. दुसऱ्याचे पोट भरण्यासाठी शेतकरी स्वत: अनेकवेळा अर्धपोटी वा उपाशी राहतो. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा आणि मेहनतीचा योग्य मोबदला मिळत नाही, हे उघड सत्य आहे. शेती हा बहुधा एकमेव असा व्यवसाय असावा, ज्यात शेतकऱ्याला आपल्या उत्पादनाचा भाव ठरवता येत नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा भाव सरकार वा व्यापारी ठरवत असतात. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. त्यातून शेतकरी कर्जबाजारी होतो, त्याच्यावर आत्महत्येची वेळ येते. देशातील सर्वांत जास्त आत्महत्या शेतकऱ्यांच्या आहेत. तरीही हा वर्ग शांतपणे धरणी मातेच्या पोटात बियाणे पेरत असतो आणि अख्ख्या जगासाठी पिकवत असतो. क्वचितच त्याची अस्वस्थता बाहेर पडते आणि ती तशी नुकतीच बच्चू कडू यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनातून व्यक्त झाली. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आतापर्यंत देशात अनेक आंदोलने झालीत. विविध राजकीय पक्षांनीही शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने केलीत. महाराष्ट्रातील सर्वांत मोठे शेतकरी आंदोलन शरद जोशी यांचे होते. एकेकाळी शरद जोशी यांची शेतकरी आंदोलने महाराष्ट्रातच नाही तर देशात गाजली होती. जगानेही त्यांच्या आंदोलनांची दखल घेतली होती. शरद जोशींच्या आंदोलनाने शेतकऱ्याच्या प्रश्नांची राज्यच नाही तर केंद्र सरकारलाही दखल घ्यावी लागली. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची तसेच हमीभावाची मागणी देशात सर्वप्रथम शरद जोशी यांनी केली. शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी हमीभावाची योजना सरकारला आणावी लागली. शरद जोशी यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना संघटित केले. त्यांच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटले असे म्हणणे धाडसाचे असले तरी ते सुटण्याचा मार्ग मोकळा झाला, यात शंका नाही. शरद जोशी यांची सर्व आंदोलने शांततापूर्ण तसेच अहिंसक होती. त्यांच्या आंदोलनाने सर्वसामान्य जनतेला कधी वेठीस धरले नाही, त्यांना त्रास होऊ दिला नाही. काही वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर झालेल्या आंदोलनांची आणि शरद जोशी यांच्या आंदोलनाची तुलना होऊ शकत नाही. भारतीय किसान युनियनच्या टिकैत बंधूंच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांच्या वेषात खलिस्तानवादी घुसले, अशी चर्चा त्यावेळी झाली होती. शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारने आणलेल्या तीन कायद्यांच्या विरोधात हे आंदोलन होते. खरे म्हणजे मोदी सरकारने आणलेले तिन्ही कायदे शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून तयार करण्यात आले होते. पण टिकैत आणि देशातील अन्य शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करण्याऐवजी अल्पकालीन हिताचा विचार केला. परिणामी मोदी सरकारला हे तीनही कायदे मागे घ्यावे लागले. त्यामुळे सरकारचे काही नुकसान झाले नाही, पण देशातील शेतकऱ्यांचे कायमस्वरूपी नुकसान झाले. शेतकरी नेत्यांनी आपल्या आडमुठ्या भूमिकेमुळे देशातील शेतकऱ्यांच्या पायावर धोंडा पाडून घेतला.

मुळात कोणतेही आंदोलन सुरू करताना मागण्यांसोबत आपल्याला कधी आणि कुठे थांबायचे, याचा विचार होणे गरजेचे असते. आपल्याला कधी आणि कुठे थांबायचे हे माहीत नसेल तर आंदोलन दीर्घकाळ चालविले जाते आणि त्यातून शेतकऱ्यांच्या पदरात त्रास, ससेहोलपट आणि मनस्तापाशिवाय काही पडत नाही. दिल्ली सीमेवर झालेले शेतकऱ्यांचे आंदोलन हे याच प्रकारातील होते. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रात नुकत्याच प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांच्या नेतृत्वात झालेल्या शेतकरी आंदोलनाकडे पाहावे लागेल. सरसकट कर्जमुक्ती आणि शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, या आणि अन्य मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी महाएल्गार आंदोलन पुकारले होते. शेतकऱ्यांचे आंदोलन विदर्भ तसेच महाराष्ट्राला नवे नाही. पण या आंदोलनामुळे कधी नव्हे ते नागपुरातून जाणारे चारही राष्ट्रीय महामार्ग ठप्प झाले. २७ किलोमीटरपर्यंतचा जाम लागला. मुळात बच्चू कडू हे आक्रमक आहेत. आपल्या अभिनव आंदोलनांसाठी ते ओळखले जातात. त्यांनी आतापर्यंत केलेली सर्व आंदोलने अभिनव म्हणावी अशी होती. त्यामुळेच ती गाजलीही. बच्चू कडू यांचे यावेळचे शेतकरी आंदोलनही गाजले. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व यंत्रणांनी समन्वयाची भूमिका घेतल्यामुळे हे आंदोलन चिघळले नाही आणि त्यावर शांततापूर्ण तसेच सर्वमान्य असा तोडगा निघाला. याचे श्रेय महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना द्यावे लागेल. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्या. रजनीश व्यास यांनी घेतलेल्या न्यायोचित भूमिकेमुळे देखील सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला. आंदोलन शांततेने संपण्याचे श्रेय आंदोलनाचे नेते बच्चू कडू व त्यांच्या सहकाऱ्यांनाही द्यावे लागेल. कडू यांनी टिकैत बंधूंसारखी ताठर भूमिका घेतली असती, तर काय झाले असते, याची कल्पना करवत नाही. कोणतेही आंदोलन चिघळले तर त्याची परिणती अश्रुधूर, लाठीहल्ला आणि गोळीबारात होते. यात सरकारचे नाही तर आंदोलकांचे सर्वांत जास्त नुकसान होते. राजकारणात काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे ज्याला समजते, तो खरा नेता मानला जातो. त्याचप्रमाणे आंदोलन करणाऱ्या नेत्याला कुठे आणि केव्हा थांबावे, हे समजते, त्याला नुसता आंदोलनाचा नेताच नाही तर खऱ्या अर्थाने हितचिंतक म्हणावे लागते. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलक आंदोलन करत असतात. कोणतेही आंदोलन लाठीमारात आणि गोळीबारात जखमी होण्यासाठी तसेच प्राण गमावण्यासाठी नसतेच. या आंदोलनात बच्चू कडू यांनी आपला मुद्दा व्यक्तिगत प्रतिष्ठेचा केला नाही. सरकारने आंदोलनस्थळी चर्चेसाठी यावे, असा आग्रह धरला नाही. सरकारच्या निमंत्रणावरून कडू आणि त्यांचे सर्व सहकारी चर्चेसाठी मुंबईला गेले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांची भूमिका नेहमीच त्यांना न्याय देण्याची आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची राहिली. याचा प्रत्यय राज्यातील अतिवृष्टीच्या वेळी आला. अलिकडच्या अतिवृष्टीत फार मोठा तडाखा राज्यातील शेतकऱ्यांना बसला होता. त्यावेळी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी फडणवीस यांनी दिल्लीत धाव घेत राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी घसघशीत मदत आणली. तिचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना मिळाला. त्यामुळे यावेळीही फडणवीस राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतील, त्यांना दिलासा देतील, अशी खात्री सर्वांनाच होती. दोन्ही बाजूंची बैठक झाल्यावर ३० जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन फडणवीस यांनी आंदोलकांना दिले. त्यासाठी एका उच्चाधिकार समितीची स्थापनाही त्यांनी केली. कर्जमाफी हा तात्कालिक उपाय असला तरी भविष्यात शेतकरी कर्जाच्या चक्रात अडकणार नाही, या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. फडणवीस यांचे आश्वासन कधीच कोरडे नसते. फडणवीस जे बोलतात, ते करून दाखवतात, याचा राज्यातील जनतेने याआधीही अनेकवेळा अनुभव घेतला आहे. त्यामुळे यावेळीही शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, याची खात्री देता येते. कर्जमाफी व्हायलाच हवी. ती शेतकऱ्यांची गरज आहे. यापूर्वीही दोन-तीनदा कर्जमाफी झाली. परंतु, शेतकऱ्यांची दैना संपलेली नाही. आता ती संपविण्याच्या दिशेनेही पावले उचलली गेली पाहिजेत. महाराष्ट्रातील सिंचनाचे प्रमाण वाढविणे, वातावरणातील बदलांच्या प्रभावापासून शेती व शेतकऱ्यांना वाचविणे, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व खते वेळेवर उपलब्ध करून देणे, कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करून देणे या साऱ्या गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत. त्यातही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देणे फारच महत्त्वाचे आहे. शेतकऱ्याच्या घरात जोवर अधिकचे उत्पन्न येत नाही, त्याची शेती तोट्यातून नफ्याकडे जात नाही, तोवर त्याची दैना थांबणार नाही, हे आंदोलनकर्त्यांनी आणि सरकारनेही लक्षात घेणे गरजेचे आहे. आंदोलन संपले असले तरी आव्हाने कायम आहेत, हेही त्यांनी ध्यानात ठेवावे. ▮

## यंगिस्तान

# आपण 'भारतीय' कधी होणार?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

भारतीय रेल्वे ही जगातील सर्वांत मोठी रेल्वे व्यवस्था आहे. दररोज सुमारे २.३ कोटी प्रवासी तिच्यावर अवलंबून असतात. गंमत म्हणजे ही संख्या ऑस्ट्रेलिया देशाच्या संपूर्ण लोकसंख्येइतकी आहे. पण नुकताच एका विदेशी ट्रॅव्हल व्लॉगरचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यामध्ये ती तरुणी भारतीय रेल्वेतील आपला विचित्र अनुभव सांगताना दिसतेय. ती म्हणतेय की ट्रेनचा डबा अत्यंत अस्वच्छ होता. टॉयलेटमधून दुर्गंधी येत होती. सीटवर बसायलाही जागा नव्हती. प्रवाशांच्या डोक्यावर सामानाचा ढिगारा. अशा परिस्थितीत तिला रात्रभर प्रवास करावा लागला. तिचा हा व्हिडीओ खूपच व्हायरल झाला. पण पुढे ती असंही म्हणाली आहे की, "The trains here are awesome and I didn't have this experience in 2023 when I came it wasn't busy at all! But I guess because it's a Saturday that's why." याचा अर्थ तिने उगाच टीका करावी म्हणून व्हिडीओ केलेला नाही. भारतात यायच्या आधी ट्रेनच्या तिकिट्स बुक करून ठेवा असा सल्लाही तिने दिला आहे. हे अगदी खरं आहे की ही परिस्थिती केवळ भारताची नाही. जगामध्ये अनेक ठिकाणी अस्वच्छता असणार. मात्र भारतीय लोक आपल्या देशाला भारत माता म्हणतात. म्हणून आपली जबाबदारी अधिक वाढते.

पण हे फक्त रेल्वेचं चित्र नाही. अशा गोष्टी अनेक ठिकाणी घडतात. रस्ते, उद्याने, सार्वजनिक शौचालये, अगदी आपल्या घराच्या बाहेरची जागा... अनेक ठिकाणी अस्वच्छता दिसते. स्वच्छता म्हणजे फक्त घर स्वच्छ ठेवणे नव्हे. सार्वजनिक जागा, रस्ते, रेल्वे, बस इत्यादी ठिकाणे आपलं घरच नव्हे का? आपण वसुधैव कुटुंबकम् म्हणतो. किमान आपल्या देशाला तरी आपण कुटुंब मानू. रस्त्यावर थुंकणे, कचरा फेकणे, प्लॅस्टिकच्या पिशव्या टाकणे यात आपल्याला काहीही वावगं वाटत नाही. मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये सकाळी प्रवास करणाऱ्या प्रत्येकाला माहीत आहे की, प्लॅटफॉर्मवर चालताना पायाखाली कचरा, थुंकी, पानांच्या पिचकाऱ्या आपण तुडवत चालतो. पण मुंबई इतकी वेगवान आहे की अशा गोष्टींची पर्वा करत बसायला आपल्याकडे वेळ नसतो. दिल्लीतील प्रदूषणाची गाथा सर्वदूर पसरली आहे. रस्त्यांवर प्लॅस्टिकच्या पिशव्या हवेत उडताना दिसतात. तीर्थस्थळांवर पूजेच्या साहित्याचा कचरा वाहून जातो. ट्रेनमध्ये लोक चालण्याच्या जागेत नमाज पठन करतात. बेशिस्त वागण्याचा आपण ठेका घेतलाय का? किंवा बेशिस्त वागण्याचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्याला प्रस्थापित करायचा आहे? एका अभ्यासानुसार, भारतात दररोज १.५ लाख टन कचरा निर्माण होतो. त्यापैकी फक्त २० टक्के कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाट लावला जातो. उरलेला कचरा



रस्त्यावर, नद्यांमध्ये, समुद्रकिनाऱ्यावर सडत पडतो. हा कचरा फक्त पर्यावरणाचा नाही, तर आपल्या आरोग्याचाही शत्रू आहे. डास, माशा, उंदीर हे सगळे रोगांचे वाहक आहेत. डेंग्यू, मलेरिया इ. आजारांचं मूळ अस्वच्छतेत आहे. पण तरीही आपण बदलत नाही.

शाळेत आपण इतिहास, भूगोल, गणित शिकतो. पण नागरिकशास्त्र हा विषय आपण ऑप्शनला टाकतोय का? जपानमध्ये लहान मुलांना शाळेत कचरा वेचायला शिकवलं जातं. स्वित्झर्लंडमध्ये सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवणं हा प्रत्येकाचा धर्म समजला जातो. पण भारतात? आपण रस्त्यावर कचरा फेकतो आणि मग सरकारला दोष देतो. "स्वच्छ भारत अभियान" सुरू झालं तेव्हा सगळे उत्साही होते. पण आज दहा वर्षांनंतर रस्ते तसेच आहेत. कारण अभियान सरकारचं आहे, आपलं नाही, ही आपली धारणा आहे. कोरोना होता तेव्हा रस्त्यावर थुंकल्याने कोरोना पसरतो असं सांगितल्यामुळे काही लोकांनी संयम पाळला होता. तरी काही लोक रस्त्यावर बिनधास्त "पचाक" करताना दिसले. आता कोरोनाला आपण पूर्णपणे विसरून गेलोय. त्यामुळे रस्त्यावर, भिंतींवर, ट्रेनमध्ये, बिल्डिंगच्या शिड्यांवर थुंकण्याची परंपरा आपण पुन्हा सुरू केली आहे. आपण इतके करंटे आहोत की आपल्याला देवाचे फोटो लावावे लागतात कारण शिड्यांवर कुणी थुंकू नये म्हणून.

आपण इतके असंवेदनशील आहोत की गर्दीमध्ये धक्का लागला तरी आपण लगेच शिवीगाळ करतो. पण संयमाने 'सॉरी' म्हणायला आपल्याला लाज वाटते, आपला अहंकार दुखावतो. फुटपाथवरून, रॉंग साईडवरून बाईक चालवतो. पण कुणाला त्रास झाला तर आपली चूक असतानाही आपण समोरच्या व्यक्तीच्या अंगावर धावत जातो. जणू बेशिस्त वागणं, संविधानाच्या विरोधात वागणं हा आपला धर्म झाला आहे. आपण आपलं सोयीस्कर जीवन जगतो, पण दुसऱ्याच्या अधिकारांचं काय? तसेच आंदोलन हा लोकशाहीचा भाग आहे. पण आंदोलन करताना सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणं हा देशद्रोह आहे. अनेक पक्ष, संघटना आंदोलन करतात आणि देशाच्या मालमत्तेचे नुकसान करतात, घाण पसरवतात. मग आंदोलन तुम्ही कशासाठी करताय? विचार करा ज्या रेल्वे गाड्या जाळल्या जातात, त्या सामान्य माणसाच्या आहेत. ज्या बसेस फोडल्या जातात, त्या गरीब प्रवाशांच्या आहेत. मग आंदोलन कोणासाठी? स्वतःच्या न्यायासाठी की दुसऱ्यांवर अन्याय करण्यासाठी? उजवे आणि डावे दोन्ही प्रकारचे लोक यावर बोलत नाहीत. काहींना वाटतं की आपणच देशप्रेमी आहोत आणि काहींना वाटतं की आपणच मोठे सुधारक, पुरोगामी आहोत. पण शिस्त हेच खरं पुरोगामित्व आहे आणि खरी देशभक्ती आहे.

आपण फार मोठे देशभक्त आहोत असं म्हणतो. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला ध्वजवंदन करतो. पण दुसऱ्या दिवशी रस्त्यावर थुंकतो. कचरा फेकतो. ट्रेनमध्ये सीटवर पाय ठेवतो. कागदाचे आणि प्लॅस्टिकचे झेंडे रस्त्यावरच टाकतो. ही देशभक्ती आहे की दिखावा? खरी देशभक्ती म्हणजे आपण ज्या देशात राहतो, त्याची काळजी घेतली पाहिजे. देशद्रोह म्हणजे फक्त शत्रूला मदत करणं नव्हे. तर देशद्रोह म्हणजे देशात घाण करणं, नियम मोडणं, दुसऱ्याच्या अधिकारांचं हनन करणं. जर आपण हे थांबवलं, तर देश आपोआप स्वच्छ, सुंदर, सुसंस्कृत होईल. त्या विदेशी व्लॉगरने आपल्याला आरसा दाखवला. मध्ये एक व्हिडीओ व्हायरल झाला होता की एका विदेशीला लोक शिव्या देत होते. कारण त्याला भारतीय शिव्या कळत नाहीत. त्याची मस्करी करत होते. आपला भारत हा विविध परंपरांनी नटलेला आहे. विविध भौगोलिक भागांनी सजलेला आहे. जग किती सुंदर आहे हे लोकांना कळावं म्हणून देवाने भारत बनवला. असं योगी अरविंद म्हणून गेलेत. हा सुंदर देश सुंदर ठेवण्याची आपली जबाबदारी आहे. विदेशी लोकांच्या भारत भ्रमंतीमुळे सुद्धा आपले अर्थकारण चालतंय. म्हणून देशभक्ती किंवा पुरोगामित्व यावर चर्चा करण्याआधी आपन शिस्तीवर चर्चा करायला हवी. आपल्या देशाची प्रतिमा आपल्यामुळे वाईट होणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. संविधान वाचवायच्या बढाया मारून काही होणार नाही. रस्त्यावर घाण करणारा व नासधूस करणारा माणूस संविधानप्रेमी असूच शकत नाही. आपण नावाला भारतीय आहोत. पण खऱ्या अर्थाने आपण भारतीय कधी होणार? जेव्हा आपण रस्त्यावर थुंकणं बंद करू, जेव्हा आपण कचरा डब्यात टाकू, जेव्हा आपण गर्दीमध्ये संयमाने वागू. जेव्हा आपण दुसऱ्याच्या अधिकारांचा आदर करू, तेव्हा आपण खरे भारतीय होऊ. ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# सायबर सुरक्षा जागृतीनंतर पुढे काय?

सायबर गुन्हेगारांनी संपूर्ण जगात आपला वरचष्मा निर्माण केला आहे. यामुळे जगातील प्रत्येक सज्जन माणूस आज फार मोठ्या दहशतीत वावरत आहे. त्याचे बँकेतील पैसेही सुरक्षित राहिलेले नाहीत. अशा स्थितीत सायबर गुन्हेगारांपासून स्वत:ला सुरक्षित कसे ठेवायचे यासंदर्भातील जनजागृती अभियान नागपूर ग्रामीण पोलिसांनी देवलापार, रामटेक, पारशिवनी, सावनेर, वेलतूर, कुही, बुटीबोरी, काटोल, नरखेड, जलालखेडा, बेला, उमरेड, भिवापूर, कन्हान, मौदा, अरोली, केळवद, कळमेश्वर, खापा, कोंढाळी, एमआयडीसी बुटीबोरी या २१ पोलिस स्टेशन अंतर्गत राबविले. या भागात राहणाऱ्या जनतेशी थेट संवाद साधत त्यांना सायबर गुन्हेगारांपासून नेमका बचाव कसा करायचा यावर मार्गदर्शन करण्यात आले. खरोखरच हे अभियान लोकहिताचेच आहे. याबद्दल नागपूर ग्रामीण पोलिसांचे अभिनंदन. पण केवळ अभियान राबवून काम होणार आहे का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. सायबर गुन्हेगार वर्तमानातील पोलिस यंत्रणेपेक्षा दहा पट चाणाक्ष आहेत. शिवाय सायबर गुन्हेगारांवर वचक ठेवण्याचे काम केवळ पोलिसांचे नाही. तर त्यात बँकांचीही काही जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आलेली आहे. सर्व व्यवहार हा बँकांमार्फत होतो. मग सायबर गुन्हेगारांवर वचक ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांवर ढकलणे म्हणजे अन्याय करण्यासारखे होईल.



कमी मनुष्यबळामुळे पोलिस यंत्रणा तणावात वावरत असते. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा अजून बोजा टाकणे न्यायोचित नाही. म्हणूनच सायबर गुन्हेगारी होणारच नाही अशीच फूलप्रूफ यंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज आहे. याकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुढाकार घेत सर्व बँकांना दिशानिर्देश द्यायला हवेत. पैसे पाठविणारा आणि खातेधारकाची परवानगी न घेता रुपये परस्पर वळविणाऱ्या गुन्हेगारांना रोखण्याचे काम बँकांनीही करायला हवे. ऑफलाईन व्यवहार असताना बँकांना विश्वसनीय केंद्र मानले जायचे. मग ऑनलाईन होताच हीच यंत्रणा अविश्वसनीयतेकडे वाटचाल का करीत आहे, यावरही मंथन होणे गरजेचे आहे. समजा एखाद्याच्या खात्यातील पैसे सायबर गुन्हेगाराने वळते केले तर संबंधित बँकेतील कर्मचारी पीडितांना मदत करीत नाहीत. वस्तुत: जसे पैसे वळते झाले तसेच ते बँकांना थांबविण्याचा अधिकार असावा. पण तशी युद्धपातळीवर कारवाई होत नसल्याने सायबर गुन्हेगार लाभात राहतात. अनेकदा गुन्हेगार बाहेर देशात बसून हा गोरखधंदा करीत असतात. आता देशातीलच गुन्हेगारांना पकडणे कठीण असताना विदेशातील आरोपींना कसे पकडणार हाच मुद्दा रक्तदाब वाढविणारा ठरतो.

पारशिवनी येथे दर सोमवारी आठवडी बाजार भरतो. या बाजारात मोबाईल चोरांच्या टोळ्या येतात आणि मिळेल तेवढे मोबाईल चोरून नेतात. ज्यांचे मोबाईल चोरीला जातात त्यांना नेट कॅफेत जाऊन २०० रुपये मोजूनच तक्रार करावी लागते. कारण मोबाईल चोरीस गेल्यावर प्रथमत: एका विशिष्ट वेबसाईटवर माहिती टाकावी लागते. जेणेकरून सीमकार्ड बंद करता येईल. पण याकरिता पोलिसांकडे यंत्रणा नाही का? ते थेट नेट कॅफेत जा आणि तक्रार करा असा अफलातून सल्ला का देतात? यावरही मंथन करावे लागेल. केवळ जनजागृती केल्याने सायबर गुन्हेगारी थांबणार नाही. यावर उपाय म्हणून पोलिसांच्या मदतीला प्रत्येक ठाण्यात दोन सायबर तज्ज्ञांची नियुक्ती करायला हवी. एवढेच नव्हे तर सायबर गुन्हेगारांच्या विरोधात कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. दोन चार सायबर गुन्हेगारांना सार्वजनिक ठिकाणी कडक शिक्षा देण्याचीही गरज आहे. अशावेळी जनतेसह सरकारनेही पोलिसांच्या पाठीशी राहणेही अभिप्रेत आहे. सायबर गुन्हेगार हाती शस्त्र असलेल्या दरोडेखोरांपेक्षाही भयानक आहेत. यामुळे त्यांच्याशी लढणारे पोलिस दलही तेवढेच सक्षम असायला हवे. कुठल्याही कर्मचाऱ्याला तिथे बसवून काम होणार नाही. याकरिता तज्ज्ञ लोकांची मदत पोलिस यंत्रणेला पुरविणे काळाची गरज आहे. तेव्हाच देशातील सायबर गुन्हेगारी संपुष्टात येईल. शिवाय मोबाईल हाताळणाऱ्यांनीही हाती असलेल्या शस्त्राचा योग्य वापर करावा. आलेल्या प्रत्येक लिंकवर क्लिक करण्याचा मोह त्यांनी टाळावा. ▮

९८२२४६८६६०

## निमित्त

# अविचल व प्रेरक संशोधननिष्ठा

**प्रा. डॉ. अजय देशपांडे**


**(१ व २ नोव्हेंबरला यवतमाळ येथे ६९ वे विदर्भ साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनानिमित्त...)**

संशोधनास प्रतिकूल वातावरण विदर्भ या प्रदेशाचे एक वैशिष्ट्य आहे तसेच संशोधक व संशोधनग्रंथ यांची अक्षम्य उपेक्षादेखील या प्रांताने अनेकदा केली आहे. पण प्रतिकूल परिस्थिती हीच संशोधनाची योग्य वेळ असते. याची प्रचीती विदर्भातील अनेक संशोधकांनी वेळोवेळी घडवली आहे.


विद्याव्यासंगी थोर संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांच्या आयुष्यातील एक घटना त्यांची आणि लोकनायक बापूजी अणे यांची प्रतिकूल काळातील अविचल संशोधननिष्ठा दर्शवणारी आहे.

१९०६ मध्ये अमरावतीला डॉ. देशपांडे आणि लोकनायक बापूजी अणे यांची पहिली भेट वणी येथील रामभाऊ भागवत यांनी करून दिली. तेव्हापासून या दोघांतील स्नेहबंध कायम होते. पुढे १९२६ मध्ये यवतमाळ येथे शारदाश्रम ही संस्था स्थापन झाली. लोकनायक अणे या संस्थेचे अध्यक्ष आणि डॉ. देशपांडे चिटणीस होते.

१९३८ साली स्वित्झर्लंडमधील झ्युरिच येथे होणाऱ्या जागतिक ऐतिहासिक परिषद आणि बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्यापरिषद या दोन महत्त्वाच्या परिषदांना प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहावयाचे व शोधनिबंध सादर करावयाचे निमंत्रण एक वर्ष अगोदर शारदाश्रम या संस्थेचे चिटणीस डॉ. देशपांडे यांना प्राप्त झाले. पण संस्थेची आणि डॉ. देशपांडे यांचीही पाच हजार रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय परिषदेस जाण्याची आर्थिक परिस्थिती नव्हती. परिषदेचे निमंत्रण मिळाले असले तरी त्यासाठीचा खर्च परवडणारा नाही , मुख्य म्हणजे तेवढ्या रकमेची तजवीज होणे अशक्य आहे असे डॉ. देशपांडे यांनी लोकनायक बापूजींना सांगितले. डॉ. देशपांडे



डॉ. य. खु. देशपांडे



बापूजी अणे



ॲड. द. बा. महाजन

यांच्या अविचल संशोधननिष्ठेविषयी व अविश्रांत संशोधनवृत्तीविषयी अपार स्नेहादर असलेल्या बापूजींनी त्यांना परिषदेस जाण्याची तयारी करा, शोधनिबंध लिहा; पाच हजार रुपयांच्या खर्चाची तरतूद होईल, असे सांगितले. परिषदेला तीन महिने अवधी असताना लोकनायकांनी हजार रुपयांची तरतूद करून देत डॉ. देशपांडे यांना जाण्या-येण्याची तिकिटे व आवश्यक ते साहित्य वगैरे घेण्यास सांगितले. पुढे ऑक्टोबर १९३८ ते एप्रिल १९३९ म्हणजे सात महिने डॉ. देशपांडे यांनी परदेशात राहून संशोधन केले. त्यांचा पूर्ण खर्च पाच हजार रुपये लोकनायकांनी दिला. या प्रवासासाठी दिली येथील भुलाभाई देसाई यांनी सातशे रुपयांचा धनादेश देऊन मदत केली असे लोकनायक सांगत. पण उर्वरित रक्कम लोकनायकांनीच आपल्या परीने उभी केली. डॉ. देशपांडे यांच्या संशोधनाला लोकनायकांची सहृदयी आस्था लाभली होती. हे सारे डॉ. देशपांडे व ॲड. नारायण हूड यांनी लिहून ठेवले, म्हणूनच आज सांगणे शक्य होते.

डॉ. देशपांडे यांनी आयुष्यभर प्राणपणाने प्रचंड संशोधन केले. त्यांनी सुमारे पाच हजार संस्कृत व मराठी हस्तलिखित ग्रंथ, सुमारे दोन हजार मराठी व फारशी ऐतिहासिक कागदपत्रे आणि विविध नाणी, शिलालेख, ताम्रपट, ऐतिहासिक स्थळांची व वास्तू शिल्पांची छायाचित्रे, दुर्मिळ मूर्ती अशी अमूल्य सामुग्री परिश्रमपूर्वक संग्रहित केली. नवी मर्मदृष्टी देणारे विपुल असे मौलिक संशोधन केले.

डॉ. देशपांडे यांचे संशोधन व स्फुट लेखन काळाच्या पडद्याआड जाऊ नये म्हणून संशोधनाप्रति अपार आदर असणाऱ्या प्राचार्य राम शेवाळकर यांनी डॉ. य. खु. देशपांडे यांचा निवडक लेखसंग्रह - यशोधन हा ग्रंथ परिश्रमपूर्वक संपादित केला व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा ग्रंथ १९८८ मध्ये प्रकाशित केला. म्हणून डॉ. देशपांडे यांचे काही संशोधन पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवले गेले.

त्याकाळी यवतमाळसारख्या ठिकाणीही अत्यंत सजगपणे, निष्ठेने, पदरमोड करून संशोधनाचे कार्य सुरू होते. आता त्या साऱ्या संशोधनकार्याचे स्मरण सुद्धा केले जात नाही. १९५३ मध्ये "विदर्भ संशोधनाचा इतिहास" हा ग्रंथ आणि ॲड. नारायण नागोराव हूड हे नाव आता विस्मृतीच्या गर्तेत गेले आहे. ॲड. प्र. रा. देशमुख यांनी सिंधू संस्कृती, ऋग्वेद व हिंदू संस्कृती हा १९६६ मध्ये परिश्रमपूर्वक लिहिलेला महत्त्वाचा संशोधन ग्रंथ विस्मृतीत जाण्याआधीच पुनर्मुद्रित करण्याची गरज आहे. ॲड. द. बा. महाजन यांनी परिश्रमपूर्वक व अपार निष्ठेने संशोधन करून "सिंदखेडकर राजे जाधवरावांची बखर" हा ग्रंथ सिद्ध करून १९६८ मध्ये स्वत: प्रकाशित केला. एकूण काय तर डॉ. देशपांडे यांच्यापासून आजतागायत यवतमाळ येथे संशोधनाचे कार्य सुरूच आहे. आजही यवतमाळात डॉ. अशोक राणांसारखे अभ्यासक निष्ठेने एकाकीपणे संशोधन करीत आहेत. पण आज विदर्भात संशोधकांना सहकार्य करणाऱ्या सहृदयी, उदार, निष्ठावंत, खंबीर माणसांची आणि संशोधनाची दखल घेत संशोधनकार्याच्या बाजूने आस्थापूर्वक नि:पक्षपणे उभ्या राहणाऱ्या कृतिशील संस्थांची मात्र मोठी उणीव आहे. ▮

९८५०५९३०३०

## निसर्गाचा लहरीपणा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे. कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. आता हेच पाहा ना. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागांत पाऊस



सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. अलिकडे ऋतुमान बदलत आहे. कोणत्याच ऋतूची सुरुवात वेळेवर होत नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत संपूर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### निर्ढावलेल्या मानसिकतेला जबाबदार कोण?

डॉ. संपदा मुंढे ही फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होती. शासकीय रुग्णालयाचा आणि पोलिस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांचा सतत संबंध येत असतो. अपघातात मरण पावलेल्या अथवा खून झालेल्या व्यक्तीचा आपल्याला हवा तसा शवविच्छेदन अहवाल द्यावा म्हणून पैसा आणि मनगटाद्वारे दबाव आणण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो. संपदावरही असाच दबाव आणला गेला. आरोपींना पोलिस कोठडी मिळावी म्हणून फिटनेस सर्टिफिकेट देण्यासाठी आणि शवविच्छेदन अहवालात फेरबदल करण्यासाठी पोलिस दबाव आणत असल्याची तक्रार संपदाने फलटण उपविभागीय पोलिस अधिकाऱ्याकडे केली होती. या तक्रारीत गोपाल बदनेचेही नाव होते. या तक्रारींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाहीच उलट संपदाने आरोपी अनफिट असल्याचे प्रमाणपत्र मुद्दाम दिल्याचे आणि यामुळे आरोपींच्या अटकेस उशीर होत असल्याची संपदाविरुद्ध लेखी तक्रार सातारा सिव्हिल सर्जनकडे फलटण पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी केली. यावरून फलटण पोलिस स्टेशनचे इतर अधिकारी आणि गोपाल बदने कशाप्रकारे संपदाचा मानसिक छळ करीत होते हे लक्षात येते. संपदाने आपल्या तक्रारीत पोलिस स्टेशनमधील कर्मचारीअपशब्द वापरत असल्याची आणि मानसिक त्रास देत असल्याचे लिहिले होते तसेच आपल्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास पोलिसच जबाबदार राहतील असे या तक्रारीची चौकशी करणाऱ्या समितीला लिहिलेल्या चार पानी पत्रात तिने म्हटले होते.

दुर्दैवाने बदनेवर कोणतीही कारवाई झाली नाही. शेवटी संपदाने माहितीच्या अधिकारांतर्गत १३ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना पत्र लिहून काय कारवाई केली अशी विचारणा केली. तक्रारीची वरिष्ठ पातळीवर दखल घेतली जात नसल्याने संपदा मनाने खचली असावी. समाजातील प्रत्येकाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेले पोलिसच जेव्हा अत्याचारी होतात तेव्हा न्याय कोणाकडे मागायचा? सरकारी यंत्रणेतील भ्रष्ट, नीच कर्मचाऱ्यांनी संपदाचा बळी घेतला आहे. गुन्हेगारांशी साटेलोटे असलेल्या समाजकंटक यंत्रणा त्यांच्यासाठी सरसावून पुढे येतात. त्यामुळे आज 'जेल' उद्या 'बेल ' त्यानंतर पुन्हा हाच 'खेल' याची गुन्हेगारांना खात्री असते. ▮

**कल्पना माहूरकर**/नागपूर

● ● ● ●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-२९

शनिवार, १ नोव्हेंबर २०२५

### राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे

राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे
राष्ट्रजीवनात जीव जीवनान्त पाहु दे ॥धृ.॥

सोड भोग मोह स्वार्थ देह तुझा झिजो परार्थ
चंदनी सुगंध मंद आसमंत भारु दे ॥१॥

ध्येयभाव जो मनात येउ दे तुझ्या कृतीत
कार्याची कीर्तिध्वजा दुरदेशि फडकु दे ॥२॥

कर्मयोग हा ज्वलंत स्वीकारी तू नितांत दिव्य
तुझ्या हवनातुनि दीपमाळ उजळु दे ॥३॥

नकोत अन्य यज्ञ याग त्याग हाच मान याग
बंदिवान आत्मतेज आज मुक्त होउ दे ॥४॥



# सांगोला महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑक्टोबर -**

सांगोला महाविद्यालयामध्ये शुक्रवार दि.३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच यावेळी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

याप्रसंगी आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.रामचंद्र पवार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन डॉ.सदाशिव देवकर व प्रदिप आसबे यांनी केले.

# मंगळवेढा शहरात कल्याण नावाचा अवैध मटका घेणाऱ्या दोघांवर पोलिसांची धडक कारवाई

**मंगळवेढा, दि. ३१ ऑक्टोबर-**

शहरातील भाजी मंडईच्या कट्टयावर बसून कल्याण नावाचा मटका जुगार घेत असलेल्या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून ५ हजार ३६० रुपये रोख रक्कम जप्त करून नईम सिरारोद्दीन खतीब वय ५७, मालक अभिजीत गणपत घुले या दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.३० रोजी पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर बीटचे पोलिस हवालदार दत्तात्रय व्हरे व अन्य पोलिस कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना शहरातील भाजी मंडईत एका कट्टयावर एक इसम रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडून अंक आकडयावर पैसे घेवून कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यावर ५.४५ वाजता पोलिसांनी छापा टाकला त्यावेळी एक इसम कट्टयावर बसून आकडेमोड करीत होता. पोलिसांनी नईम खतीब यास ताब्यात घेवून जुगार खेळून आलेली रोख रक्कम कोणास देतो व कोणाच्या सांगण्यावरून जुगाराची रक्कम घेतो असे विचारले असता त्याने मालक अभिजीत गणपत घुले यांचे सांगण्यावरून घेत असल्याचे सांगितले असल्याचे पोलिस अंमलदार विनायक जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. मंगळवेढा शहरात बोकाळलेल्या अवैध धंदयाबाबत कर्तव्यदक्ष पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे लेखी तक्रार केल्याने सदरची कारवाई तात्काळ दखल घेवून करण्यात आली आहे. भविष्यातही गोरगरीबांचे संसार बेचिराख करणाऱ्या अवैध व्यवसायिकांवर कारवाईचे सत्र सुरुच ठेवावे असाही सूर पुढे येत आहे.

येथे पोलिस उपविभागीय अधिकारी दर्जाचे अधिकारी असतानाही अवैध धंदयाच्या कारवाईसाठी अद्यापतरी पथके नेमली नसल्यामुळे अवैध धंदयाला सुळसुळाट वाढल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. पोलिस अधिकार्यांनी अवैध व्यवसायावर आपला अंकुश ठेवावा अन्यथा व्यवसायिक मुजोर होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याच्या भावना व्यक्त होत आहेत.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग**
इंद्रभुवन, रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, सोलापूर -४१३००१
ई मेल:drainsmc@gmail.com टेलिफोन नं:-०२९७-२७४०३५०

जा.क्र./सा.आ.अ./जनि/१४१७ दि. ३१/१०/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

सोलापुर महानगरपालिका सार्व आरोग्य अभियंता कार्यालकडील ड्रेनेज विभागाकडील खाली नमूद कामाचे ई- निविदेबाबत.

१. Tender ID-2025_SMC_1237211_1

या कामांचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०१/११/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

कळावे दि.३१/१०/२०२५

**सही/-**
**सहा अभियंता ड्रेनेज**
**सोलापुर महानगरपालिका**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**जैव-शौचालयांचे**

निविदा सूचना क्रमांकः GEM/२०२५/B/६७८९७९७ दिनांक २८.१०.२०२५

डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. कामाचे नाव त्याच्या परिसरासहः सोलापूर विभागातील कोचमध्ये बायो-शौचालयांचे वार्षिक देखभाल आणि ऑपरेशन करार (AMOC). निविदा प्रणालीः दोन पॅकेट प्रणाली. कामाची अंदाजे किंमतः रु. २,३४,४८,८४३.१८/- निविदा फॉर्मची किंमतः शून्य. निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ताः डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. जमा करावयाची बयाणा रक्कमः रु. २,६७,२५०/- काम पूर्ण होण्याचा कालावधीः ३१ महिने. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळः १८.११.२०२५ वेळ १३:००. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळः १८.११.२०२५ वेळ १३:३०. वेबसाइट तपशील आणि सूचना फलकाचे ठिकाण जेथे निविदांचे संपूर्ण तपशील पाहता येतीलः www.Gem.gov.in

Sr.DME/सोलापूर 72

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

## सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज, ता. माळशिरस जि. सोलापूर

**ताबा नोटीस नमुना झेड (Z NOTICE)**

**म.स.सं. अधिनियम १९६० नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड) (१)**

### स्थावर मालमत्तेचा सिम्बॉलिक ताबा घेतल्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी मला प्राप्त म.स.सं. कलम १५६ च्या अधिकारानुसार मी वसुली व विक्री अधिकारी सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज, ता. माळशिरस यांच्या खालील थकबाकीदारास म.स.सं. अधिनियम १९६० नियम १९६१ अन्वये मागणी नोटीसव्दारे त्यांच्याकडील येणे रकमा भरण्यास कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी म.स.सं. अधिनियम १९६१ मधील नियम १०७ (१०) व १०७ (११) (ड) (१) नुसार रितसर बोजा नोंद करून झेड नोटीसव्दारे सिम्बॉलिक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसव्दारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विक्री, गहाण खत, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत. याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज. ता. माळशिरस जि. सोलापूर यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुली अधिकारी अंशदान, अनुशांगीक खर्चास कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल यांची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदाराचे नांव व जामिनदाराचे नांव | मिळकतदाराचे नांव | दाखला क्र व दिनांक | झेड नोटीस रक्कम रू. दि. ३०.०६.२५ येणेबाकी | मिळकत ठिकाण | गट.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **शाखा वेळापूर** | | | | | | |
| १ | कासेगावकर अजय शरदराव<br>जा. १) नवगन दिपक चंद्रकांत<br>जा. २) कुदळे फकीर किसन | कुदळे फकीर किसन | ८२२-२००५<br>०४-११-२०११ | ४३१३.०२ | उघडेवाडी | १३४ | १.०५ आर |
| | **शाखा पिलीव** | | | | | | |
| १ | गोटे वनिता अशोक<br>जा.१) मदने सदाशिव दत्तू<br>जा.२) देवकर रघूनाव गणपत | मदने सदाशिव दत्तू | १७०४-२००७<br>०४-१२-२०१४ | ४९९२९१ | झिंजेवस्ती | २९३ हिश्यावर<br>२८७ हिश्यावर | ०.३८ आर पै. हिश्यावर<br>०.८३ आर पै. हिश्यावर |
| २ | सुळे लक्ष्मण निवृत्ती<br>जा.१) गलांडे रामचंद्र मारुती<br>जा.२)बुगड दत्तात्रय दिनकर | गलांडे रामचंद्र मारुती<br>सुळे लक्ष्मण निवृत्ती | १३२७-२००८<br>२३-०४-२०१२ | ८८०३३२ | पिलीव<br>सुळेवाडी | ७८१/३<br>४६४/२ | ६० आर<br>१.१० आर |
| ३ | देवकर शोभा रघुनाथ<br>जा.१) भैस लक्ष्मण बाबुसिंग<br>जा.२) टकले महेंद्र नारायण | भैस लक्ष्मण बाबुसिंग | १३४९-२००७<br>०९-०६-२०१० | ६६११७१ | पिलीव | १२८४<br>१२८५ | ३० आर<br>३८ आर<br>१ हे. ०२ आर |
| ४ | शेटे रमेश महादेव<br>जा.१) बुगड दत्तात्रय दिनकर<br>जा.२) खलिपे राहुल शरद | शेटे रमेश महादेव | १७०२-२००७<br>०४-१२-२०१४ | ४९२२१० | पिलीव<br>पठाणवस्ती | ३७४/१/अ/२/प/५ब<br>१२८ | २.७२ चौ.मी. बिगरशेती<br>०.२४ आर |
| ५ | बुगड मारती दत्ताशय<br>जा. १) तांबोळी रफीक कासीम<br>जा. २) देवकर रघुनाथ गणपत | बुगड मारती दत्तात्रय | १३४७-२००७<br>११-०७-२०१३ | ७९७४६२ | पिलीव | २८१/८<br>२८१/५<br>२८१/३<br>२८१/२/ब | ६८ आर<br>६९ आर<br>६९ आर<br>२० आर |
| ६ | रजपुत महेश सुरेंद्र<br>जा.१) खलिपे सचिन प्रकाश<br>जा.२) देवकर रघुनाथ गणपत | रजपुत सुरेंद्र मल्हारसिंग | २११-२००८<br>२८-०८-२०१५ | ४९३९८९ | कुसमोड | २३८ | १ हे.२० आर |
| ७ | तांबोळी रफीक कासीम<br>जा.१) मुलाणी अजीज मुसा<br>जा.२) गांधी कैलास मोतीचंद | तांबोळी कासीम सय्यद | ९२१-२००९<br>२०-१०-२०११ | २०४६०१ | पिलीव | ७५७/२ | १.५३.२३ चौ.मी. बिगरशेती |
| | **शाखा मुख्य कार्यालय** | | | | | | |
| १ | माने-देशमुख बाळासो भानुदास व उर्मिला<br>जा. १) पवार वसंत शिवदास<br>जा. २) माने देशमुख संजय विठ्ठलराव | माने-देशमुख बाळासो भानुदास | ३७३-२०१४<br>२७-०६-२०२२ | १४६३५६४ | खळवे | ३१५/१<br>३१६/२/ब<br>३१६/१/अ<br>३१४/१/अ | १ हे.३६ आर<br>०.६५ आर<br>०.२० भार<br>०.५१ आर |
| २ | माने देशमुख बाळासो भानुदास व दिनेश<br>जा.१) पवार वसंत शिवदास<br>जा.२) माने-देशमुख संजय विठ्ठलराव | माने-देशमुख बाळासो भानुदास | ३७१-२०१४<br>२७-०६-२०२२ | ४१९२४७ | खळवे | ३१५/१<br>३१६/२/ब<br>३१६/१/अ<br>३१४/१/अ | १ हे.३६ आर<br>०.६५ आर<br>०.२० आर<br>०.५१ आर |
| ३ | बागाव अंकुश लक्ष्मण<br>जा.१) चौगुले लक्ष्मण नामदेव<br>जा.२) कसबे सुनिल बळीराम | बागाव श्रीमंत अंकुश | २८५-२०१५<br>२२-०३-२०१८ | १०१७९१ | अकलुज | १०७/१/ब/२ | ०.५४ आर पै. |
| ४ | वाघुले अतुल नामदेव<br>जा.१) कळकतील ईस्माईल हसन<br>जा.२) साळूंखे यशवंत रामभाऊ | जा.) कळवतील ईस्माईल हसन<br>जा.) साळुंखे यशवंत रामभाऊ | १७१-२००९<br>०५-०९-२०११ | ५८७९१७८ | अकलूज<br>आनंदनगर | ११३/२/ब/६<br>१०३/२/ब/२ | ११.१० आर पै<br>०.३२.५२ चौ.मी.पै |
| ५ | कुंभार लक्ष्मण सावळा<br>जा-१) मोहिते शिवाजी नामदेव<br>जा-२) कुंभार अनिल गोविंद | जा.) कुंभार अनिल गोविंद | १२०१-२००९<br>१४-०१-२०१० | ९२७२५८ | अकलुज | १४५/२/अ/१/ब/१ | १९.३० चौ.मी. |
| ६ | डोईफोडे केरु लक्ष्मण<br>जा.१) काळकुटे उत्तम विठोबा<br>जा.२) बोराडे वसंत लालासो | डोईफोडे हौसराव केरु<br>डोईफोडे वैशाली अर्जुन | २४०-२००७<br>१४-१२-२००७ | ६२२४५२ | रेडणी | ४४७/१ | ०.६० आर |
| ७ | भोसले गौतम महादेव<br>जा.१) महिडा बैजू महिजी<br>जा-२) महिडा लता बैजु | भोसले आम्रपाली गौतम<br>भोसले सुकेशनी गौतम<br>भोसले मंदा गीतम | ६११-२०१३<br>०१-०३-२०१४ | १९८७२९ | तांबवे | १५/१ | २.२२ हे. आर पै. |
| ८ | शिंदे प्रकाश ज्ञानेश्वर<br>जा.१) काळे पांडुरंग तुकाराम<br>जा.२) माने ज्ञानेश्वर जगन्नाथ | काळे पाडुरंग तुकाराम | ४०८-२०१३<br>०१-०३-२०१४ | १०८६४६ | माळशिरस | १४९७/२<br>१४९३<br>१५०८/४ | ०.५० आर<br>१.१७ हे. आर.<br>१.११ हे. आर.पै. |
| ९ | पाटोळे सदाशिव बाळकु<br>जा.१) बोडरे निवुनी लक्ष्मण<br>जा.२) होले प्रदीप सोपान | पाटोळे सदाशिव बाळकु<br>ज्ञानदेव आप्पा पवळे | २४०-२००७<br>१४-१२-२००७ | ८३१९३७ | पानीव | १०७ | ४.९४ हे आर. |
| | **शाखा जयशंकर उद्यान** | | | | | | |
| १ | लोखंडे दिलीप मारूती<br>जा.१) जगताप बाळासाहेब रमेश<br>जा.२) भोसले दिपक किसन | जगताप बाळासाहेब रमेश | ५५०-२०१०<br>०४-०९-२०१३ | ४८५११९ | बागेवाडी | ४८/१/ब/१<br>६५/१/ब/१/ब/प/१ | ०.९१.९३ आर. चौ.मी.<br>२.१९.२९ आर. चौ.मी. हिश्यापुरती |
| २ | शेंडगे आप्पा बापू<br>जा.१) होनमाने शहाजी लिंबाजी<br>जा.२) पिसे नवनाथ पांडुरंग | पिसे नवनाथ पांडुरंग | १२५०-२००६<br>१२-०३-२००८ | १५१०५१ | पिसेवाडी | ६१०<br>६२४<br>५८४<br>६४२ | ०.१२.७५<br>०.१५.००<br>०.२५.५०<br>०.०८.०० |
| | **शाखा भाजी मंडई** | | | | | | |
| १ | खंडागळे पांडुरंग तुकाराम<br>जा. १) क्षीरसागर सुखदेव शिवाजी<br>जा २) सुर्यवंशी औदुंबर बबनराव | खंडागळे पांडुरंग तुकाराम | ५३१-२०१३<br>२९-०३-२०१४ | २७३३३८ | माळेवाडी (अ) | १०/२/अ/२/अ<br>१०/१/ब/१/अ/२ | ०.०२.०० आर<br>०.६३.५० आर. चौ.मी. पैकी |
| २ | गुंड प्रमोद चांगदेव<br>जा.१) देशमुख श्रीराज दिलीपराव<br>जा.२) बोडके राजेंद्र नारायण | बोडके राजेंद्र नारायण | ३९१६-२०१८<br>३१-३-२०१६ | १३१६३६६ | माळेवाडी (अ) | ४२/१/ब/२/ब/२/अ/२/ब/२ | ०.०७.०० आर. चौ.मी. |
| ३ | मिसाळ पांडुरंग गोरख<br>जा.१) चव्हाण अशोक विठोबा<br>जा.२) मिसाळ बबन नरहरी | मिसाळ पांडुरंग गोरख<br>जा.) चव्हाण अशोक विठोबा | ७९७-२०१५<br>२५-०१-२०२२ | १६७१८६१ | वाघोली<br>वाघोली | ३७८/२<br>३६२/२ | ०.३० हे. आर.<br>२.०३ हे. आर |
| ४ | डांगे जोतीराम महादेव<br>जा.१) ओसवाल देवचंद चुनीलाल<br>जा.२) साळुंखे प्रदीप मोहन | ओसवाल देवचंद चुनीलाल | २९०-२०१७<br>२३-०५-२०१५ | १६६५६७ | अकलुज | १२२/१/ब/२/प/१ | ०.०३.३५ आर. चौ.मी. |
| ५ | शिंदे गोपाळ समचंद्र<br>जा. १) पठाण हबीब लालखान<br>जा.२) गिरमे वसंत दत्तात्रय | जा.) पठाण हबीब लालखान | २६९६-२०१४<br>२९-०३-२०१४ | ५०४२६५ | अकलूज | ८१/१/ब/१/ब/२/प/४ | १.८२.०४ आर चौ. मी. पैकी हिश्यावर |
| ६ | कुंभार अनिल गोविंद व ज्योती अनिल कुंभार<br>जा.१) गुन्हाळकर सतिश गणपत<br>जा.२) रुपनवर बाबासो साधु | कुंभार अनिल गोविंद | २९१८-२०१६<br>३१-०३-२०१६ | १८९७५२० | अकलुज | १४५/२/अ/१/ब/१ | २.९० आर. ची. मी.पैकी हिश्यावर |
| ७ | बुराडे रविंद्र सुर्यकांत<br>जा.१) बोडके हरिदास काळबा<br>जा.२) रेवंडे संजय दत्तात्रय | बुराडे रविंद्र सुर्यकांत | ५५३९-२०१५<br>०२-०३-२०१५ | १२५१८६६ | आनंदनगर<br>आनंदनगर | २८/१<br>२५/२ब२ | १.३६ हे. आर<br>०.०४ पैकी हिश्यावर |
| ८ | मस्तुद रघुनाय सोपान<br>जा.१) भोसले गणपत शंकर<br>जा.२) साळवे भास्कर भिमराव | मस्तुद रघुनाथ सोपान | ४६०-२०१३<br>२९-०३-२०१४ | ३३९७७७ | अकलुज | १४५/१/१/२/प/१/अ | ०.५३.२५ आर चौ.मी. |
| ९ | कुरेशी आयुब फकिरमहंमद<br>जा.१) बागवान वाशीन हसन<br>जा.२) गोसावी संजय शिवाजीराव | कुरेशी आयुब फकिरमहंमद | ५८१-२०१५<br>०५-१०-२०१५ | ५५५०३ | अकलुज | ५२/१/अ | २.१० हे. आर. पैकी हिश्याचे |
| १० | बागवान हुसेन बाबुलाल<br>जा.१) लोंढे अशोक गुलाब<br>जा.२) बागवान अहमद महिबुब | बागवान हुसेन बाबुलाल | ४५९-२०१३<br>०१-०३-२०१४ | ३७१९२५ | अकलूज | ८८/१/प/१४ | ६१.७७ चौ.मी. |
| ११ | गुंड-पाटील केशव सुभाष<br>जा.१) खटके अमर बाळासो<br>जा-२) खंडागळे बाळासो शंकर | गुंड-पाटील केशव सुभाष | ३३३३.२०१६<br>२९-०२-२०१६ | ८८०३५८ | अकलूज | १३६६/१ | १.११ हे. आर. |
| १२ | सपताळे तानाजी तुकाराम<br>जा.१) गायकवाड जयकुमार संभाजी<br>जा.२) गायकवाड दत्तात्रय बबन | सपताळे तानाजी तुकाराम | २३६-२०१४<br>३०-०३-२०१५ | १५८७१० | अकलूज | ५२/१/अ | २.१० हे. आर. पैकी हिश्याची |
| १३ | शेख चाँद युसूफ<br>जा. १) शेख गफूर युसूफ<br>जा. २) लखेरी प्रताप पन्नालाल | जा.) शेख गफूर युसूफ | ३८९-२०१५<br>३०-०६-२०१५ | २५७३३३ | अकलुज | १४५/१/क/१/प/६ | १७०.००.०० आर चौ.मी. |
| १४ | तांबोळी नजीर खबुल<br>जा.१) शेख हाजीमलंग अब्दुल<br>जा.२) तांबोळी नजीर मौला | जा) शेख हाजीमलंग अब्दुल | २६९७-२०१४<br>२९.०३.२०१४ | २०१७१६ | अकलूज | ७८ | ०.०२.७८ आर चौ.मी. पैकी हिश्याची |
| १५ | अमोलिक रजनीकांत प्रभाकर<br>जा. १) अमोलीक हेमंत प्रभाकर<br>जा. २) कांबळे ऊमेश धर्मा | अमोलीक रजनीकांत प्रभाकर | २९२-२०१७<br>२३-०५-२०१७ | १४७०१०० | अकलूज | सि.स.नं. १५५१ | ६८.०३ चौ. मी. (घरजागा) |
| १६ | गाडेकर युवराज विष्णु<br>जा.१) गाडेकर रविराज विष्णु<br>जा.२) तांबोळी राजू चाँद | जा) गाडेकर रविराज विष्णु | २२९९-२०१४<br>०१-०३-२०१४ | ९३०४६४ | अकलुज | ८१/१/क/१अ | ०.००.६० आर चौ.मी. |
| १७ | साळवे भास्कर भिमराव<br>जा.१) मस्तुद रघुनाथ सोपान<br>जा.२) जाधव दत्ताय चांगदेव | साळवे भास्कर भिमराव | २५०-२०१०<br>२३-१०-२०१२ | ६६३९८३ | यशवंतनगर | ९१/१/ब/४८/प | ०.०२.८८ आर. ची. मी. |
| १८ | शेख रमजान साहेबलाल<br>जा.१) नागणे राजेंद्र तुकाराम<br>जा.२) शिनगारे कैलास मधुकर | जा.) नागणे राजेंद्र तुकाराम | ७६०-२००७<br>०३-०७-२०१२ | २९४३०५९ | अकलूज | ८८/१/प१४ | ०.०२.१३ आर चौ.मी. |
| १९ | शिवशरण बाबासो तेजप्पा<br>जा-१) शेख चाँद युसुफ<br>जा-२) साठे सुखदेव जगन्नाथ | शिवशरण बाबासो तेजप्पा | ८७७-२०१५<br>२५-०१-२०२२ | १४८१९७७ | अकलूज | १४८/१/ब/२/अ | ०.०३ हे. आर |
| २० | साठे सुखदेव जगन्नाथ<br>जा.१) शेख चाँद युसुफ<br>जा-२) शिवशरण बाबासो तेजप्पा | साठे सुखदेव जगन्नाथ | २२९-२०१४<br>२५-०१-२०२२ | १४४४५८३ | अकलुज | १४८/१/ब/२/अ | ०.०३ हे. आर |
| २१ | शेख मदिना आदम<br>जा.१) भोरी युसुफमहमद हुसेन<br>जा.२) शेख महमद अब्बास | शेख मदिना आदम | ३८८-२०१५<br>३०-०६-२०१५ | १७०१३९ | अकलूज | ५६/४/क | ०,००,७४०.०२ आर.चौ.मी. |
| २२ | ठोंबरे चंद्रकांत भागवत<br>जा.१) कारंडे अरुण महादेव<br>जा.२) एवतपुरे बबन निवृत्ती | ठोंबरे चंद्रकांत भागवत | ४७८-२०१५<br>१७-०७-२०१५ | ४१८९६६ | अकलुज | १०७/२/अ१ | १८५.७७ चौ.मी. |
| | **शाखा माळशिरस** | | | | | | |
| १ | १ नागरगोजे पांडुरंग दगडू<br>जा.१) पाटील अरूण नरहरी<br>जा.२) राखुंडे रामदास संदीपान | नागरगोजे पांडुरंग दगडू | ३१०-२००९<br>०९-०३-२०११ | १२७०९३७ | तोंडल ता. पुरंदर जि.पुणे | २५१<br>२६०<br>३६६<br>२४१<br>१११ | ०.२२ आर पैकी<br>२.२६. आर पैकी<br>०.२९ आर. पैकी<br>०.३७ आार पैकी<br>१ हे. ०४ आर पैकी |

ही ताबा नोटीस दिली असे
दि. / /२०२५

सील

**सही /-**
**वसुली व विक्री अधिकारी**
**सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज**
**ता. माळशिरस जि.सोलापुर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ▶▶ महत्वाचे...

### 'आयएमएस'च्या अपूर्वा अंधारेस तिहेरी मुकुट

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या अपूर्वा अंधारे हिची राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. येथील मार्कंडय जलतरण तलावावर झालेल्या पुणे विभागीय स्पर्धेत अपुर्वाने



१७ वर्षाखालील मुलींच्या गटात १ व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड आणि हायबोर्ड अशा प्रकारात तीन सुवर्णपदक पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर तिची निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक अक्षय माने व प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

### उमाबाई श्राविकाचा यश लोंढे जिल्हा क्रिकेट संघात

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
पुणे येथे होणाऱ्या आंतर जिल्हा क्रिकेट स्पर्धेसाठी येथील उमाबाई श्राविका विद्यालयातील यश लोंढे यांची १४ वर्षाखालील जिल्हा संघात निवड झाली.



यश हा युनायटेड क्रिकेट क्लबचा खेळाडू असून क्लबचे प्रशिक्षक चंद्रशेखर लोखंडे व क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

### गुरुकुल पब्लिक स्कूल करमाळाच्या ओम नरुटेला राज्य आर्चरी स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
यवतमाळ येथे झालेल्या राज्य शालेय धनुर्विद्या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात रिकव्हर राउंड या प्रकारात गुरुकुल पब्लिक स्कूल करमाळाच्या ओम नरुटे याने ६८५ गुण मिळवत रौप्य पदक मिळवले.



या कामदगिरीवर त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास क्रीडा शिक्षक सागर शिरस्कर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष भोगे व सचिव भोगे व एचओडी शिंदे, पवार यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### श्रीकृष्ण मेटकरीची राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

**वेळापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
वेळापूर येथील इंग्लिश स्कूल व संकल्प स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या श्रीकृष्ण ज्योती



बापू मेटकरी याची भोपाळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. नागपूर येथे झालेल्या राज्य शालेय नेमबाजी स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात श्रीकृष्णने सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन करत कांस्य संपादिले. त्याला अक्षय राऊत, सतीश कदम, शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले.




### जिल्हा रोल बॉल अजिंक्यपद स्पर्धा सोमवारी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
सोलापूर रोल बॉल असोसिएशनच्या वतीने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सा. ५ ते ६ वाजता शिंदे चौक येथील इंदिरा प्रशालेत १७ वर्षाखालील मुले आणि मुलींची जिल्हा रोल बॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा होईल. एक जानेवारी २००९ नंतर जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. या निवड चाचणीतून ८ व ९ नोव्हेंबर रोजी जळगाव येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी संघ निवडण्यात येणार आहे. नोंदणीसाठी प्रमोद म्हेत्रे (मो. ८६५७९०४१४३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रोलबॉल असोसिएशनचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष दशरथ गुरव, उपाध्यक्ष विठ्ठल कुंभार, सचिव प्रमोद चुंगे यांनी कळविले आहे.

# ऑस्ट्रेलियाचा ४ गड्यांनी विजय

### हेझलवूड, एलिसचा प्रभावी मारा

**◆ मेलबर्न, ३१ ऑक्टोबर**
शुक्रवारी येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतावर ४० चेंडू शिल्लक ठेवित ४ गडी राखून विजय मिळवला. वेगनवान गोलंदाज जोश हेझलवूड व नॅथन एलिसच्या प्रभावी माऱ्यामुळे भारताच्या फलंदाजीची अव्वल फळी कोसळली.



मिचेल मार्श व ट्रॅव्हिस हेडची विजयी खेळी



अभिषेक शर्माची एकाकी झुंज

८२,४३८ प्रेक्षकांसमोर, भारताला सर्वात लाजिरवाण्या पराभवांपैकी एकाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताला १८.४ षटकांत एकूण १२५ धावांत गुंडाळले, यात अभिषेक शर्मा व हर्षित राणा वगळता नऊ फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. ऑस्ट्रेलियाने १३.२ षटकांत ६ गडी गमावित विजयाचे लक्ष्य गाठले आणि पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

अभिषेक शर्माने ३७ चेंडूत ८ चौकार व २ षट्कारांसह ६८ धावा, तर हर्षित राणाने ३३ चेंडूत ३ चौकार व एका षट्कारसह ३५ धावा नोंदवून ऑस्ट्रेलियाला पाठलाग करण्यासाठी काहीतरी दिले. अभिषेक १९ व्या षटकात बाद झाला. त्याच्यासोबत राहिलेला एकमेव खेळाडू हर्षित राणा होता. हेझलवूडने १३ धावांत ३ बळी मिळविले, तर झेव्हियर बार्लेट व नॅथन एलिसने प्रत्येकी २ बळी टिपले. मार्कस स्टोयनिसने एक बळी मिळविला.

विजयासाठी १२६ धावांचा पाठलाग करताना मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेडने ५१ धावांची सलामी भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला अर्धी लढाई जिंकवून दिली. वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी हेडने १५ चेंडूत २८ धावा केल्या, तर कुलदीप यादवच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी मार्शने २६ चेंडूत ४६ धावा करताना चार षट्कार मारले. जोश इंग्लिसने २० चेंडूंत २० धावांची भर घातली.

जसप्रीत बुमराहने २६ धावांत २ बळी, वरुण चक्रवर्तीने २३ धावांत २ बळी, तर कुलदीप यादवने ४५ धावांत २ बळी टिपूनही भारताला विजय मिळविता आला नाही. ऑस्ट्रेलियाने ४० चेंडू शिल्लक असताना चार गड्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. (वृत्तसंस्था)

# तेंडुलकरसह दिग्गजांनी केले महिला संघाचे कौतुक

**◆ नवी मुंबई, ३१ ऑक्टोबर**
आयसीसी महिला वन-डे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी डी. वाय. पाटील स्टेडियमवर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने गत विजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात विक्रमी धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केल्याचे बघून महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर अनेक दिग्गजांनी आश्चर्य व्यक्त केले व भारतीय महिला क्रिकेटपटूंचे कौतुक केले. हा एक शानदार विजय असून हा इतिहासात कोरला जाईल असे अनेकांनी म्हटले आहे.



विजयाचा आनंद साजरा करताना जेमिमा रॉड्रिग्जसह भारतीय महिला क्रिकेटपटू

जेमिमाह रॉड्रिग्जने आपल्या कारकिर्दीची सर्वोत्तम खेळी केली आणि ऑस्ट्रेलियन संघाला रोखून भारताला तिसऱ्यांदा महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवून दिला.

जेमिमाचे हे तिसरे शतक आणि विश्वचषकातील पहिले शतक आहे. तिने कर्णधार हरमनप्रीत कौर (८८ चेंडूत ८९ धावा, १० चौकार, २ सहाकार) सोबत तिसऱ्या गड्यासाठी १६७ धावांची दमदार भागीदारी केली. या विजयामुळे भारताने गत दोन आवृत्त्यांमध्ये स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा १५ सामन्यांचा अपराजित प्रवास संपुष्टात आणला.

३३९ धावांच्या प्रचंड धावांचा पाठलाग करताना, जेमिमाहने आपल्या नाबाद खेळीने भारताला विजय मिळवू दिला. ऑस्ट्रेलियाच्या ३३८ धावांच्या प्रत्युत्तरात भारताने ४८.३ षटकांत ५ बाद ३४१ धावा केल्या. 'अद्‌भूत विजय! आघाडीवरून नेतृत्व केल्याबद्दल भारतीय महिला संघाचे अभिनंदन. तिरंगा उंच फडकवत ठेवा, असे सचिन तेंडुलकरने पोस्ट केले. भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक आणि महान लेग-स्पिनर अनिल कुंबळे यांनीही जेमिमाह रॉड्रिग्जच्या खेळीचे कौतुक केले. जेमिमाह रॉड्रिग्जची नाबाद १२७ धावांची खेळी ही परिपक्वता आणि आत्मविश्वास परिभाषित करणारी खेळी आहे, असे कुंबळेने म्हटले आहे.

विराट कोहलीनेही महिला संघाचे अभिनंदन केले आणि संघाच्या लवचिकतेचे, आत्मविश्वासाचे व उत्साहाचे कौतुक केले. ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यावर आमच्या संघाचा हा मोठा विजय आहे. मुलींनी केलेला उत्तम पाठलाग आणि जेमिमाहचा उत्कृष्ट कामगिरी प्रशंसनीय आहे. शाब्बास, टीम इंडिया!, असे कोहलीने पोस्ट केले.आणखी एक उपांत्य सामना आम्ही जिंकू व सहज अंतिम फेरीत पोहोचू असा ऑस्ट्रेलिया विचार करीत होता, परंतु आमच्या महिला क्रिकेटपटू विचार करत होत्या की, धमाका करण्याची हीच वेळ आहे. भारतीय महिला क्रिकेटपटूंनी काय कमालीचा खेळ दाखविला, आमच्या महिला संघाचा अभिमान आहे, असे भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग म्हणाला.

भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगनेही महिला संघाच्या दृढनिश्चय आणि दृढनिश्चयाचे कौतुक केले, विशेषतः रॉड्रिग्ज आणि हरमनप्रीतच्या धाडसी खेळींचे.

रविवारी नवी मुंबईत होणाऱ्या अंतिम सामन्यात भारत दक्षिण आफ्रिकेशी भिडणार आहे.

भारतीय संघाचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतनेही हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील संघाचे अभिनंदन केले. दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू एबी डिव्हिलियर्स म्हणाला की हा भारताकडून अविश्वसनीय विक्रमी पाठलाग होता. भारताचा माजी डावखुरा वेगवान गोलंदाज आणि समालोचक इरफान पठाण यांनीही महिला संघाच्या संयमाचे कौतुक केले. (वृत्तसंस्था)

### क्रीडा मंत्री मांडविया यांनीही केले अभिनंदन

ही भारताची स्त्रीशक्ती आहे, अशा शब्दात क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी महिला वन-डे विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियावर मिळविलेल्या भारताच्या विजयाचे कौतुक केले. महिला सक्षम...या साध्या पोस्टसह बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी संघाचे अभिनंदन केले.

# प्रज्ञानंद, अर्जुन, गुकेशकडून उत्तम कामगिरीची आशा

### फिडे बुद्धिबळ विश्वचषक आजपासून

**◆ पणजी, ३१ ऑक्टोबर**
शनिवारपासून येथे फिडे विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. भारताला विश्वविजेत्या डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद व अर्जुन एरिगसीकडून पुन्हा एकदा चांगली कामगिरी करण्याची आशा आहे.



नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन, हिकारू नाकामुरा व फॅबियानो कारुआना ही अमेरिकन जोडी स्पर्धा करत नसल्यामुळे विश्वविजेता डी. गुकेश आणि अर्जुन एरिगाइसी हे दोन प्रतिभावान खेळाडू या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न करतील. या स्पर्धेत रोख बक्षीस निधी दोन दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आहे.

या स्पर्धेत अव वल ठरणारे तीन खेळाडू २०२६ च्या कॅण्डिडेट बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे. ८० देशांमधील २०६ अव्वल बुद्धिबळपटू पुढील चार आठवडे गोव्यात आठ फेऱ्यांच्या, सिंगल-एलिमिनेशन नॉकआउट स्पर्धेत खेळण्यासाठी असतील. प्रत्येक सामन्यात मानक वेळेच्या नियंत्रणाखाली खेळले जाणारे दोन शास्त्रीय खेळ असतात. जर शास्त्रीय खेळांनंतर गुण बरोबरीत राहिले, तर खेळाडू तिसऱ्या दिवशी जलद आणि ब्लिट्झ टाय-ब्रेकच्या मालिकेसाठी परततील आणि कोण पुढे जाईल हे ठरवतील.

तीन अव्वल भारतीयांपैकी एक गुकेश हा विश्वविजेता आहे आणि पुढच्या वर्षीच्या अखेरीस जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र होण्यासाठी त्याला कॅण्डिडेट सायकलमधून जाण्याची आवश्यकता नाही.

प्रज्ञानंदला पुढील कॅण्डिडेट स्पर्धेत स्थान मिळण्याची खात्री झाली असली तरी, अर्जुन एरिगासी पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या सर्वात मोठ्या स्पर्धेत स्थान मिळविण्याच्या प्रयत्नात आहे, जे पुढील जागतिक अजिंक्यपद सामन्यात गुकेशला कोण आव्हान देईल हे ठरवेल. कॅन्डिडेटेट स्पर्धेसाठी विदित गुजराती आणि पेंटाला हरिकृष्ण यांनाही स्थान मिळण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

### महिला प्रीमियर लीग दोन टप्प्यात होणार

**नवी दिल्ली :** आगामी महिला प्रीमियर लीग २०२५-२६ हंगाम दोन टप्प्यात खेळवण्यात येणार आहे. पहिला टप्पा डिसेंबर-जानेवारीमध्ये सुरू होणार आहे आणि दुसरा एप्रिल-मे महिन्यामध्ये होईल. अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) आणि आयडब्ल्यूएल क्लब यांच्यात झालेल्या आभासी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, पहिल्या टप्प्याच्या नेमक्या तारखा नंतर निश्चित केल्या जातील. त्यानुसार, लीगचा पहिला टप्पा २० डिसेंबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे आणि ६ जानेवारीपर्यंत चालेल.

# धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूकचा २१ किमीचा नवा विक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
ग्रीन फिट इंडिया स्पोर्ट्सच्या एकता दौड अंतर्गत श्रद्धा सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त झालेल्या एक दिवसीय रन स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक यांनी २१ किमी अंतर कमी वेळेत पूर्ण करत स्वतःचाच विक्रम मोडीत काढला.



साईश्वर गुंटूक  श्रद्धा गुंटूक

जुळे सोलापुरातील स्वामी विवेकानंद प्रशालेतील साईश्वरने २१ किमी अंतर १ तास २७ मिनीटे २० सेकंदात तर तेवढेच अंतर श्रद्धाने अंतर १ तास ४० मिनिटे ३ सेकंदात पूर्ण केले. चॅम्पियन्स फिटनेस फिजिशियन एस एम एस हॉस्पिटलचे संस्थापक प्रशांत बटर यांच्या अध्यक्षतेखाली या स्पर्धेचे आयोजन केले.

ही स्पर्धा एसआरपीएफ कॅम्प सोरेगाव येथून सुरुवात करून जुळे सोलापूर भंडारी ग्राऊंड येथून पुन्हा एसआरपीएफ कॅम्प सोरेगाव अशा क्रमाने २१ किमी अंतर पार करण्यात आले. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडाप्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



# हँडबॉल स्पर्धेत 'संगमेश्वर'ला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजच्या मुलांच्या संघाने उपविजेतेपद संपादिले. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले

**उपविजयी संघ :** ओम सुरेश देवकांबळे, सिद्धेश्वर किशोर लादे, बालाजी जयकुमार कलागते, सुशांत श्रीशैल टुमणे, ऋतुराज अनंत जाधव, सुजलकुमार जितेंद्रकुमार चौहान, अथर्व सिद्धराम हेळवे, श्रेयस सोमनाथ साबणे, ओंकार संजयकुमार जेऊरगी, सोहम लब्बा, अथर्व भोगशेट्टी.

# शिवलीला कराटे अकॅडमीच्या ५ कराटेपटूंना ब्लॅक बेल्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
येथील शिवलीला स्पोर्ट्स कराटे अकॅडमीच्या पाच कराटेपटूंनी ब्लॅक बेल्ट सेकंड डिग्री प्राप्त केली. सिकंदराबाद हेडकॉटर येथे ग्रँड मास्टर मुख्य परीक्षक एस. श्रीनिवासन व सहाय्यक परीक्षक डी.रमेश हेडकॉटर चिप इन्स्ट्रक्टर यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा झाली. त्यांनाअकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक सेन्साई शिवशरण वाणीपरीट व सहाय्यक प्रशिक्षिका स्मिता वाणी परीट यांचे मार्गदर्शन लाभले

**ब्लॅक बेल्ट : सेकंड डिग्री प्राप्त :** प्रज्वल यशवंत वलेकर, नम्रता महेश कौडकी. **फर्स्ट डॅन कन्फर्मेशन :** आदिती सचिन फताले, जयराज बसवराज नवले, प्रेम प्रशांत जाधव.






# विद्यापीठ व्हॉलिबॉल स्पर्धेत बोरामणीच्या ग्लोबल व्हिलेजला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
कै. ब.ई.चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बोरामणीच्या संघाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत उपविजेतेपद संपादन केले.

माढा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन हॉलीबॉल संगमेश्वर महाविद्यालय विरुद्धच्या अटीतटीच्या अंतिम लढतीत उपविजेतेपद संपादले. त्यांचे संस्था अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी, सचिवा संगीता शहा, खजिनदार सुजाता बादोले व प्राचार्य डॉ.वाय.डी. पुजारी यांनी अभिनंदन केले.

**उपविजयी संघ :** कर्णधार सोवीत राठोड, उपकर्णधार सागर आचलकर, अजित राठोड, नागराज राठोड, यश राठोड , श्याम राठोड, सुजल राठोड, राहुल जाधव, चेतन राठोड, प्रेम राठोड, रितेश राठोड ,अमित राठोड. संघ व्यवस्थापक प्रा. प्रदीप राठोड.

### महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीसाठी

# अजित पवार गटाच्या ऑलिम्पिक पॅनेलची घोषणा

**मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-**
महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ऑलिम्पिक पॅनेलचे पारडे जड असल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या रविवारी होणाऱ्या एमओएच्या निवडणुकीत २१ उमेदवार अजित पवार गटाचे असून त्यापैकी ३ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.



**पुण्यातील बैठकीत महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतना उपमुख्यमंत्री अजीत पवार.**

मुंबईत २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी ऑलिम्पिक पॅनलची घोषणा माजी ऑलिम्पिकपटू आदिल सुमारीवाला यांनी केली आहे. मतदार ३१ संघटनांपैकी २५ पेक्षा अधिक संघटनांनी अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. ऑलिम्पिक पॅनेलचे१७ पैकी अधिक संघटनेचे उमेदवार असल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचा विजय निश्चित असल्याचे माजी ऑलिम्पिकपटू आदिल सुमारीवाला यांनी सांगितले आहे. आधीच उपाध्यक्ष पदासाठी आदिल सुमारीवाला, प्रदिप गंधे व .प्रशांत देशपांडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. विजयी उमेदवार आंतराष्ट्रीय बॅडमिंटपपटू प्रदिप गंधे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत देशात अव्वल स्थान पटकावले आहे. याचे सर्व श्रेय महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे आहे. अजित पवार यांच्या कार्यकुशल नेतृत्वामुळे एमओएच्या संकल्पनेतून महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनासह देशातील पहिले क्रीडा संग्रहालय साकार होत आहे. यामुळेच निवडणुकीत अजित पवार गटाला संघटनांनी पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेतील २५ पेक्षा अधिक संघटनांनी पुण्यातील बैठकीत उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांना जाहिर पाठिंबा दिला आहे. यावेळी पवार म्हणाले की, खेळीमेळीत होणाऱ्या निवडणुकीसाठी आपण सज्ज झालो आहोत. बिनविरोध निवड झालेल्या तीनही उपाध्यक्षांचे मी मनापासून अभिनंदन करत आहे.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ऑलिम्पिक पॅनेलचे उमेदवार**

अध्यक्ष - अजित पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष - अशोक पंडित, उपाध्यक्ष - आदिल सुमारीवाला, प्रदिप गंधे, प्रशांत देशपांडे (तिघे बिनविरोध निवड), सचिव - नामदेव शिरगांवकर, सहसचिव - चंद्रजीत जाधव, उदय डोंगरे, मनोज भोरे, निलेश जगताप, खजिनदार - स्मिता शिरोळे, कार्यकारिणी सदस्य - संदिप चौधरी, संदिप ओंबासे, राजेंद्र निम्बाते, गिरीश फडणीस, रणधीरसिंग, किरण चौगुले, समीर मुणगेकर, संजय वळवी, सोपान कटके



# 'ऑर्किड'ची कुस्ती स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत एन. के. ऑर्किड महाविद्यालयाच्या मल्लांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सातारा येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. त्यांचे प्राचार्य डॉ बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेथन, उपप्राचार्य डॉ. विनायक पत्की, सिनेट व व्यवस्थापन सदस्य प्रा सचिन गायकवाड यांनी अभिनंदन केले. या मल्लांना एआयडीएस विभागाचे प्रमुख डॉ एम बी पाटील, मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ एस एस काळे, क्रीडा कोऑर्डिनेटर प्रा जामदार, प्रा ऋचा श्रीराम, प्रमोद लिगाडे, दादा पांगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

**मल्लांची कामगिरी :** सौरभ पांढर मिसे (७९ किलो गटात द्वितीय) गणेश कचरे (७९ किलो गटात तृतीय), पृथ्वीराज गायकवाड (६३किलो खालील गटात चौथा), गणेश बनसोडे (५७ किलो खालील वजन गटात चौथा).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# फटाके फोडणे, लाऊडस्पीकर वाजवणे कोणत्याही धर्मात लिहिलेले नाही

## निवृत्त न्यायमूर्ती अभय ओक यांचे प्रतिपादन





◆ **नवी दिल्ली, ३१ ऑक्टोबर**

कोणताही धर्म पर्यावरणाचा ऱ्हास किंवा सजीव प्राण्यांना होणारी हानी मान्य करत नाही. फटाके फोडणे आणि लाऊडस्पीकर वापरणे हे अनिवार्य धार्मिक प्रथा नाहीत. दुर्दैवाने, कोणत्याही राजकारण्याने जनतेला सणांच्या वेळी पर्यावरणाचे प्रदूषण आणि नाश करण्यापासून परावृत्त करण्याचे आवाहन केलेले नाही. असे दिसते की राजकीय वर्गाला या कर्तव्याची जाणीव नाही किंवा त्यांना त्याची जाणीव नाही. काही अपवाद वगळता, आपल्या धार्मिक नेत्यांच्या बाबतीतही असेच आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अभय एस. ओक यांनी केले.

ते सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनच्या व्याख्यानमालेत बोलत होते. 'स्वच्छ हवा, हवामान न्याय आणि शाश्वत भविष्यासाठी एकत्र' असा या व्याख्यानमालेचा विषय होता.

निवृत्त न्यायमूर्ती ओक म्हणाले, धर्माच्या नावाखाली प्रदूषणाला न्याय देण्याची सवय वाढत आहे, परंतु प्रत्येक धर्म आपल्याला निसर्गाचे आणि सजीव प्राण्यांचे रक्षण करण्याचा संदेश देतो. फटाके फोडल्याने वृद्ध, आजारी, पक्षी आणि प्राण्यांना प्रचंड त्रास होतो, तर कोणी आनंदी कसे होऊ शकते? खरा आनंद आणि आनंद कुटुंब, नातेवाईक आणि मित्रांसोबत सण साजरे करण्यात आहे, फटाके वाजवण्यात किंवा मोठा आवाज करण्यात नाही. (वृत्तसंस्था)

### धार्मिक कार्यक्रम ध्वनिक्षेपकाशिवाय व्हावे

अजान आणि इतर धार्मिक समारंभ ध्वनिक्षेपकाशिवाय केले जाऊ शकतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालात असेही म्हटले आहे की, ही धार्मिक कृत्ये नाहीत. सर्वोच्च न्यायालयानेही हाच निर्णय कायम ठेवला आहे. देशातील न्यायालयांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की पर्यावरणाचे रक्षण करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, कारण ते सामान्य माणसापेक्षा ते करण्यासाठी खूप चांगल्या स्थितीत आहेत. न्यायाधीशांनी लोकप्रिय किंवा धार्मिक भावनांनी प्रभावित न होता नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे आणि पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. जर न्यायाधीशांनी त्यांचे मूलभूत कर्तव्य पार पाडले नाही तर कोण करेल, असा सवालही निवृत्त न्या. अभय ओक यांनी केला.

### वायू प्रदूषणावर केली होती सुनावणी

न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती नरसिंह यांच्या एकाच न्यायासनाने २०२३ मध्ये दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाच्या प्रकरणाची सुनावणी केली होती. त्यांनी दिल्लीसह देशभरात फटाक्यांवरील बंदीची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते.

## चीनचा अंतराळवीर २०३० पर्यंत चंद्रावर उतरणार

◆ **बीजिंग, ३१ ऑक्टोबर**

चंद्रावर मानव पाठवण्याशी संबंधित सर्व संशोधन आणि विकास प्रकल्प सुरळीतपणे सुरू असून २०३० चीनचे अंतराळवीर चंद्रावर उतरणार असल्याची माहिती चीनच्या मानवयुक्त अंतराळ कार्यक्रमाचे प्रवक्ते झांग जिंगबो यांनी गुरुवारी दिली.

जिंगबो यांनी सांगितले की, चीनच्या अंतराळवीरांचा एक गट चंद्रावर जाणार आहे आणि तिथे बांधकाम करण्यासाठी जागेचा शोध घेणार आहे. हे अभियान अंतराळात आघाडीवर राहण्याच्या चीनच्या योजनेचा एक भाग आहे. सध्या लॉन्ग मार्च-१० रॉकेट, चंद्र लॅण्डिंग सूट आणि एक्सप्लोरेशन व्हेईकल्ससारखे प्रकल्प वेगाने प्रगती करीत आहेत. तियांगोंग अंतराळ स्थानकावर नियमित संशोधनदेखील सुरू ठेवत आहे. अंतराळ स्थानकावर अंतराळवीरांचा एक गट लवकरच अंतराळ स्थानकावर जाणार आहे.

वातावरणाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी हे पथक चार उंदीर सोबत घेऊन जाणार आहे. दरम्यान, अमेरिकेने चीनच्या अंतराळ कार्यक्रमाचे पीपल्स लिबरेशन आर्मीशी थेट संबंध असल्याबद्दल सुरक्षा चिंता व्यक्त केली होती. (वृत्तसंस्था)

## तेजश्री प्रधान दिसणार नवीन वेबसिरीजमध्ये

**मुंबई :** तेजश्री प्रधान सध्या 'वीण दोघांतली तुटेना' या मालिकेत दिसते आहे. नुकतेच तिने समाजमाध्यमावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओवर तिने 'नवीन वेबसिरीज आणि नवीन काम' असे इंग्रजीमधील हॅशटॅग दिले आहे. यावरून ती आता एका नव्या वेबसिरीजमध्ये दिसणार असल्याचेही समोर आले आहे. ही वेबसिरीज कुठे प्रदर्शित होणार आणि कधी येणार याबाबत तिने अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही. या नवीन येणाऱ्या वेबसिरीजसाठी ती 'वीण दोघांतली तुटेना' ही मालिका सोडणार आहे का हे देखील अद्याप स्पष्ट झालेले नाही.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १२२/१ क व १२२/१ ड यांसी नविन सर्व्हे नं.१२०/१/क/१/ड यापैकी गंगाई केकडे नगर मधील कोटा ताता नगर या नांवाने ओळखले जाणारे वसाहती मधील बिनशेती प्लॉट नं. ३९० याचे क्षेत्र ४५.१२ चौ. मीटर इतकी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस :-रस्ता, दक्षिणेस :-प्लॉट नं.३८९, पश्चिमेस : प्लॉट नं. ३८५, उत्तरेस :-प्लॉट नं.३९१ येणेप्रमाणे चतुः सीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह.

ही मिळकत, १. निलेश केशव मच्छा, २. सौ. लावण्या निलेश मच्छा, रा. ६०४, साखर पेठ, सोलापूर यांचे मालकीचे असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही, कोणताही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ३१/१०/२०२५

**सही/-**

**अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम**

**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**

**मो.नं. ९८८१२४०५१६**


# पाकिस्तान तालिबानसमोर झुकला

## तुर्की, कतारच्या मध्यस्थीनंतर युद्धबंदीवर सहमती, अफगाणिस्तानच्या सर्व अटी मान्य



◆ **इस्तांबूल, ३१ ऑक्टोबर**

हिंसक संघर्षानंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती कायम होती. आठवडाभर चाललेल्या चर्चेनंतर सुरुवातीला पाकिस्तान दहशतवादी कारवायांसाठी अफगाणच्या भूमिचा वापर करण्याच अट ठेवली होती. मात्र, अफगाणमधील तालिबान सरकारने त्यांची अट फेटाळून लावल्याने युद्धबंदी करार रखडला होता. शुक्रवारी दोन्ही देशांच्या शिष्टमंडळाची तुर्कीच्या इस्तांबूल येथे पुन्हा बैठक झाली. यावेळी पाकिस्तानने अफगाणच्या अटी मान्य करीत करारावर सहमती दर्शवली.

तुर्की आणि कतारच्या मध्यस्थीनंतर दोन्ही देशांनी युद्धबंदी करार केला आणि शांतता कायम ठेवण्याचे मान्य केले. दोन्ही देशात मध्यस्थी करणाऱ्या तुर्कीने युद्धबंदी कराराची माहिती दिली. या महिन्यात प्राणघातक संघर्षानंतर पाकिस्तानने अफगाणची राजधानी काबूल आणि कंदहार शहरावर हवाई हल्ले केले. तुर्कीच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की २५-३० ऑक्टोबरच्या चर्चेनंतर, सर्व पक्षांनी शांतता राखण्यासाठी आणि उल्लंघन करणाऱ्यांवर दंड आकारण्यासाठी एक देखरेख आणि पडताळणी यंत्रणा स्थापन करण्यास सहमती दर्शविली. ६ नोव्हेंबर रोजी इस्तंबूलमध्ये ही यंत्रणा कशी अंमलात आणायची हे ठरवण्यासाठी एक पुढची बैठक होईल. तुर्की आणि कतार कायमस्वरूपी शांतता आणि स्थिरतेसाठी दोन्ही बाजूंशी सहकार्य सुरू ठेवण्यास तयार आहेत. तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी सांगितले की दोन्ही बाजूंनी भविष्यातील बैठकांमध्ये चर्चा सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली.

### संघर्षासाठी पाकच्या हवाई हल्ल्याला धरले जबाबदार

मुजाहिद यांनी सांगितले की, युद्धविरामासाठी पाकिस्तानने आमच्या सर्व अटी मान्य केल्या आहे. बैठकीत दोन्ही देशातील संघर्षासाठी पाकने केलेल्या हवाई हल्ल्याला जबाबदार धरण्यात आले. इस्तंबूलमध्ये झालेल्या बैठकींचा उद्देश १८-१९ ऑक्टोबर रोजी दोहा येथे झालेल्या युद्धबंदी कराराला बळकटी देणे होता. सर्व पक्षांनी युद्धबंदी कायम ठेवण्यास सहमती दर्शविली. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील शाश्वत शांतता आणि स्थिरतेसाठी सहकार्य सुरू ठेवण्यास तयार आहेत. (वृत्तसंस्था)

### पुन्हा कारवाई केल्यास सडेतोड प्रत्युत्तर देणार

जबीहुल्लाह मुजाहिद यांनी म्हटले, की अफगाणिस्तान त्याचा शेजारी देश पाकिस्तानशी परस्पर आदर आणि हस्तक्षेप न करण्याच्या आधारावर चांगले संबंध प्रस्थापित करण्यास इच्छुक आहे. यापुढे अफगाण भूमीवर हल्ला झाला तर पाकिस्तानला जबाबदार धरले जाईल. तुर्की आणि कतारच्या राजनैतिक प्रयत्नांमुळे आम्ही युद्धविराम आणि शांततेसाठी तयार झालो आहोत.

## इराणमध्ये युरेनियम समृद्धीचे कोणतेही पुरावे नाहीत

**न्यूयॉर्क, ३१ ऑक्टोबर -**

इराणमध्ये युरेनियम समृद्धीचे कोणतेही पुरावे आढळेले नाही, परंतु अणुभट्टी केंद्रांवर हालचाली दिसून आल्या, अशी माहिती आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेचे महासंचालक राफेल मारियानो यांनी दिली. बुधवारी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत मारियानो म्हणाले, आमच्या तपासणीत इराण सक्रियपणे युरेनियम समृद्ध करीत नसल्याचे दिसून आले, परंतु अलिकडेच अणुभट्टी केंद्रावर हालचाली निदर्शनास आल्याचा दावा इस्रायल व अमेरिकेच्या संरक्षण दलाने केला होता. आमच्या निरीक्षणात अणु केंद्राच्या ठिकाणी हालचाली दिसून आल्या. याची खातरजमा करण्यासाठी आमच्या निरीक्षकांना इराणच्या अणुस्थळांपर्यंत पोहोचता आले नाही.


### जाहीर समन्स प्रसिध्दीकरण

क्रमांक जमा-२/१५५/एसआर/६६/२०२५

**बार्शी येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

**१. महादेव सिताराम सोनके,**
रा. ममदापुर ता. बार्शी जि. सोलापूर

विरूध्द

१. पद्मीन मोतीराम चव्हाण,
२. प्रभाबाई शिवाजी शिंदे,
३. गिनाबाई दशरथ शिंदे. -- **सामनेवाला**
४. बाई भुजाबा सोनके,
५. साळूबाई भुजाबा सोनके
रा. पिंपळगाव (पां) ता. बार्शी जि. सोलापूर

**ज्याअर्थी,** सदरचा अर्ज यातील अर्जदाराने तुम्ही सामनेवाला नं. १ ते ५ यांचे विरुध्द मौजे पिंपळगाव (पां) ता. बार्शी येथील जमीन गट नं. ६२/१ चे ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील पोकळ नावे कमी करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. न्यायालयामार्फत यापूर्वी नोटीस पाठविले असता तुम्ही सदर अर्जामध्ये नमूद पत्त्यावर राहता किंवा कसे याबाबत कोणताही खुलासा मिळत नाही व तुम्ही सध्या कोठे राहता याबाबत सखोल चौकशी केली असता तुमचा पत्ता मिळून येत नाही त्यामुळे तुमचे विरुध्दचे सदर अर्जाच्या नोटीसीची बजावणी होत नाही.

**त्याअर्थी,** तुम्ही सामनेवाला नं. १ ते ५ यांनी सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ०४/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत विधिज्ञामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले. दिनांक :- ३०/१०/२०२५

**सही/-**
**(एफ.आर.शेख)**
**तहसिलदार बार्शी**


## डिजिटल अरेस्ट फसवणुकीनंतर वृद्धाचा मृत्यू

**पुणे :** डिजिटल अरेस्ट घोटाळ्यात १.२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्यानंतर अवघ्या एका महिन्यातच पुण्यातील एका वृद्धाचे हृदयविकाराने निधन झाले. यामध्ये फसवणूक करणाऱ्यांनी पोलिस आणि सीबीआय कर्मचारी असल्याचे भासवून त्याला आणि त्याच्या पत्नीला लक्ष्य केले, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्यानंतर एका आठवड्याने मंगळवारी या संदर्भात तक्रार दाखल केली, असे सायबर पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. फोन करणाऱ्याने नरेश गोयल मनी लॉण्ड्रिंग प्रकरणाचा उल्लेख केला आणि या प्रकरणातील त्यांचा सहभाग उघडकीस आला असल्याच फसवणूक करणाऱ्याने सांगितले. दुसऱ्या व्हिडीओ कॉल दरम्यान आयपीएस अधिकारी विजय खन्ना आणि सीबीआय अधिकारी दया नायक म्हणून ओळख असलेल्या दोन फसवणूक करणाऱ्यांनी त्याला आणि त्याच्या पत्नीला अटक करण्याची धमकी दिली, असे सायबर पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

## १४६६ सुरक्षा कर्मचाऱ्यांना केंद्रीय दक्षता पदक

**नवी दिल्ली :** गृह मंत्रालयाने देशभरातील १४६६ सुरक्षा कर्मचाऱ्यांची केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२५ साठी निवड केली आहे. याबाबतची घोषणा गृह मंत्रालयाने शुक्रवारी केली. हे पदक विशेष ऑपरेशन्स, इन्हेस्टिगेशन्स, इंटेलिजन्स आणि फॉरेन्सिक सायन्स या चार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामगिरी, व्यावसायिकता आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रेरित केल्याबद्दल प्रदान केली जातील.


### श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

५०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन ०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून यांनी महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० व निगम १९६१ व्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०६/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार समर्थ श्रीशैल माळी प्रो. प्रा. श्रीशैल शरणप्पा माळी रा. प्लॉट नं. २१०/११/३ हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर व जामीनदार १) कुंडलिक झुंबर खंडागळे रा. खंडागळे वस्ती उळे, दक्षिण सोलापूर २) लक्ष्मण ज्योती जोगदनकर रा. खंडोबाची वाडी सावरगाव ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद ३) गीतांजली श्रीशैल माळी रा.प्लॉट नं. २१०/११/३, हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये ३८,९२,०५८/- या वर दि. १७/११/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमेची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील**

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचे वर्णन | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीशैल शरणप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता उत्तर सोलापूर, सोमपा हद्दीमधील सर्व्हे न १५/२, सि.स. नं. ६३० सी, पैकी प्लॉट नं. १३. गौरी अपार्टमेंट, तळमजला, फ्लॅट न. २ चटई क्षेत्र ४९.१८ चौ.मी. व बिल्ट अप ५८.४२ चौ.मी (उताऱ्याप्रमाणे सुपर बिल्ट अप क्षेत्र ५२.२ चौ. मी) | | साईड मार्जिन | स्टेअर केस व लिफ्ट | साईड मार्जिन | रिअर मार्जिन | रु. २०,००,०००/- |
| श्रीशैल शरणाप्पा माळी | डि व सब डि सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे मुळेगांव, धवल नगर गट नं. १०६/अ + ब / ३ (ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे गट नं. १०६/अ/ब/३) | प्लॉट नं. १३१ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३१ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १२९ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३२ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३२ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३१ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३३ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३४ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३२ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३४ क्षेत्र ९२.८१ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३५ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३३ | रु. २,३०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३५ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३६ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३४ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३६ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३७ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३५ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३७ क्षेत्र १३७.५४चौ.मी | गट नं. १०६/४ | ले आ रस्ता | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३६ | रु. ४,००,०००/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | | | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दि. २५/११/२०२५ वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. २६/११/२०२५ सायं. ५:०० वा. | | | | |
| १७/११/२०२२ अखेर येणेबाकी | | | रु. ३८,९२.०५८/- दि. १८.११.२०२२ पासून होणारे व्याज, दंड व्याज व इतर खर्च | | | | |

टिप- १. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम लिलाव सुरु होण्यापूर्वी भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि. २४/११/२०२५ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर, आर.टी.जी.एस ने भरणा करावी.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - २३/१०/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**



### मध्य रेल्वे

**नोव्हेंबर २०२५ महिन्यासाठी ई-लिलाव कार्यक्रम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापक नोव्हेंबर २०२५ दरम्यान खालील वेळापत्रकानुसार भंगार विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करतील:

**महत्वाची सूचना:** नजीकच्या भविष्यात वर्तमानपत्रात ई-लिलाव कार्यक्रमाचे प्रकाशन बंद केले जाईल. खरेदीदारांना मध्य रेल्वे वेबसाइट ... ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

| लिलाव संचालक अधिकारी | लिलावाची तारीख आणि दिवस | | | | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| सीनियर डीएमएम/एनजीपी | ०३.११.२०२५ | १०.११.२०२५ | १८.११.२०२५ | २४.११.२०२५ | ७२१९६१२७५० |
| | सोमवार | सोमवार | मंगळवार | सोमवार | |
| सीनियर डीएमएम/बीएसएल एमएमआर डेपोसह | ०४.११.२०२५ | ११.११.२०२५ | १९.११.२०२५ | २५.११.२०२५ | ७२१९६११७५१ |
| | मंगळवार | मंगळवार | बुधवार | मंगळवार | |
| एसआर. डीएमएम/पीए | ०६.११.२०२५ | १३.११.२०२५ | २०.११.२०२५ | २६.११.२०२५ | ७२१९६१३७५० |
| | गुरुवार | गुरुवार | गुरुवार | बुधवार | |
| सीनियरडीएमएम/बीबी | ०७.११.२०२५ | १४.११.२०२५ | २१.११.२०२५ | २७.११.२०२५ | ८८२८११९७५० |
| | शुक्रवार | शुक्रवार | शुक्रवार | गुरुवार | |
| सीनियर डीएमएम/एसयूआर | ०६.११.२०२५ | १२.११.२०२५ | २०.११.२०२५ | २८.११.२०२५ | ७२१९६१४७५० |
| | गुरुवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | |
| उपमुख्यमंत्री (एम) पीआर साठी (जी) | ०३.११.२०२५ | १०.११.२०२५ | १८.११.२०२५ | २४.११.२०२५ | ८८२८११९७५५ |
| | सोमवार | सोमवार | मंगळवार | सोमवार | |
| नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (एम) | ०६.११.२०२५ | १३.११.२०२५ | २०.११.२०२५ | २६.११.२०२५ | ८८२८११९७५५ |
| | गुरुवार | गुरुवार | गुरुवार | बुधवार | |
| नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सीडब्ल्यूई) | ०४.११.२०२५ | ११.११.२०२५ | १९.११.२०२५ | २५.११.२०२५ | ८८२८११९७७० |
| | मंगळवार | मंगळवार | बुधवार | मंगळवार | |
| सिनियर मुख्य कार्यकारी अधिकारी | ०३.११.२०२५ | १०.११.२०२५ | १८.११.२०२५ | २४.११.२०२५ | ८८२८११९७५० |
| | सोमवार | सोमवार | मंगळवार | सोमवार | |
| नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (एसीएल) | ०७.११.२०२५ | १४.११.२०२५ | २१.११.२०२५ | २७.११.२०२५ | ७२१९६११७५० |
| | शुक्रवार | शुक्रवार | शुक्रवार | गुरुवार | |

**टीप:** आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलाव केला जाईल. रेल्वे प्रशासनाला स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कोणताही पुरवणी लिलाव रद्द करण्याचा अधिकार आहे.

**टीप: अ)** ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या कोणत्याही लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील कोणत्याही लॉटचा कोणत्याही योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. तसेच कोणत्याही डेपो/विभागातील न विकलेले लॉट मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या नंतरच्या लिलावात विकले जाऊ शकतात **ब)** सरकारच्या धोरणानुसार, जिथे भंगार साहित्याच्या पुनर्वापरात पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश असेल, तिथे असे लॉट केवळ अधिकृत बोलीदारांनाच विकले जातील ज्यांना केंद्राने जारी केलेले वैध परवाने आहेत.
प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB). क) ई-लिलाव कॅटलॉग www.ireps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल. ड) ई-लिलाव डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास, कृपया वरील संबंधित लिलाव संचालक अधिकाऱ्यांशी किंवा उपमुख्यमंत्री / विक्री / मुख्यालय, मोबाईल क्रमांक ८८२८११०७६१, पत्ता: dycmm.s.cstm@gmail.com किंवा dycmms@cr.railnet.gov.in वर संपर्क साधा.

**मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापकासाठी** 611

रेल्वे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है



### जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा), सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर**

११३ (अ), सिध्देश्वरपेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** — **अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर

**विरूध्द**

खालील तपशीलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद — **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ७२५/२५-२६ | ३६४५२.०० | १ | **चौगुले शिला सुधाकर** रा. प्लॉट क्र. ८०/५/०१, मंगळवेढेकर नगर, मोहीर पाटील विद्यालयाजवळ, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | २ | **प्रभावती पांडुरंग शिंदे** रा. प्लॉट क्र. ८०/२/४, हॉटेल नागालैंड मागे, मंगळवेढेकर नगर, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ३ | **अर्चना नागेश लावंड** रा. प्लॉट क्र. ६२०, जुनी पेठ, कोळे गल्ली, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ४ | **रेश्मा रवींद्र पोतदार** रा. गट ८०/२, प्लॉट क्रमांक ९, नागालैंड हॉटेलच्या मागे, महेश गृहनिर्माण संस्था, लिंगे माळा, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| २ | ७२६/२५-२६ | ४०४४७.०० | १ | **पवार कविता सुनील** रा. भूखंड क्र. २३, सावकार नगर, माऊली किराणा दुकन मागे, नागालैंड हॉटेल मागे, ता. पंढरपूर, सोलापूर |
| | | | २ | **अश्विनी सोमनाथ कलागते** रा. प्लॉट नं. २२/८० डी, सावकार नगर, तलाठी कॉलनी, इसबावी, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| | | | ३ | **रंजना सूर्यकांत बिटकर** रा. प्लॉट नं. ५, मंगळवेढेकर नगर, लिंक रोड, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| | | | ४ | **सोनाली सागर चौगुले** रा. मंगळवेढेकर नगर, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ३ | ७२७/२५-२६ | ४६८१४.०० | १ | **बिटकर रंजना सूर्यकांत** रा. प्लॉट नं. ५, मंगळवेढेकर नगर, लिंक रोड, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | २ | **अश्विनी सोमनाथ कलागते** रा. प्लॉट नं. २२/८० डी २, सावकार नगर, तलाठी कॉलनी, इसबावी, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ३ | **कविता सुनील पवार** रा. भूखंड क्र. २३, सावकार नगर, माऊली किराणा दुकन मागे, नागालैंड हॉटेल मागे, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ४ | **सोनाली सागर चौगुले** रा. मंगळवेढेकर नगर, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ४ | ७२८/२५-२६ | ३३८९८.०० | ३ | **ज्योती श्रीपती ओव्हाळ** रा. अव्हे, जंभूड, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ५ | ७२९/२५-२६ | ३९३०६.०० | १ | **ओव्हाळ ज्योती श्रीपती** रा. अव्हे, जंभूड, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ६ | ७३०/२५-२६ | ४९८०५.०० | ४ | **ज्योती श्रीपती ओव्हाळ** रा. अव्हे, जंभूड, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| ७ | ३९७/२५-२६ | ७८९८२.०० | १ | **शेख शयदा महंमद** रा. मुसलमान गल्ली, पोखरपूर, ता. मोहोळ, सोलापूर. |

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू जाब देणार समन्स रूजू न झाल्याने/त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- मंगळवार दि १८.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरिल तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्या आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक ३१/१०/२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

**सही/-**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा) सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### बार्शी पोलीस ठाण्याच्यावतीने एकता दौड

**बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-**

बार्शी शहर पोलीस ठाणे आयोजित सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त एकता दौड (RUN FOR UNITY) चे आयोजन करण्यात आले. सदर एकता दौड मध्ये सामाजिक संघटना, पत्रकार, वकील, शिक्षक, पोलीस भरती करणारे विद्यार्थी, पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर असे एकूण २०० ते २५० जण सहभागी झाले होते. एकता दौड कार्यक्रमा दरम्यान राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेवून बार्शी शहरातील मुख्य रस्त्यावर एकता दौड घेण्यात असून सहभाग घेतलेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले आहे. एकता दौड बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडेंच्या मार्गदर्शनाखाली निघाली.



### पूरग्रस्तांना आयडीएफ फायनान्स कंपनीकडून मदतीचा हात

**अक्कलकोट, दि. ३१ ऑक्टोबर-**

आयडीएफ फायनान्स कंपनी, अक्कलकोट शाखेच्या वतीने पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत पितापूर आणि सिरसी या गावांतील पूरग्रस्त व गरजू नागरिकांना चादरी तसेच आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या मदतकार्यामध्ये कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक एम. डी. एन. एम. पाटील, महाराष्ट्र विभागीय व्यवस्थापक बावकर, क्षेत्रीय व्यवस्थापक दत्ता कांबळे, तसेच अक्कलकोट शाखेचे अधिकारी कृष्णा हावळे, रेवणसिद्ध वाघमारे, आणि उठज दिनेश सुतार व किरण धावणे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कंपनीच्या सीएसआर फंडातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पूरग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळाला असून स्थानिक नागरिकांनी आयडीएफ फायनान्स कंपनीचे मनःपूर्वक आभार मानले.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार पडून जखमी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार पडून जखमी झाला.बापू श्रीरंग थोरबोले (वय ५०, रा. मोरवंची, ता. मोहोळ) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. ३० ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास बापू थोरबोले हे दुचाकीवरून लोकमंगल कारखाना ते मोरवंची या रस्त्याने जात होते. त्यावेळी मोरवंची पासून अलीकडे कुत्रा आडवा आल्याने थोरबोले हे दुचाकीवरून पडून जखमी झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चारचाकीच्या धडकेने दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी झाले.बनसिध्द गुरुशांत भरले (वय ५२), सदिच्छा बनसिध्द भरले (वय १७, रा. विश्राम नगर, होटगी नाका, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ३० ऑक्टोबर रोजी रात्री बनसिध्द भरले व सदिच्छा भरले हे दोघे दुचाकीवरून गांधीनगर ते होटगी नाका दिशेने जात होते. त्यावेळी महावीर चौकाजवळ अज्ञात चारचाकी कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्यामध्ये दुचाकीवरील दोघे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# शहरातील अनधिकृत खोक्यांची यादी तयार करा : आयुक्त

- **वजन काटा प्रमाणपत्रासाठी पोलीस अहवाल, मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक**
- **महामार्गावरील वाहतूक व्यवस्थापन, अतिक्रमणाबाबत आढावा बैठक**
- **अनधिकृत खोक्यांमुळे वाहतुकीस अडथळे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

येथील वजन काट्यांची तपासणी करून प्रमाणपत्र देण्यात आले असून ते डिसेंबर २०२५ पर्यंत वैध आहे. पुढील प्रमाणपत्र देण्यापूर्वी पोलीस अहवाल व मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील तसेच शहरातील अनधिकृत खोक्यांमुळे वाहतूक अडथळे निर्माण होत असल्याने त्या ठिकाणांची यादी चार दिवसांत मनपा अतिक्रमण नियंत्रण विभागाकडे सादर करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.



सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज सोलापूर-हैद्राबाद महामार्गावरील जुने विडी घरकुल वळण परिसरातील वजन काटे, अतिक्रमण आणि वाहतूक व्यवस्थापनासंदर्भात आढावा बैठक महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) सुधीर खिरडकर, अतिक्रमण विभागाचे नियंत्रण अधिकारी तपन डंके, विभागीय अधिकारी रऊफ सरकाजी, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्र. सचिव अतुलसिंग राजपूत, उपनियंत्रक अ.ध. गेटमे, चंदन काटा चालक/मालक नविन सोनीमिंदे, प्रविण साका, रियाज मोमीन, भास्कर मरगल आदी पोलीस विभाग, वैधमापनशाळा, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHI) यांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सहाय्यक पोलीस आयुक्त (ट्रॅफिक) सुधीर खिरडकर म्हणाले, चंदन काटा परिसरातील सर्व्हिस रोडवर जड वाहने उभी केल्याने पादचारी मार्ग अडवला जातो आणि वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून वारंवार अपघातांच्या घटना घडत आहेत. यावर उपाययोजना म्हणून तीन दिवसांत अपघातांचा अहवाल, दंड आकारणीची माहिती आणि संबंधित छायाचित्रे सादर करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. वैधमापनशाळा उपनियंत्रक अ.ध. गेटमे यांनी सांगितले की, चंदन काटा येथील वजन काट्यांची तपासणी करून प्रमाणपत्र देण्यात आले असून ते डिसेंबर २०२५ पर्यंत वैध आहे. तथापि, पुढील प्रमाणपत्र देण्यापूर्वी पोलीस अहवाल व मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत समर्थ मेडिकल स्टोअर परिसरातील 'एल' आकाराच्या रस्त्यांवर उभी राहणारी वाहने व अपघातांच्या घटनांबाबतही चर्चा झाली. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कडून सर्व्हिस रोड आणि डिव्हायडरची दुरुस्ती तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, बाजार समितीच्या हद्दीतच दोन वजन काटे कार्यरत असल्याने बाहेरील काट्यांची गरज नाही. त्यामुळे बाजार परिसरातील वाहतूक अधिक सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले.शहरातील अनधिकृत खोक्यांमुळे वाहतूक अडथळे निर्माण होत असल्याचे पोलिसांनी निदर्शनास आणले. या संदर्भात अडथळा निर्माण करणाऱ्या ठिकाणांची यादी चार दिवसांत मनपा अतिक्रमण नियंत्रण विभागाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

#### मुदतीत अहवाल सादर करून आवश्यक कार्यवाही करावी : आयुक्त डॉ. ओम्बासे

बैठकीच्या शेवटी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सर्व विभागांना ठरवलेल्या मुदतीत अहवाल सादर करून आवश्यक कार्यवाही हाती घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सोलापूर शहरातील वाहतूक सुसूत्रता, नागरिकांची सुरक्षितता आणि अतिक्रमण निर्मूलनासाठी मनपा प्रशासन व पोलीस विभाग संयुक्तपणे कार्य करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



# शहरात १४ ठिकाणी मनपातर्फे राबविण्यात आली आजोरा उचलण्याची मोहीम

▸ महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर या उपक्रमांतर्गत शहरात रस्त्यावरील पडलेला आजोरा ,मलबा, बांधकामातील अवशेष, कचरा उचलण्याची विशेष मोहीम आज शनिवारी नियमितपणे राबविण्यात आली. शहरातील १४ ठिकाणी ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. '' स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर'' या उपक्रमाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त विणा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावरील पडलेला आजोरा ,मलबा, बांधकामातील अवशेष, कचरा उचलण्याची विशेष मोहीम दर शुक्रवारी व शनिवारी नियमितपणे राबविण्यात येत आहे.

आज दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळपासून या मोहिमेअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर आजोरा उचलण्यात आला. या अंतर्गत कुमार चौक, स्टेशन रोड, शेळगी ब्रिज, प्रियांका चौक, अक्कलकोट रोडवरील हवामान कार्यालय परिसर, नई जिंदगी रोड पारशी विहीर, सितारा चौक, आसरा चौक, किल्लेदार मंगल कार्यालय परिसर, टिळक विद्यापीठ समोरील रस्ता, मंगळवेढा रोड मरिआई चौक, कोयना नगर, गवळी वस्ती, मुस्लिम पा पेठ, बीप मार्केट, गुरुनानक चौक व शानदार चौक या ठिकाणी अजोरा उचलण्यात आला.

आजोरा उचलण्याची मोहीम सुरू असताना अतिरिक्त आयुक्त वीणा पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी स्वतः शहरातील विविध मोहिमेतील भागांना भेटी दिल्या. त्यांनी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी त्यांनी मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी चर्चा करून ही मोहीम अधिक प्रभावीपणे कशी राबवता येईल यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सूचना दिल्या.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहायक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या सह अधिकारी, कर्मचारी व विभागीय अधिकारी यांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे शहरातील स्वच्छता सुधारण्यास मोठी मदत झाली असून नागरिकांना स्वच्छ आणि सुंदर सोलापूर निर्मितीचा संदेश देण्यात आला. आपल्या परिसरात आजोरा किंवा बांधकामातील अवशेष रस्त्यावर टाकू नयेत. आजोरा उचलण्यासंदर्भात नागरिकांनी संबंधित विभागाशी संपर्क साधून योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी, जेणेकरून ''स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर'' हे स्वप्न साकार करता येईल, असे आवाहन महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले आहे.

**अशी वापरण्यात आली यंत्रणा**

ही मोहिम शहरातील १४ ठिकाणांवरील आजोरा यशस्वीरित्या हटवला या मोहिमेसाठी घनकचरा विभागाच्या माध्यमातून १ जेसीबी, ४ डंपर तसेच विभागीय कार्यालयांकडून ८ जेसीबी व ८ डंपर अशी यंत्रसामग्री वापरण्यात आली. या माध्यमातून आज एकूण १४ ठिकाणाहून सुमारे ५६ खेपा करून आजोरा उचलण्याचे काम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले.



# गोपाष्टमीनिमित्त रंगनाथ गोशाळेत गोमातेचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

गोपाष्टमीचे औचित्य साधून जुना विडी घरकुल येथील रंगराज नगर या भागातील श्री रंगनाथ गोशाळा येथे आम्ही श्रीराम सेना सोलापूर व प्राणिन फाउंडेशन सोलापूर व तसेच सोलापुरातील इतर हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मिळून उत्साहवर्धक व जल्लोषपूर्ण वातावरणात आर्य सनातन वैदिक पारंपारिक पद्धतीने गोशाळेतील देशी गाईंचे मंत्रोपच्चार करून विधिवत गो पूजन करून गोमातेची आरती करण्यात आली व तसेच भगवान श्री रंगनाथ मंदिर मध्ये सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने आरती करण्यात आली.



तद्नंतर श्रीराम सेनेचे जिल्हाध्यक्ष या नात्याने शितल परदेशी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गोपाष्टमीच्या या पवित्र दिनी गोपूजनाचे महत्त्व सांगायचे झाले तर या पवित्र दिनी भगवान श्रीकृष्णांनी देशी गाईंना रानात, वनात चरायला नेण्यासाठी सुरुवात केली होती. याच पवित्र दिनी भगवान श्रीकृष्णांनी देखील गोपूजन केले होते असे या पवित्र दिनाचे महात्म्य आहे असे सांगितले. तद्नंतर त्यांनी एक खंत देखील व्यक्त केली की भारताची जगातील कृषिप्रधान देश म्हणून ओळख अबाधित ठेवायची असेल तर देशी गाई पासून बनविलेल्या पंचगव्याचा वापर आपल्या दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येक भारतीयाने आवर्जून केलाच पाहिजे असे त्यांनी आपले मत व्यक्त करताना ठामपणे सांगितले. त्यानंतर जय गोमाता जय श्रीराम या घोषणांनी संपूर्ण गोशाळेचा परिसर दणाणून गेला. या गोपाष्टमीच्या महापर्वाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या गोपूजनाच्या कार्यक्रम प्रसंगी श्रीराम सेना जिल्हा गोरक्षा प्रमुख पवन कोमटी श्रीराम सेना शहर गोरक्षा प्रमुख पवन बल्ला श्रीराम सेना शहर अध्यक्ष आनंद चेट्टी श्रीराम सेनेचे गोरक्षक प्रशांत परदेशी, विवेक वंगारी, लिखित कोडम, अभिजीत जिद्दे,नागेश बंडी, LRG प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सतीश सिरसील्ला आधी गोरक्षक गोप्रेमी उपस्थित होते.

# भाजपा शहर मध्य मतदारसंघात रन फॉर युनिटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात रन फॉर युनिटीच्या उपक्रमाचे आयोजन आ. देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या उपक्रमाची सुरुवात भाजपा सोलापूर शहर कार्यालय येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस शहराध्यक्षा रोहिणी तळवळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी भाजपा कार्यालय येथून एकता दौडची सुरुवात केली. सिद्धार्थ चौक- जांबमुनी मोची चौक - मौलाली चौक - जगदंबा चौक,सात रस्ता चौकातील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.




समारोपाचा वेळी शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर म्हणाल्या, सरदार वल्लभभाई पटेल यांनी सर्व राज्ये एकत्रित करून भारताची निर्मिती केली. त्याचप्रमाणे सर्व भारतीयांनी एकत्र येण्याची गरज आहे. तरच आपला देश जागतिक नेता बनू शकेल. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या या धावण्याचा उद्देश एकता आणि परस्पर बंधुत्वाचा संदेश देणे आहे. या रन फॉर युनिटीमध्ये भाजपाचे प्रमुख नेते माजी महापौर श्रीकांचनाताई यन्नम, देवेंद्र भंडारे, अंबादास बिंगी, विजयाताई वड्डेपल्ली, संजय साळुंखे, सुधाताई अळ्ळीमोरे, रंजीताताई चाकोते, विजय कुलथे, नागेश सरगम, अक्षय अंजीखाने, नागेश खरात, बिजू अण्णा प्रधाने, सुरेश पाटील, अशोक कटके, सुनीताताई कामठी, राजश्री चव्हाण, राधिका पोसा, मंदाकिनी तोडकरी, अंजली वलसा, लक्ष्मी बदलापुरे, बजरंग कुलकर्णी, रवी भवानी, मनोज कलशेट्टी, डॉ. राजेश अनगिरे, मेघनाथ येमूल, बिपीन पाटील, आनंद बिर्रू, जेम्स जंगम, भरतसिंग बडूरवाले, नागनाथ कासाळोलकर, यशवंत पाथरूट, रवी कोळेकर, अनिल कदलगी, शिरीष गायकवाड, जय साळुंखे, सिद्धेश्वर कमटम, बंटी क्षीरसागरसह सोलापूर शहरातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व शहरातील विविध क्षेत्रातील व्यक्तींची आणि नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

# माजी सैनिकांसाठी ४ नोव्हेंबर रोजी मेळावा

**माजी सैनिकांच्या विविध समस्यांचे होणार निराकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण केंद्र व बॉम्बे इंजिनियर्स ग्रुप, खडकी पुणे यांच्यावतीने येत्या ४ नोव्हेंबर रोजी जुन्या सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत माजी सैनिकांसाठी मेळाव्याचे आयोजन केले असून, यावेळी शासनाच्या विविध योजनांसाठी तसेच सैनिकांना मिळणाऱ्या लाभांसाठी ज्या अडीअडचणी आहेत.

शंका कुशंका आहेत त्यांचे निरसन करून त्या तात्काळ सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी आज (दि. ३१) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



#### सुसज्ज विश्रामगृहासाठी २० कोटीचा निधी मंजूर

जिल्ह्यात जवळपास दहा हजार माजी सैनिक असून, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, धाराशिव व बाहेरील राज्यातून येणाऱ्या सैनिक व माजी सैनिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे पंढरपूर येथे भव्य आणि सुसज्ज असे विश्रामगृह प्रस्तावित आहे. त्यासाठी जागाही उपलब्ध असून जवळपास २० कोटी रुपयांचा निधी बांधकामासाठी मंजूर झालेला आहे.त्यामुळे लवकरच या कामाची सुरुवात होणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक अधिकारी मिलिंद तुंगार यांनी दिली.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूर्ध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माळकरंजा येथे घरफोडी; ४७ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ ऑक्टोबर -**

कळंब तालुक्यातील माळकरंजा येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ४७ हजार रूपये किमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत माहिती अशी की, फिर्यादी चंद्रकला रविंद्र कराड (वय ४५, रा. माळकरंजा, ता. कळंब) या दि.२३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ३ या वेळेत बाहेर गेल्या असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचा कोंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील सोन्याचे व चांदीचे दागिने आणि २७ हजार रूपये रोख रक्कम असा एकूण ४७ हजार रूपये किंमतीचा माल चोरून नेला.

याबाबत फिर्यादीने दि.३० ऑक्टोबर रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



#### नळदुर्गात 'एकता दौड' संपन्न

**नळदुर्ग, दि.३१ ऑक्टोबर -**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दि. ३१ ऑक्टोबर रोजी नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने एकता दौड काढण्यात आली. या एकता दौडमध्ये पोलिस अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते. सकाळी ८ वा. एकता दौडीचा शुभारंभ करण्यात आला. एक भारत-श्रेष्ठ भारत या घोषणांनी नळदुर्ग शहर दुमदुमुन गेले होते. या एकता दौड मध्ये नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोनि. सचिन यादव, पोउनि. ईश्वर नागरे, एस.डी. गिते, सपोनि. अमृता पटाईत, विकास राठोड यांच्यासह पोलिस कर्मचारी अमर जाधव, बालाजी शिंदे, शशिकांत शिंदे, अजय जमादार व इतर पोलिस कर्मचारी त्याचबरोबर भाजपाचे साहेबराव घुगे, विलास राठोड, दीपक घोडके, मल्लिनाथ जेवळे, वसंत पवार, अरविंद पाटील, पद्माकर जेवळे, कमलाकर रणदिवे, धीमाजी घुगे, सचिन इंगोले, विक्रांत दुधाळकर, ओम भालेकर नितीन गळाकाटे,बालाजी कुलकर्णी, युवराज पाटील, भैरवनाथ कानडे यांच्यासह शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते.



#### प्रा. यशवंत चंदनशिवे यांना राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार

**लोहारा, दि.३१ ऑक्टोबर -**

अखिल भारतीय शब्दमुद्रा साहित्य परिषद, पालघर आणि मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा २०२५ चा राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार प्रा. यशवंत चंदनशिवे यांच्या व्यथा.! जगण्यावर प्रेम करणाऱ्या माणसांची या कथासंग्रहास जाहीर झाला होता. हा पुरस्कार आंबुलगा (वि), ता. निलंगा, जि. लातूर येथे पार पडलेल्या पहिल्या राज्यस्तरीय बालकुमार साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात माजी आकाशवाणी अधिकारी गोविंद गोडबोले, कादंबरीकार डॉ. श्रीकांत पाटील, समीक्षक प्रा.डॉ. बालाजी मन्नाडे आणि साहित्यिक इंगळी सरकार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी आणि सन्मानपत्र असे होते.



#### आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा सामाजिक उपक्रमांतून वाढदिवस साजरा

**नळदुर्ग, दि.३१ ऑक्टोबर -**

आ राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नळदुर्ग शहरात समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. माजी नगरसेवक बसवराज धरणे, नय्यर जहागीरदार व शहर भाजपच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, पालावरची शाळा आणि आपलं घर येथे फळे, खाऊ, भोजन व ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यावर्षी अतिवृष्टी व पुराम ुळे शेतकरी व नागरिकांचे मोठे नुकसान झाल्याने आमदार पाटील यांनी वाढदिवसानिमित्त सत्कार व जाहिराती टाळून सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. या उपक्रमात भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.



#### रा.गे.शिंदे महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी

**परंडा, दि.३१ ऑक्टोबर -**

येथील श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित शिक्षण महर्षी गुरुवारी रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा येथे भारताचे पहिले गृहमंत्री व उपमुख्यमंत्री लोहपुरुष या उपाधीने गौरविलेले सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. शहाजी चंदनशिवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी भाऊसाहेब दिवाने शिक्षकेतर कर्मचारी संतोष राऊत, अजित घुमरे, बबन ब्रह्मराक्षस, उत्तम माने आदी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते.

#### दोन ठिकाणी दारूचा साठा जप्त

**परंडा, दि.३१ ऑक्टोबर -**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध दारू विक्रीचा साठा जप्त केला आहे. वाठवडा शिवारातील हॉटेल शौर्यराजे जवळ आरोपी बळीराम बापू आल्टे (वय ३२, रा. वाठवडा, ता. कळंब) याच्याकडून अंदाजे १,८१० रुपये किंमतीच्या देशी-विदेशी दारूच्या ४० सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या.

# जमिनीचा मोबदला मागणाऱ्या शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपनीकडून गुन्हे दाखल

### अटक झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतातच कंपनीकडून काम सुरू!

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३१ ऑक्टोबर -**

वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांचा रिन्यू पवनचक्की कंपनीविरोधातील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. जमिनीचा योग्य मोबदला मागणाऱ्या शेतकऱ्यांवर कंपनीकडून गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी काही शेतकऱ्यांना अटक केल्याने संतापाची लाट उसळली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, (दि. ३०) ऑक्टोबर रोजी शेतकरी सुजित मोरे, अशोक शिंदे आणि अरविंद नांगरे (रा. सारोळा) यांना पोलिसांनी चौकशीसाठी बोलावून घेतले होते.

त्यानंतर (दि.३१) ऑक्टोबर रोजी त्यांना अटक करण्यात आली. दरम्यान, या शेतकऱ्यांच्या अटकेचा फायदा घेत कंपनीकडून त्यांच्या शेतातच जबरदस्तीने काम सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शेतकरी गेल्या काही म हिन्यांपासून २२० केव्ही टॉवरसाठी १७ लाख रुपये प्रति टॉवर आणि २२ हजार रुपये प्रति मीटर विद्युत तारेसाठी मोबदला मिळावा, अशी मागणी करत आहेत.

यासाठी त्यांनी वाशी तहसील कार्यालयासमोर आणि जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे प्रत्येकी आठ दिवस अमरण उपोषणही केले होते. मात्र कंपनीकडून प्रतिसाद न मिळाल्याने शेतकऱ्यांचा राग वाढला आहे.

दोन आठवड्यांपूर्वी सारोळा शिवारात कंपनीचे अधिकारी म ोबदला न देता कामासाठी आल्याने शेतकऱ्यांनी आधी पैसे द्या, मग काम करा असा इशारा देत त्यांना



रोखले होते. त्यानंतर कंपनीने उलट शेतकऱ्यांविरोधातच गुन्हे दाखल केल्याचे समोर आले आहे.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, कंपनीने पोलिस प्रशासनाला हाताशी धरून प्रमुख शेतकऱ्यांना ताब्यात घेऊन जबरदस्तीने काम सुरू करण्याचा प्रयत्न केला आहे.

आमचा मोबदला द्या, मग काम करा; आमचा जीव गेला तरी मागे हटणार नाही, असा निर्धार संतप्त शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, शेतकरी संघटना या प्रकरणात आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत असून खोटे गुन्हे मागे घ्या आणि शेतकऱ्यांना न्याय द्या अशी मागणी धाराशिव जिल्हा प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

## धाराशिव शहरातून स्कुटीची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

धाराशिव शहरातील सरकारी दवाखाना रोड परिसरात अज्ञात चोरट्याने स्कुटीची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

फिर्यादी लक्ष्मीकांत वसंतराव जाधव (वय ५३, रा. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची होंडा क्टीव्हा स्कुटी (क्र. एमएच २५ एजी ७४१४) ही अंदाजे २०,००० किंमतीची गाडी दि.२२ ते २३ ऑक्टोबर रोजी रात्री त्यांच्या घरासमोरून अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

या प्रकरणी फिर्यादी लक्ष्मीकांत जाधव यांनी दि.३० ऑक्टोबर रोजी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेकडून तारे चोरी प्रकरण उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तारे चोरी प्रकरणाचा तपास करून एक संशयिताला अटक करत सुमारे १० लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे.



**१० लाखांचा मुद्देमाल जप्त...**

याबाबत पोलिसांकडून मि ळालेली माहिती अशी की, दि.३० ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांचे पथक पेट्रोलिंग करत असताना पोस्टे कळंब हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे संशयित अब्दुल जोहर शेख (रा. कळंब, ता. कळंब) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने ढोकी परिसरातील गोवर्धन वाडी येथे साथीदारांच्या मदतीने ल्युमिनियम तारेची चोरी केल्याची कबुली दिली.

तपासादरम्यान पोलीस ठाणे ढोकी येथे सदर घटनेबाबत आधीच गुन्हा नोंद असल्याचे आढळले. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली महिंद्रा पिकअप आणि सुमारे पाच किलोमीटर ल्युमिनियम तार असा एकूण १० लाख रूपये किमतीचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला. आरोपीकडून त्याच्या इतर साथीदारांविषयीही माहिती मिळाली असून पुढील तपास ढोकी पोलीस ठाण्यात सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोहेका शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, रत्नदीप डोंगरे, आणि नागनाथ गुरव यांच्या पथकाने केली.

## येरमाळा पोलीस ठाण्याच्या वतीने एकता दौड संपन्न

### सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त एकतेचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३१ ऑक्टोबर -**

राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त येरमाळा पोलीस ठाण्याच्या वतीने रन फॉर युनिटी-एकता दौड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक, पोलीस अधिकारी-कर्मचारी, येडाई व्यसनमुक्ती केंद्रातील परिवर्तनवादी युवक, तसेच येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



ही एकता दौड पोलीस ठाण्यापासून राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाखालून सुरू होऊन येडेश्वरी देवी मंदिर रस्ता कमानीपर्यंत काढण्यात आली. एक भारत, श्रेष्ठ भारत अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या कार्यक्रमात कळंब उपविभागीय अधिकारी संजय पवार, येरमाळा पोलीस ठाण्याचे सपोनि. तात्या भालेराव, पोलीस उपनिरीक्षक देविदास आवारे, स्वप्नील भोजगुडे, डॉ. संदीप तांबारे, तसेच व्यसनमुक्ती केंद्रातील रुग्ण, स्थानिक ग्रामस्थ आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या एकता दौडीतून सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता आणि देशभक्तीचा संदेश प्रभावीपणे दिला गेला.

### परंडा गटशिक्षण कार्यालयात धक्कादायक प्रकार...

## प्रभारी गटशिक्षणाधिकारी हाके यांच्यावर फसवणुकीचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ ऑक्टोबर -**

परंडा गटशिक्षण कार्यालयात नियमबाह्य कारभाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रभारी गटशिक्षणाधिकारी एस. बी. हाके यांनी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा न देता शासनाची दिशाभूल करून वेतनवाढीचा आर्थिक लाभ घेतल्याचा आरोप माजी नगरसेवक राहुल बनसोडे यांनी केला आहे.



बनसोडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिलेल्या तक्रारीत हाके यांना तत्काळ बडतर्फ करून नियमबाह्य घेतलेला आर्थिक लाभ वसूल करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, हाके यांची २०११ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. नियम ानुसार सेवा प्रवेशोत्तर परीक्षा देणे आवश्यक असूनही त्यांनी ती दिली नाही. तरीदेखील त्यांनी २०१९ पर्यंत प्रशासनाची फसवणूक करून वेतनवाढ मिळवली. तसेच शासन आदेशानुसार सूट मिळण्याचा अधिकार नसतानाही त्यांनी ८ फेब्रुवारी २०१९ रोजी नियमबाह्यरीत्या सूट घेतल्याचे म्हटले आहे.

या प्रकरणामुळे परंडा तालुक्यातील शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली असून, शिक्षण क्षेत्रातील असा गैरकारभार थांबवणार कोण? असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. या गंभीर तक्रारीवर जिल्हा परिषद प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पोलीस ठाणे परंडा येथे राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा

### लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून पोलीस ठाणे परंडा येथे आज, दि.३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.१५ ते ७ वाजेपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन रितु खोखर, पोलीस अधीक्षक धाराशिव, शफकत आमना, अपर पोलीस अधीक्षक धाराशिव, तसेच अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या म ार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांच्या सूचनेनुसार करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत रन फॉर युनिटी या ३ कि.मी. अंतराच्या एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. परंडा पोलीस ठाण्यापासून छत्रपती संभाजी म हाराज चौक ते परत पोलीस ठाणे या मार्गावर ही दौड पार पडली. दौडीत पोलीस कर्मचारी, होमगार्ड, पत्रकार, कमांडो करिअर ॲकॅडमीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, शहरातील फोटोग्राफर तसेच सामान्य नागरिक यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यानंतर राष्ट्रीय एकता शपथ विधी पार पडला. देशाच्या अखंडतेसाठी योगदान देण्याचा संकल्प म्हणून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी एकता प्रतिज्ञा घेतली. तसेच स्वच्छता उपक्रम राबवून पोलीस ठाणे परिसर स्वच्छ करण्यात आला, ज्यातून पर्यावरण संवर्धनासोबतच एकतेचा संदेश देण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततेत आणि अत्यंत उत्साहात पार पडला. या वेळी पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले, उपनिरीक्षक बाबासाहेब खरात, दिलीप पवार, गजानन मुळे, तसेच पोलीस कर्मचारी शिंदे, राऊत, शेवाळे, क्षिरसागर, जगदाळे, आडसुळ, काकडे, खताळ, सगर, सय्यद, नितीन गुंडाळे, कमांडो करिअर ॲकॅडमीचे मेजर तनपुरे, होमगार्ड, पत्रकार व फोटोग्राफर कानिफनाथ गोरे आदींसह सुमारे १५० ते १७५ नागरिक उपस्थित होते.

# भैरवनाथ शुगर मिल्सचा १२ वी मोळीपूजन सोहळा संपन्न

### आ. तानाजीराव सावंत देणार विक्रमी ऊसदर...

### इतर कारखान्यांपेक्षा अधिक भावाची शक्यता : व्हाईस चेअरमन विक्रम सावंत यांची ग्वाही...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३१ ऑक्टोबर -**

वाशी तालुक्यातील तांदळवाडी येथील भैरवनाथ शुगर मिल्स लिमिटेडच्या १२ व्या गळीत हंगामाच्या मोळीपूजन सोहळ्याचा कार्यक्रम शेतकरी आणि मान्यवरांच्या उत्साही उपस्थितीत पार पडला. कारखान्याचे चेअरमन अनिल सावंत, व्हाईस चेअरमन केशव उर्फ विक्रम सावंत तसेच संचालक मंडळाच्या उपस्थितीत मोळीचे विधिवत पूजन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान बोलताना व्हाईस चेअरमन केशव उर्फ विक्रम सावंत म्हणाले की आमदार तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली भैरवनाथ शुगर मिल्स नेहमीच शेतकरी हिताला प्राधान्य देते.

याही वर्षी आमदार सावंत इतर कारखान्यांपेक्षा अधिक दर जाहीर करून शेतकऱ्यांचा विश्वास सार्थ ठरवतील अशी ग्वाही त्यांनी दिली. ते पुढे म्हणाले की भैरवनाथ शुगर मिल्सकडे यावर्षी मोठ्या प्रमाणात यंत्रणा सज्ज असून कार्यक्षेत्रातील एकाही शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही. मागील अनेक वर्षांपासून कारखान्याचा कारभार शिस्तबद्धपणे सुरू असल्याने शेतकरी समाधानी आहेत.



या मोळीपूजन सोहळ्याला कारखान्याचे चेअरमन अनिल सावंत, व्हाईस चेअरमन केशव उर्फ विक्रम सावंत, शिवसेना वाशी तालुकाप्रमुख सत्यवान गपाट, निश्चित चेडे, नागनाथ नाईकवाडी, प्रसाद जोशी, युवासेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब मांगले, शिवहर स्वामी, शिवसेना उपतालुकाप्रमुख विकास तळेकर, युवासेना तालुकाप्रमुख प्रवीण गायकवाड, दिनकर शिंदे, अतुल चौधरी, अशोक लाखे, उद्धव साळवी तसेच कारखान्याचे संचालक मंडळ, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टिपर जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

मुगाव पाटी परिसरात विनापरवाना वाळू वाहतूक करणारा एक टिपर आंबी पोलिसांनी रंगेहात पकडला आहे.

हि घटना दि.२९ ऑक्टोबर रोजी रात्री ९.३० वा. घडली. आरोपी अजय पप्पू थोरात (वय २१, रा. निमगाव मा, जि. सोलापूर) हा आपल्या ताब्यातील टिपर (क्र. एमएच ४२ एक्यु ५३३८) मध्ये अंदाजे ३ ब्रास वाळू बेकायदेशीररीत्या वाहतूक करत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणी सागर अंधारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# गाई गोठे रद्द पंचायत समिती दालनासमोर शेतकरी आक्रमक



सिल्लोड प्रतिनिधी.

सिल्लोड तालुक्यामध्ये मोगरा रोयोअंतर्गत मजूर झालेल्या वीर गोठे रद्द करण्यात आलेली आहे ते रद्द करण्यात येऊ नये या मागणीसाठी सिल्लोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांना जॉब विचारण्यात आला व या ठिकाणी शेतकऱ्यांच्या विहिरी मंजूर झालेल्या व प्रशासकीय मान्यता मिळालेल्या विहिरी रद्द केल्यामुळे शेतकऱ्यावर खूप मोठे संकट या ठिकाणी आलेला आहे आणि काही शेतकऱ्यांनी विहिरी मंजूर झाले असता त्याचं खोदकाम सुद्धा करून ठेवलेला आहे आणि त्यामुळे शेतकऱ्याला आत्महत्या शिवाय कुठलाही पर्याय या ठिकाणी राहिलेला नाही तरी या ठिकाणी अर्ध नग्न आंदोलनाच्या माध्यमातून गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांना ज्यावेळी रद्द झाल्या या विहिरी आपण शासन दरबारी या आंदोलनाची आंदोलनाच्या माध्यमातून जी मागणी आहे ही मागणी पोहोचवून विहिरी रद्द करण्यात येऊ नये अशा प्रकारचे या ठिकाणी आंदोलनाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली यावेळेस उपस्थित शेतकरी गंगाधर भुंगे सागर गवते समाधान पंडित अशोक मोरे अक्षय पाटील सांडू राकडे शिवाजी बनकर अंकुश राकडे काकडे कृष्णा बडा रावसाहेब बडा दादाराव जाधव भानुदास पंडित पुंजाराम आप्पा गरुड कैलास आमटे नामदेव कदम दिलीप कुंटे संजय नाकीरे गंगाधर गोगो.

# शिवाजी शुगरचा तृतीय अग्नि प्रदिपण उत्साहात



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३१:- शिवाजीराव अँग्रो इंड्रष्टीज प्रा. ली डेरा नांदरच्या शिवाजी शुगर साखर कारखाण्याच्या तृतीय बॉयलर अग्नि प्रदीपण समारंभ कारखाण्याचे चेअरमन रवींद्र पाटील काळे यांच्याहास्ते सपत्नीक धार्मिक विधिवत उत्साहात पार पडला यावेळी पंचक्रोशीतील ऊस उत्पादक, सभासद, शेतकरी, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्याने यंदा कारखाण्याची गाळप क्षमता वाढवली जाणार असून शेतकऱ्यांनी शिवाजी शुगरला भरभरून ऊस घालावा असे आवाहन यावेळी चेअरमन रवींद्र पाटील काळे यांनी शेतकऱ्यांशी बोलतांना केले.

या प्रसंगी भाऊसाहेब औटे,रामचंद्र पाटील काळे,सतिष बलदवा, मुख्य कार्यकारी अधिकारी पठाण,मित्रवर्धन पाटील काळे, उदयसेन पाटील काळे,कारभारी लोहकरे,श्याम लोहिया, अशोक जाधव, यशवंतराव काळे,प्रवाहचे संस्थापक रामेश्वर गोर्डे, गोपाळ धारे, सरपंच ज्ञानेश्वर जाधव, उप सरपंच प्रशांत देशमुख, यशवंत राऊत, अँड किशोर वैद्य,देविदास सोनवणे, मछिंद्र मिसाळ,गोपाळ वैद्य, भाऊसाहेब सोनवणे, भाऊसाहेब खुळे,ईश्वर भोसले, रमेश ढाकणे,बिलाल पठाण, कारभारी सोनवणे,भागवत मापारी, गणेश कणसे,संजय कापडे, काका नवथर, निजाम शेख,लतीफ शेख, उस्मान शेख, मुख्तर पठाण,प्रभाकर राऊत सह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, कामगार उपस्थित होते.

## 'फूल ऑन हॅलोवीन' फक्त अँन्ड पिक्चर्स वाहिनीवर!

मुंबई : सज्ज व्हा एक दिवसाच्या धमाल, हॉरर आणि भयावह अॅडव्हेंचरसाठी कारण यावेळी हॅलोवीन होणार आहे 'ऑन नाही तर फूल ऑन', फक्त अँन्ड पिक्चर्सवर! ३१ ऑक्टोबरला दिवसभर प्रसारित होणार आहे फूल ऑन हॅलोवीन. तरुण प्रेक्षकांशी असलेल्या सखोल नात्यासाठी ओळखली जाणारी अँन्ड पिक्चर्स वाहिनी घेऊन येत आहे – मौज, ताजेपणा आणि थराराने भरलेला अनुभव, जो त्यांना अगदी आपलासा वाटतो! तयार व्हा जंप स्केअर्स ऐवजी फन स्केअर्स साठी, कारण अँन्ड पिक्चर्स तुम्हांला आमंत्रित करत आहे एका अविस्मरणीय हॅलोवीन मूव्ही मॅरेथॉनसाठी – ज्यात असेल शहारा उभे करणारे क्षण, खळखळून हसवणारे प्रसंग आणि भुतांची धमाल सरप्राइजेस!

## मोरारी बापूंच्या रामकथेनं पंचवटी उजळली

नाशिक: पूज्य मोरारी बापूंची ऐतिहासिक रामयात्रा आज पवित्र नाशिक नगरीत पोहोचली. पंचवटी येथे हजारो भाविक एकत्र येऊन रामकथा ऐकण्यासाठी जमले. चित्रकूट आणि साटनामधील अध्यात्मिक प्रवासानंतर नाशिक ही ११ दिवसीय यात्रेतील आणखी एक महत्त्वपूर्ण पायरी ठरली, जी मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या पावलांवर चालणारी आहे. पंचवटी हे प्रभू श्रीरामांच्या वनवासातील एक अतिशय पवित्र स्थान आहे. येथे श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांनी धर्मपालन करत वास्तव केले. रामायणातील अनेक निर्णायक प्रसंग याच ठिकाणी घडले, ज्यामुळे पंचवटी हे सत्य, धैर्य आणि करुणा या प्रभू रामांच्या आदर्शांशी जोडलेले एक पूज्यस्थळ मानले जाते.

## एसएमईंकरिता दैनंदिन प्रवास सुलभ

छत्रपती संभाजीनगर : टाइड या भारतातील एसएमईंकरिता आघाडीच्या आर्थिक व्यवस्थापन प्लॅटफॉर्मने त्यांच्या रूपे-समर्थित एक्स्पेन्स कार्डमध्ये नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) पाठिंब्याची भर केली आहे, ज्यामुळे लहान व्यवसाय आणि फ्रीलान्सर्सना एकाच कार्डसह टॅप करत प्रवास व व्यवहार करता येईल. टाइड सदस्य आता भारतातील प्रमुख शहरांमध्ये मेट्रो, बस, टोल आणि पार्किंगसाठी पेमेंट करू शकतात, तसेच टाइड अॅपमध्ये विनासायासपणे इन्वॉईसेस, रिइम्बर्समेंट्स (परतफेड) आणि खर्चांचे व्यवस्थापन करू शकतात. भारत सरकारचे पाठबळ असलेल्या एनसीएमसीचे एकीकरण वापरकर्त्यांना एकाच कार्डमध्ये सार्वजनिक परिवहन आणि व्यवसाय-संबंधित प्रवासासाठी पेमेंट करण्याची सुविधा देते. यामुळे विविध ट्रॅव्हल कार्ड्स सोबत ठेवण्याची किंवा पेमेंट अॅप्सदरम्यान स्विच करण्याची गरज भासत नाही. रिअल-टाइममध्ये टाइड अॅपच्या माध्यमातून टॉप-अप्स उपलब्ध असण्यासह सदस्य त्वरित त्यांचे कार्ड्स रिचार्ज करू शकतात, शिल्लक तपासू शकतात आणि ट्रान्झिट गेट्सवर जलदपणे, रांगेशिवाय सुलभ सुविधांचा आनंद घेऊ शकतात.

१०० कुशलतरुणांना जागतिक प्रशिक्षणासाठी जपान ला पाठवले छत्रपती संभाजीनगर :: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी आज जाहीर केले की त्यांच्या१०० सदस्यांना टोयोटा मोटर कॉर्पोरेशन येथे आयोजित ग्लोबल स्किल-अप ट्रेनिंग (जीएसटी)कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जपानला पाठवले जाईल. ही पुढाकार टीकेएमच्या जागतिक दर्जाचीस्पर्धात्मक कौशल्ये असलेली प्रतिभा विकसित करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे आणिभारत सरकारच्या स्किल इंडिया मिशन तसेच भारत आणि जपान सरकारांमधील *टेक्निकल इंटर्नट्रेनिंग प्रोग्रॅम (टीआयटीपी) या आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास आणि प्रतिभा देवाणघेवाणउपक्रमाशी सुसंगत आहे.

## सायकलिंग क्षेत्रात भारत घेणार नवी भरारी

नाशिक : भारताच्या पहिल्या व्यावसायिक प्रो स्टेज एलीट पुरुष सायकलिंग स्पर्धा या आंतरराष्ट्रीय सायकलिंग इव्हेंटचे अधिकृत चिन्ह आणि शुभंकराचे अनावरण उत्साही नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या सोबतच पुणे ग्रँड टूर २०२६ या भारतातील पहिल्या जागतिक पातळीच्या सायकलिंग स्पर्धेची घोषणा करण्यात आली.पुणे ग्रँड टूर ही स्पर्धा २०२८ मध्ये होणाऱ्या उन्हाळी ऑलिंपिकसाठी पात्रता फेरी म्हणून स्विकारली जाणार आहे. या अंतर्गत आंतरराष्ट्रीय खेळाडूंना १९ ते २३ जानेवारी २०१६ दरम्यान आयोजित पाच दिवसीय, अनेक टप्प्यांची शर्यत पूर्ण करून महत्त्वाचे रेस-पॉइंट्स मिळवण्याची संधी मिळणार आहे. या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (उत्रख), क्रीडा व युवक कल्याण विभाग आणि पुणे जिल्हा प्रशासन यांनी एकत्रितपणे महाराष्ट्रात आणि भारतात सायकलिंग क्रांती घडवण्याची वचनबद्धता व्यक्त केली.

## सचिदानंद उपाध्याय यां ना टाइम मॅगझिनमध्ये दुसऱ्यांदा स्थान

मुंबई: लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड (एलएमआयएल) चे मॅनेजिंग डायरेक्टर सचिदानंद उपाध्याय यांनी एक उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे – टाइम मॅगझिनमध्ये सलग दुसऱ्यांदा स्थान मिळवून. हा दुर्मीळ सन्मान त्यांना त्या निवडक जागतिक व्यावसायिक नेत्यांच्या गटात स्थान देतो, ज्यात भारतातील काही प्रतिष्ठित उद्योग नेतेही सामील आहेत, ज्यांना उद्योग आणि समाजातील योगदानासाठी दोनदा फीचर केले गेले आहे.

# 'जडऽउ आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे'चा पोस्टर लाँच!




छत्रपती संभाजीनगर - गेल्या काही काळापासून 'आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे' या चित्रपटाची चर्चा सुरु आहे. नुकतंच या चित्रपटाचं पोस्टर समोर आलं असून येत्या २८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे. कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके अभिनीत 'ऑपरेशन लंडन कॅफे' हा चित्रपट आहे. हा सिनेमा संपूर्ण भारतात मराठी, कन्नड, आणि हिंदी भाषेतही प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचं पोस्टर पाहून हा सिनेमा एक्शन पॅक्ड असल्याचं दिसतय. आणि हेच पोस्टर चित्रपटाची उंची, भव्यता दर्शवत आहे. हा चित्रपट कन्नड सिनेसृष्टीतील दिग्दर्शक सदागारा राघवेंद्र यांनी मराठी आणि कन्नड भाषेत दिग्दर्शित केला आहे. कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके यांच्यासह चित्रपटात प्रसाद खांडेकर, अश्विनी चवरे, शलाका पवार, रुक्मिणी सुतार ही मराठी कलाकारांची फौज पाहायला मिळत आहे. एक्शन पॅक्ड अशा या चित्रपटाला रोमँटिक झालर आहे ती कशी ते मात्र तुम्हाला सिनेमागृहात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचा एक अनोखा पैलू म्हणजे कन्नड कलाकारांनी या चित्रपटासाठी मराठी भाषा शिकली आणि मराठी कलाकारांनी चित्रपटातील भूमिकांसाठी कन्नड भाषा शिकली. चित्रपटाच्या समोर आलेल्या पोस्टरने अर्थात सिनेमाप्रती उत्सुकता वाढविली आहे. पोस्टरवरील कलाकार तर पॉवर पॅक्ड अभिनय देण्यासाठी सज्ज असल्याचं दिसत आहे. कवीश शेट्टी आणि मेघा शेट्टी यांनी त्यांच्या अभिनयाने साऊथ सिनेसृष्टी गाजवली आहे तर शिवानी सुर्वेच्या अभिनयाचा आणि ग्लॅमरसचा केवळ महाराष्ट्रातच नाहीतर महाराष्ट्राबाहेरही मोठा चाहतावर्ग आहे. तर विराट मडकेच्या चित्रपटांच्या यादीत या चित्रपटाची भर पडणार आहे. अश्विनी चवरे हिच्याही अभिनयाची जादू या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे.

या चित्रपटाची निर्मिती दिपक पांडुरंग राणे, विजय कुमार शेट्टी हवाराल, रमेश कोठारी आणि विजया प्रकाश यांनी 'दिपक राणे फिल्मस' बॅनर आणि 'इंडियन फिल्म फॅक्टरी' अंतर्गत केली आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण आर.डी. नागार्जुन यांनी केले आहे. येत्या २८ नोव्हेंबरला हा सिनेमा जगभरात मराठी, हिंदी आणि कन्नड भाषेत प्रदर्शित होणार आहे.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय यश



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ ऑक्टोबर

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी सार्थक कैलास माकोडे याने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असून त्याची बीड येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच इयत्ता ११ वी एम.सी. व्ही.सी.शाखेतील विद्यार्थी वैभव शिंदे याने ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत विभागीय स्तरासाठी पात्रता मिळवली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षण व मार्गदर्शन डॉ. निलेश गाडेकर,प्रा.शेख तौफिक यांनी दिले आहे.

महाविद्यालयातील शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग डॉ. सुभाष पाटील,प्रा.रवींद्र जाधव,प्रा.दिपक लिंबे,प्रा.शंकर कानडे,प्रा.अन्वर सय्यद,प्रा. विनोद चव्हाण,प्रा.स्वाती देशमुख, प्रा.भारती पाटील,प्रा.अनिल मानकर,बुटोले सर,योगेश काळे,अश्विनी काळे,संदीप निकम,दिपक कल्याणकर दींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ११ कोटींचे मेगा बक्षीस कोण जिंकेल?

### लॉटरी खरेदीदारांमध्ये वाढली उत्सुकता आणि थरार!

मुंबई: पंजाब स्टेट डियर दिवाळी बंपर २०२५ लॉटरीच्या ११ कोटींच्या पहिल्या बक्षिसाचा विजेता कोण ठरणार, याबाबत लॉटरी खरेदीदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि थरार निर्माण झाला आहे.

ही बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे की हा ड्रॉ फक्त विक्री झालेल्या तिकिटांवरच काढण्यात येणार आहे, त्यामुळे हे निश्चित आहे की ११ कोटींचे मेगा बक्षीस कोणीतरी नक्कीच जिंकणार आहे. हा बहुप्रतीक्षित ड्रॉ शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पंजाब राज्य लॉटरी संचालनालय, लुधियाना (पंजाब) येथे मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात येणार असून, त्याचे थेट प्रक्षेपण यूट्यूबवर करण्यात येणार आहे. ५०० किंमतीची ही तिकिटे महाराष्ट्रातील सर्व भागांमध्ये विक्रीस उपलब्ध आहेत. नागरिकांना या दिवाळीत आपले नशीब आजमावण्याची सुवर्णसंधी आहे. मुख्य बक्षिसासोबतच या तिकिटामध्ये अनेक आकर्षक पारितोषिके आहेत. दुसरे बक्षीस ३ कोटी (१ कोटी ÷ ३ बक्षिसे) आणि तिसरे बक्षीस १.५ कोटी (५० लाख ÷ ३ बक्षिसे) असे निश्चित करण्यात आले असून, त्याशिवाय इतरही अनेक बक्षिसे जिंकण्याची संधी आहे. हे उल्लेखनीय आहे की श्री हरमिंदर सिंग यांनी यापूर्वी पंजाब स्टेट डियर लोहरी मकरसंक्रांत बंपर २०२५ लॉटरीमध्ये १० कोटींचे पहिले बक्षीस जिंकले होते.

आता सर्वांचे लक्ष ३१ ऑक्टोबर २०२५ कडे लागले आहे- या वेळी ११ कोटींचा भाग्यवान विजेता कोण ठरणार हे पाहणे खरोखरच रोमांचक ठरणार आहे. चला पाहूया, या दिवाळीत कोणाचे नशीब उजळते !

## अरिहंतनगर जैन मंदिरात आचार्य प्रणामसागरजी महाराज यांच्या उपस्थितीत सिध्दचक्र महामंडळ विधानास प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री.१००८ युग प्रवर्तक आदीनाथ दिगंबर जैन मंदिर अरिहंतनगर येथे आचार्य डॉ.प्रणामसागरजी महाराज व अनुष्ठाचार्य कपिलभैया पाटणी यांच्या निर्देशामध्ये चार दिवसीय सिध्दचत्रै महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले असुन दररोज सकाळी ६ वाजता अभिषेक नित्य नियम पुजा आचार्यश्रींचे विशेष प्रवचन त्यानंतर सिध्दचत्रै विधान पुजा आहारचर्या तदनंतर संध्याकाळी आनंदयात्रा भगवंताची आरती व अनुष्ठाचार्य कपिलभैया पाटणी यांच्या वतीने स्वाध्याय प्रवचन होत आहे. यावेळी आचार्यश्रींनी सिध्दचत्रै महामंडळ विधानाची महती उपस्थितांना करैन दिली व दररोज श्रीफळ अर्पण करैन भगवंताची पुजा आरती करण्यात येत आहे. यामध्ये सौधर्म इंद्र इंद्राणी म्हणुन पुष्पाबाई रतनलालजी लिना संदिप, जयश्री सचिव, लोहाडे परिवार हे लाभले आहे. तर कुबेर इंद्र अतुल यावलकर, मैना सुंदरी राजा, श्रीपाल म्हणुन सोनाली आनंद पाटणी विजय रमेश चंद्रकुमार महावीर पाटणी परिवार, भरत चत्रैवर्ती इंद्र उषा बबनलाल चुडीवाल, महायज्ञनायक सुनंदाबाई कैलासंचद पाटणी, ध्वजारोहन मंदाबाई शामलाल प्रशांत सचिन पांडे, इंशान इंद्र सौ.सुनिता संतोषकुमार अजमेरा, सानद इंद्र शांताबाई रमेशचंद अजमेरा, धर्मचक्र वर्ती इंद्र अनिता संजय पहाडे, महेंद्र इंद्र सुनिला संजयकुमार काला, कापिष्ठ इंद्र आशाबाई श्रीपाल गंगवाल, शुत्रै इंद्र किशोर महावीर मोतीलाल रावका, महाशुत्रै सुरेश मयुर अजमेरा, लावंत इंद्र सौ.सिमा निर्मल पांडे, अरनेंद्र इंद्र निलमदेवी दिलीप कासलीवाल, प्राणत इदं्र सरिता रमनलाल काला, आच्युत इंद्र राखी राजेंद्र बाकलीवाल, ब्रम्होत्तर इंद्र छायादेवी अनुप ठोले, ब्रम्हइंद्र बबनलाल राहुल कासलीवाल, सतार इंद्र वर्षा सचिन कासलीवाल आदीच्या वतीने भगवंताची पुजा होत आहे. यावेळी प्रमोद ठोले व सुनंदाबाई कैलासचंद पाटणी परिवाराच्या वतीने आचार्यश्रींचे पादपक्षालन करण्यात आले.


संपुर्ण कार्यकमासाठी अध्यक्ष संतोष अजमेरा, पचायत अध्यक्ष महावीर पाटनी पचायत सचिव प्रकाश अजमेरा सचिव रितेश पहाडे, संयोजक महावीर ठोले, संजय पहाडे, आनंद पांडे, आनंद पाटणी, संदिप लोहाडे, अनिल

## राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट शनिवारी नांदेड दौऱ्यावर

नांदेड, ३१ ऑक्टोबर : राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे शनिवार १ नोव्हेंबर २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शनिवार १ नोव्हेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने दुपारी ४.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन. दुपारी ४.३० ते ४.४५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह नांदेड येथे राखीव. दुपारी ४.४५ ते ५ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी यांच्यासोबत चर्चा स्थळ-शासकीय विश्रामगृह नांदेड. दुपारी ५.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून वाहनाने समस्त आंबेडकरवादी समाज नांदेडच्यावतीने जाहीर नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थिती. स्थळ- कै. शंकरराव चव्हाण सभागृह (स्टेडियम) नांदेड. सायंकाळी ७.४५ वा. कै. शंकरराव चव्हाण सभागृह (स्टेडियम) नांदेड येथून वाहनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेडकडे प्रयाण. सायं. ८ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेड येथे आगमन. सायं. ८ ते ८.३० वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेड येथील विद्यार्थ्यांसोबत चर्चा. सायं. ८.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी मिशन नांदेड येथून वाहनाने शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. सायं. ८.४५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन. सायं. ८.४५ ते ९.१५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह नांदेड येथे राखीव. रात्री ९.१५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी आय एम ए चा उपक्रम कौतुकास्पद - जिल्हाधिकाऱ्यांचे मत



छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे जागर स्त्री शक्तीचा - स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान हा विशेष सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम अत्यंत यशस्वीपणे राबविण्यात आला. या अभियानाचा उद्देश महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढवून त्यांना आत्मनिर्भर आणि सशक्त बनवणे हा होता.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी सांगितले, आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेने नवरात्रीला खरी सामाजिक दिशा दिली आहे. महिलांचे आरोग्य हे समाजाचे आरसे आहे. अशा उपक्रमांनी शहरात सजगतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. आयएमए शाखेचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर आणि सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी या उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व नेतृत्व केले. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे आणि संघभावनेमुळे सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडले.

मुख्य समन्वयक डॉ. आसावरी टाकळकर यांनी सांगितले, आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेने 'जागर स्त्री शक्तीचा' या अभियानाद्वारे महिलांच्या आरोग्याबरोबरच त्यांचा आत्मसन्मानही वाढविला आहे. प्रत्येक कार्यक्रमात महिलांचा प्रतिसाद पाहून आनंद झाला. आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी, हा संदेश आम्ही प्रत्येक कार्यक्रमातून दिला. जिल्हाधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले, ही आमच्या सर्व डॉक्टर सदस्यांसाठी प्रेरणादायी गोष्ट आहे.

त्यांनी पुढे म्हटले, महिला ही कुटुंबाची आणि समाजाची खरी शक्ती आहे. तिचे आरोग्य हेच राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. आयएमए शाखा आगामी काळातही अशा सामाजिक अभियानांद्वारे सर्वसामान्यांपर्यंत वैद्यकीय जागरूकता पोहोचवेल.

आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेचा हा उपक्रम नवरात्रीचा उत्सव आरोग्याचा उत्सव बनवणारा ठरला आहे.

# मेडिकव्हर हॉस्पिटल मध्ये पक्षाघात दिन साजरा




छत्रपती संभाजीनगर - जग जागतिक पक्षाघात (स्ट्रोक) दिन साजरा करत असताना जागरूकता वाढवण्यासाठी आणि लोकांना स्ट्रोकविरुद्ध कारवाई करण्यास सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहे. पक्षाघात विनाशकारी मेंदू विकारा पैकी एक आहे. या वर्षीची थीम - खेळाच्या भावनिक शक्तीला स्ट्रोक जागरूकता वाढविण्यासाठी आणि आपल्या सर्वांना कृती करण्यास प्रेरित करण्यासाठी सूत्रबद्ध करणे. रुग्णालयाच्या विश्वासाचे प्रतिबिंबित करते की स्ट्रोकनंतर पुनर्प्राप्ती, खेळाप्रमाणेच, शक्ती, टीमवर्क आणि लवचिकतेबद्दल आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील वरिष्ठ सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ.श्रीकांत देशमुख म्हणाले की आज स्ट्रोक केवळ वृद्धांनाच नाही तर तरुणांनाही प्रभावित करतो, विशेषतः त्यांच्या ४० आणि ५० च्या दशकातील प्रौढांना, उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, ताण आणि बसून राहण्याच्या सवयींमुळे.स्ट्रोक केअरमध्ये, वेळ हा महत्वाचा भाग आहे पहिल्या तासात उपचार केल्याने चांगला फरक पडू शकतो. मेडिकोव्हरमध्ये, आमची २४ तास स्ट्रोक-रेडी टीम जलद निदान, त्वरित उपचार आणि संपूर्ण पुनर्वसन सुनिश्चित करते. जेणेकरून रुग्ण खरोखरच पुन्हा मजबूत होऊ शकतील, असे ते पुढे म्हणाले.

डॉ जयपाल घुनावत व नारायण देशमुख म्हणाले कि महाराष्ट्रात, स्ट्रोकच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ दिसून आली आहे, मराठवाडा प्रदेशातील आकडेवारीवरून असे दिसून येते की जवळजवळ ८०% स्ट्रोक रुग्ण उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत, अर्ध्याहून अधिक लोकांना मधुमेह आहे आणि एक तृतीयांश धूम्रपान करणारे आहेत. राष्ट्रीय पातळीवर, दरवर्षी प्रति १००,००० लोकांमागे १०५ ते १५२ प्रकरणे स्ट्रोकचा भार आहे. हे आकडे जनजागृतीची आणि वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेपाची तातडीची गरज अधोरेखित करतात.

मेडिकोव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगरने आपत्कालीन, न्यूरोलॉजी आणि पुनर्वसन सेवा एकत्रित करणारी एक व्यापक स्ट्रोक केअर सिस्टम स्थापित केली आहे. रुग्णालय २४७ न्यूरोइमेजिंग, थ्रोम्बोलिसिस आणि न्यूरोइंटरव्हेन्शन सुविधा देते, त्यानंतर फिजिओथेरपी, स्पीच थेरपी आणि रोबोटिक-सहाय्यित पुनर्वसन सुविधा देते. जागतिक स्ट्रोक दिनानिमित्त, मेडिकव्हर समुदायांमध्ये जागरूकता मोहीम, मोफत जोखीम मूल्यांकन शिबिरे आणि शैक्षणिक सत्रे आयोजित करत आहे, जे लोकांना एफ.ए.एस. टी. तत्त्वाचा वापर करून लवकर चेतावणी चिन्हे ओळखण्यास प्रोत्साहित करते.

चेहरा वाकणे, हात कमकुवत होणे, बोलण्यात अडचण येणे आणि आपत्कालीन उपचार घेण्याचे लक्षणे आहेत. कार्यक्रमास आजारातून बरे झालेल्या रुग्णांनी आपले मनोगत व्यक्त केले. व नातेवाईकांनी कृतज्ञता समारोप भाषणात सेंटर हेड डॉ विशाल कुटे म्हणाले कि वैद्यकीय उत्कृष्टता, जलद प्रतिसाद आणि सहानुभूतीपूर्ण उपचार या वाचना द्वारे, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर, नागरिकांना त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यास, वेळेवर कृती करण्यास प्राथमिकता देते. कार्यक्रमास डॉ विशाल कुटे, सेंटर हेड , डॉ मिलिंद दुनाखे , डॉ श्रीकांत देशमुख, डॉ जयपाल घुनावत , डॉ नारायण देशमुख , डॉ अविनाश कचरे, डॉ दीपेन शाह यांची उपस्थिती होती.

# ऊस बिले न दिल्याने संताप : नळदुर्गमध्ये गोकुळ शुगरच्या ट्रकच्या काचा फोडल्या

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ ऑक्टोबर -**

गेल्या वर्षीच्या ऊस गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचे बील दिले नसल्यामुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी गोकूळ शुगर धोत्री (ता. दक्षिण सोलापुर) येथील कारखान्याच्या ऊस वाहतुक करणाऱ्या गाडया फोडल्याची घटना नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपूर खंडोबा मंदीर परीसरात घडली असुन यामुळे गोकुळ कारखान्याच्या संदर्भात शेतकऱ्यांचा तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे गोकुळ शुगर कारखान्याने तात्काळ शेतकऱ्यांची ऊस बीले शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे अन्यथा शेतकऱ्यांचे ऊस आंदोलन यापुढील काळात आणखी तीव्र होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गेल्या वर्षी नोव्हेबर २०२४ मध्ये नळदुर्ग, येडोळा, वागदरी, शहापूर, दहीटणा आदी भागातील शेतकऱ्यांनी गोकुळ शुगर धोत्री ता. दक्षिण सोलापुर या कारखान्यास ऊस घातला होता. दरम्यान गेल्या वर्षीचा गळीत हंगाम संपुन दुसरा हंगाम सुरु होत आला असतानाही नळदुर्ग, शहापूर, दहिटणा, येडोळा, वागदरी आदी भागातील शेतकऱ्यांना ऊसाचे बील दिले नाही. परीणामी शेतकरी ऊसाचे बील मागण्यासाठी कारखान्यावर गेले असता तेथे शेतकऱ्यांना कारखान्याचे मालक भेटत नाहीत किंवा पैशा संबंधी विचारले असता टोलवा टोलवीची उत्तरे दिली जात होते. त्यामुळे कांही शेतकऱ्यांना पाचशे रुपये प्रती टन, कांहीना हजार रुपये प्रती टन, कांही शेतकऱ्यांना दीड हजार प्रती टन आणि कांही शेतकऱ्यांना दोन हजार रुपये प्रती टन ऊसाचे बील दिले आहेत. मात्र बहुसंख्य शेतकऱ्यांना एक रुपया ही ऊसाचे बील दिले नाही. त्यामुळे गोकुळ शुगरच्या विरोधात शेतकऱ्यांतुन तीव्र संताप व्यक्त होत आहे. येणाऱ्या ६ तारखेस गोकुळ शुगरचा मोळी टाकण्याचा कार्यक्रम होणार असल्याने गोकूळ शुगर धोत्री येथील कारखान्याच्या ऊस वाहतुक करणाऱ्या गाडया व टोळया सध्या नळदुर्ग, येडोळा, शहापूर, गुजनुर, वागदरी आदी भागात येत आहेत. दरम्यान नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपूर खंडोबा मंदीर परीसरात गोकुळ कारखान्याच्या कांही ऊस वाहतुक करणाऱ्या ट्रक ऊस तोडणीसाठी आलेल्या आसताना गोकुळ शुगरने गेल्या गळीत हंगामातील उसाचे बील दिले नसल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी दि.३१ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन च्या सुमारास ऊस वाहतुक करणारी ट्रक (क्र.एम.एच.२५ एयु. ०३१६) या गाडीच्या काचा फोडल्या आहेत.

यामुळे गोकुळच्या गाडया परीसरात दिसताच शेतकऱ्यांचा संताप व्यक्त होत असुन गोकुळ शुगरने येत्या दोन दिवसात ऊस बीले द्यावे, अशी मागणी होत आहे. अन्यथा गोकुळ शुगरचे ऊस वाहतुक करणारे वाहन परीसरात किंवा ग्रामीण भागात फिरु देणार नाही




असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते राजु शेट्टी यांच्या आवाहनानुसार गोकुळच्या गाडया फिरु दिल्या जाणार नाहीत आणि गाडया आल्या तर त्या फोडल्या जातील असा इशारा दिला आहे.

## 'राष्ट्रीय एकता दिवस' निमित्त धाराशिव पोलिसांकडून 'रन फॉर युनिटी'चे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता धाराशिव शहरातील आनंदनगर पोलीस ठाणे येथे जिल्हास्तरीय 'रन फॉर युनिटी व वॉक फॉर युनिटी' या ५ कि.मी. दौडेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचा शुभारंभ पोलीस अधीक्षक रितु खोखर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, पोलीस उपअधीक्षक राउत व भोसले यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आला. या दौडीत धाराशिव जिल्हा पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार, तसेच विद्यार्थी व नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

दौडीचा मार्ग आनंदनगर पोलीस ठाणे-जिजाऊ चौक-बार्शी नाका असा ठरविण्यात आला होता. परतीच्या मार्गाने पुन्हा आनंदनगर पोलीस ठाणे येथे दौडीचा समारोप करण्यात आला.

धाराशिवसह जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्येही 'रन फॉर युनिटी व वॉक फॉर युनिटी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी पोलीस अधिकारी, अंमलदार, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

तसेच, पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या आदेशानुसार दि.२८ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत धाराशिव जिल्हा पोलीस दलामार्फत विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. या दरम्यान धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, नेहरू चौक, तसेच तुळजापूर व कळंब शहरातील प्रमुख चौकांवर पोलीस संगीत वाद्य पथकाद्वारे देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमात पोलीस संगीत पथकातील अंमलदार बालाजी सहाणे, लक्ष्मण चांदणे, श्रीमंत पालके, रामहरी कांबळे आणि विकास कसबे यांनी उत्कट देशभक्तीपर गीतांद्वारे नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकतेचा संदेश पोहोचविला.

## संजीतपूर गावाच्या पुलाची उंची वाढविण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३१ ऑक्टोबर -**

कळंब तालुक्यातील संजीतपूर गावाला जोडणाऱ्या रस्त्यावरील पुलाची उंची वाढविण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांच्या वतीने समाजसेवक समाधान बाराते यांनी दि.३१ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

संजीतपूर येथील तेरणा नदीवरील हा पूल सुमारे २७ वर्षांपूर्वी बांधण्यात आला असून त्याची उंची केवळ पाच फूट आहे. दरवर्षी पावसाळ्यात नदीला आलेल्या पाण्यामुळे हा पूल पाण्याखाली जातो आणि गावाचा संपर्क पूर्णपणे तुटतो. त्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषतः आपत्कालीन प्रसंगी रुग्णवाहिका गावात पोहोचू शकत नाही, तसेच प्रसूतीसाठी महिलांना रुग्णालयात नेण्यात मोठा अडथळा निर्माण होतो.

ग्रामस्थांनी याबाबत अनेक वेळा स्थानिक प्रशासनाला निवेदनं दिली असली तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाला असून अखेर समाधान बाराते यांनी पुलाच्या बाजूलाच उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला आहे.


उपोषण स्थळी ग्रामस्थांनी भेट देऊन बाराते यांना पाठिंबा दर्शविला.

## वाशी पोलिसांकडून गोवंश वाहतूक प्रकरणी कारवाई

### एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३१ ऑक्टोबर -**

वाशी पोलिसांनी कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे बेकायदेशीररीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. आरोपी असित उस्मान शेख (रा. भुम) याने दि.३० ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ७.३० वाजता भुम ते पार्डी रस्त्यावर पार्डी घाटाच्या वरती छोटा दोस्त (क्र. एमएच ०४ एफपी ३४५३) या वाहनातून



गोवंशीय जातीची ५ जनावरे बेकायदेशीररीत्या वाहतूक केली.

या जनावरांची किंमत सुमारे २ लाख ७० हजार असून, चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी वाहतूक केल्याची माहिती वाशी पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी तत्काळ कारवाई करत वाहनासह जनावरे ताब्यात घेतली आणि आरोपीविरुद्ध प्राण्यांवर क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिवच्या विकासात राजकारण नको : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्याच्या विकासकामांमध्ये राजकीय स्पर्धा आणि व्यक्तिगत हेवेदावे बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केले आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, तुम्ही निधी आणलात म्हणून आम्ही विरोध करतो आणि आम्ही निधी आणला तर तुम्ही विरोध करता - हा अनावश्यक राजकीय खेळ आता धाराशिवकरांच्या अंगलट येत आहे. या स्पर्धेमुळे गेल्या दोन वर्षांपासून शहरातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि विकासकामांना खीळ बसली आहे.



डॉ. पाटील पुढे म्हणाले, राजकारण करण्यासाठी निवडणुका हे योग्य व्यासपीठ आहे.

मात्र निवडणुका नसताना सर्व लोकप्रतिनिधींचा उद्देश फक्त 'धाराशिवचा विकास' हाच असला पाहिजे. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी सर्व पक्ष, नेते आणि प्रतिनिधींनी एकत्र येऊन निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत.

ते पुढे म्हणाले की, धाराशिव जिल्ह्याची मागास जिल्हा म्हणून असलेली ओळख पुसण्यासाठी एकात्मता आणि सहकार्य गरजेचे आहे.

'मी मोठा की तू मोठा' या स्पर्धे पेक्षा विकासासाठी हातात हात घालून काम करणे हीच काळाची मागणी आहे.

शेवटी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली की, धाराशिवच्या जनतेचा विकास आणि जिल्ह्याची सर्वांगीण प्रगती हा कोणत्याही पक्षाच्या वरचा मुद्दा असावा. या भावनेतूनच सर्वांनी जिल्ह्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी काम करावे.

## वाहनचालकांकडून १,४८,७५० तडजोड शुल्क वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांच्या संयुक्त कारवाईत वाहतूक शिस्तीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कठोर पावले उचलण्यात आली.

या मोहिमेत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकूण १८३ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. सर्वांकडून मिळून १,४८,७५० इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

## दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

काजळा-वाघोली मार्गावर झालेल्या भीषण दुचाकी अपघातात टाकळी ढोकी येथील राजेंद्र दगडु क्षिरसागर (वय ५२) यांचा मृत्यू झाला आहे.

ही घटना दि.२१ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजता घडली. राजेंद्र क्षिरसागर हे मोटारसायकल (क्र. एमएच २५ एएक्स ७५९०) वरून जात असताना, समोरून येणाऱ्या खंडेराव उत्तम बंडगर (रा. टाकळी ढोकी) यांनी आपली दुचाकी (क्र. एमएच २५ एक्स ९०१७) ही निष्काळजीपणे चालवून क्षिरसागर यांच्या दुचाकीला धडक दिली.

या अपघातात क्षिरसागर गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडले.

## प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेअंतर्गत धाराशिव जिल्ह्यात कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

पारंपरिक कारागीर, हस्तकला आणि बारा बलुतेदारांना आर्थिक व तांत्रिक बळकटी देण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजने अंतर्गत धाराशिव येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



ही कार्यशाळा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय (एमएसएमई) विकास कार्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.

कार्यक्रमाला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक महादेव बळे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महादेवी रणदिवे, सहाय्यक संचालक राहुल मिश्रा (एमएसएमई छत्रपती संभाजीनगर) आणि मुंबईचे उद्योजक अशोक चव्हाण उपस्थित होते.

कार्यशाळेत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाशी संबंधित अडचणी, टूलकिट वितरण, तसेच कर्ज प्रस्तावांचे मंजुरी व वाटप याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष संवादातून लाभार्थ्यांच्या शंका दूर करून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक अजयसिंह पाटील, उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी पांडूरंग मोरे, तसेच योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेत सहभागी मान्यवरांनी लाभार्थ्यांना स्वावलंबन आणि व्यवसायवृद्धीसाठी सरकारी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## कळंब पोलीस ठाण्याच्या वतीने वॉक फॉर युनिटी रॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ ऑक्टोबर -**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने दि.३१ ऑक्टोबर २रोजी सकाळी ७ वाजता, पोलीस अधीक्षक धाराशिव रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब पोलीस स्टेशन तर्फे वॉक फॉर युनिटी रॅली आयोजित करण्यात आली.




ही रॅली विद्याभवन हायस्कूल, कळंब येथून सुरू होऊन ढोकी रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहिल्याबाई होळकर चौक, येरमाळा रोड मार्गे पोलीस स्टेशन, कळंब येथे संपन्न झाली.

रॅलीदरम्यान भारत माता की जय!, हम सब एक हैं!, वंदे मातरम! अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, पोलीस निरीक्षक अजित चिंतले, मसपोनि प्रभा पुंडगे, सपोनि हनुमंत कांबळे, सपोनि पंढरीनाथ मगर, स्थानिक गुन्हा शाखेचे गोविंद मोठेगांवकर, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, प्राचार्य डॉ. हनुमंत माने, माधवसिंग राजपूत, मंगेश यादव, बाबू पोळ, रशीद शेख, तसेच समर्थ अॅकॅडमीचे विद्यार्थी, जिजाऊ नगरी शिक्षक कॉलनीतील नागरिक, ४० पुरुष अंमलदार, १० महिला अंमलदार, ज्येष्ठ नागरिक आणि युवकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौकात धाराशिव पोलीस बँड पथकाने सारे जहाँ से अच्छा हिंदुस्तां हमारा या राष्ट्रभक्तीपर धूनचे वादन करून वातावरण देशभक्तीने भारावून टाकले.

राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी ही रॅली उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

## वसंत प्राथमिक आश्रमशाळेकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक दिवसाचे वेतन देणगी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत वसंत प्राथमिक आश्रमशाळा, विद्यानगर (बावी) येथील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सर्व कर्मचारी यांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणगी म्हणून अर्पण केले आहे.

या माध्यमातून शाळेच्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी एकूण रुपये ३३ हजार २५६ रुपये इतकी रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिली. ही देणगी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे अध्यक्ष व वैद्यकीय अधिकारी डॉ. सूरज मोटे यांच्याकडे डिमांड ड्राफ्ट स्वरूपात सुपूर्द करण्यात आली. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, धाराशिव तर्फे या उदार आणि प्रेरणादायी देणगीबद्दल सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.



ही देणगी समाजातील गरजू घटकांसाठी दिलासा ठरणारी असून, वसंत प्राथमिक आश्रमशाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दाखविलेली सामाजिक संवेदनशीलता इतर शैक्षणिक संस्थांसाठी आदर्शवत उदाहरण ठरली आहे.

मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि कर्मचारी वर्ग यांचे या मानवतावादी आणि सामाजिक कार्याबद्दल अभिनंदन करण्यात आले आहे.

## पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिवमध्ये राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑक्टोबर -**

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि पोलादी पुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य निलेश जाधव, कार्यक्रमाधिकारी



दीपक अंकुश आणि शिक्षक निलेश साखरे उपस्थित होते.

आपल्या भाषणात उपप्राचार्य निलेश जाधव यांनी सरदार पटेल यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक जीवनात केलेला संघर्ष आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या धैर्य, देशाभिमान आणि एकतेच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी एक भारत, श्रेष्ठ भारत या घोषणांनी देशभक्तीचे वातावरण निर्माण केले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३१ ऑक्टोबर -**
वाढवणा (बु.) येथील श्री. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल संघाने धाराशिव येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

१९ वर्ष वयोगटातील या संघाने क्रीडा विभाग प्रमुख प्रा. रहिम पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट खेळ करून धाराशिव संघावर अतितटीचा विजय मिळवला. संघात पटेल सरफरोज, रेहान बागवान, समीर पठाण, आयान पठाण, आदर्श जाधव, स्वप्नील शिंदे, सुजल रामटेके, इमरान शेख, आलम उंदरे, श्रीराम उंबरकार, अंकुश सोनोने आदी खेळाडूंचा समावेश आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी क्रीडा राज्यमंत्री आ. संजय बनसोडे, सचिव चंदन पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी माधव कसगावडे, श्रीकांत हरनाळे, चंद्रकांत लोदगेकर, प्राचार्य मुंजेवार युसूफ, मुख्याध्यापक शरद आमगे, तसेच प्रा. रामदास केदार, प्रा. रहिम पठाण, प्रा. दत्तात्रय मुधाळे, प्रा. महादेव इंद्राळे, प्रा. अनिल मगर, प्रा. मनोज मुळे, प्रा. विष्णू केंद्रे, प्रशिक्षक आजीम शेख, शखिल शेख, अमजद पठाण आदींनी खेळाडूंचा सत्कार करून अभिनंदन केले.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### किलबिलच्या मैथिली राठोडची राज्यस्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**अहमदपूर, दि.३१ ऑक्टोबर -**
जिल्हा क्रीडा कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच झालेल्या शालेय विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत किलबिल नॅशनल स्कूलच्या मैथिली राठोड हिने उल्लेखनीय कामगिरी करत १७ वर्षांखालील वयोगटात राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. मैथिलीच्या या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक कासिम शेख, मोसिन शेख, दत्तात्रय गिरी, विशाल सरवदे आणि निलेश बन यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे, तसेच तिचे पालक दयानंद राठोड यांनी मैथिलीचा यथोचित सत्कार करून सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### वलांडीत अखंड हरिनाम सप्ताहाचा सांगता सोहळा

**वलांडी, दि.३१ ऑक्टोबर -**
देवणी तालुक्यातील वलांडी येथील श्रीराम मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, अन्नकुट महोत्सव आणि संत तुकाराम महाराज चरित्र कथा यांचे आयोजन करण्यात आले होते. आज, शुक्रवार दि.३१ ऑक्टोबर रोजी या सप्ताहाचा सांगता सोहळा समाज प्रबोधनकार हभप. सोपान महाराज कनेरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी श्रीराम मंदिरात अन्नकुटाची महाआरती संपन्न होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सप्ताहाच्या सात दिवस चाललेल्या धार्मिक कार्यक्रमात संत तुकाराम महाराज चरित्र कथा संपन्न झाली. या कालावधीत हभप. अमोल महाराज, गुरुवर्य संजय महाराज खडक उमरगेकर, हभप. भूषण महाराज, हभप. विठ्ठल महाराज वासकर, हभप. जनक महाराज अपसिंगेकर आणि हभप. हरिहर महाराज दिवेगावकर यांनी कीर्तन सेवा केली.



### लातूरच्या तलवारबाजांची राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्ण झळाळी!

**अहमदपूर, दि.३१ ऑक्टोबर -**
नागपूर येथे पार पडलेल्या ३६व्या वरिष्ठ गट राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत लातूरच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकांची लयलूट केली. मुलींच्या इप्पी प्रकारात माही अरदवाड (सुवर्ण), जान्हवी जाधव (रौप्य), ज्ञानेश्वरी शिंदे आणि रोहिणी पाटील (कांस्य) यांनी पदकांची कमाई केली. विशेष म्हणजे, राष्ट्रीय इप्पी संघासाठी निवड झालेल्या सर्व चार खेळाडू अहमदपूर तालुक्यातील असून ही ऐतिहासिक कामगिरी ठरली. मुलांच्या सांघिक स्पर्धेत सुरज कदम, विशाल चापटे, भाऊराव कदम आणि साईप्रसाद जंगवाड यांच्या संघाने सुवर्णपदक पटकावले. लातूर जिल्ह्याने मुलगा आणि मुली या दोन्ही गटात तृतीय क्रमांक मिळवत दुहेरी चॅम्पियनशिप आपल्या नावे केली. या यशात प्रा. दत्ता गलाले, वजीरोदीन काजी, मोसिन शेख, रोहित गलाले आणि आकाश बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंचे गणपतराव माने, अभिजीत मोरे, प्रशांत माने, संतोष कदम, वैभव कज्जेवाड, मेहफूजखान पठाण आदींनी अभिनंदन केले.

### शकुंतला उमाटे यांचे निधन

**वलांडी, दि.३१ ऑक्टोबर -**
देवती तालुक्यातील अनंतवाडी येथील रहिवासी



शकुंतला शिवाजीराव उमाटे (वय ७७) यांचे गुरुवारी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्या इतिहास संशोधक भाऊसाहेब उमाटे व पत्रकार बाबासाहेब उमाटे यांच्या मातोश्री होत.

### वधू-वर मेळावा २१ डिसेंबर रोजी लातूरमध्ये

**वलांडी, दि.३१ ऑक्टोबर -**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वांगिण विकास मंडळाच्या वतीने २० वा राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा रविवार, २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विष्णुदास मंगल कार्यालय, अहिल्यादेवी होळकर चौक, लातूर येथे होणार आहे. इच्छुकांनी वधू-वरांचा बायोडाटा व पासपोर्ट फोटोसह माहिती १० डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष, पोस्ट, कुरिअर किंवा ईमेलद्वारे (mgmandurkegmail.com) पाठवावी. व्हॉट्सॲपवर माहिती स्वीकारली जाणार नाही.

# आगामी निवडणुकांत गद्दारी खपवून घेतली जाणार नाही



### काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके सज्जड इशारा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१, ऑक्टोबर -**
विधानसभा निवडणुकीत काहींनी न कळत तर काहींनी ठरवून गद्दारी केली होती. त्यांना आम्ही माफ केले. मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका या आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या आहेत. त्यांच्या घामाच्या कष्टाने उभ्या राहणाऱ्या या निवडणुकांमध्ये आम्ही जीव ओतून काम करू. त्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी रक्ताचे पाणी करू; पण जर पुन्हा कोणी गद्दारीचा प्रयत्न केला तर ती खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी दिला.

शुक्रवार (दि.३१) रोजी निलंगा येथील वृद्धावन मंगल कार्यालयात आयोजित पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख, प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, कल्याण पाटील, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन मानकरी, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, माजी जि.प. उपाध्यक्षा जयश्री पाटील, माजी जि.प. उपाध्यक्ष भगवानराव पाटील तळेगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना साळुंके म्हणाले, निलंगा विधानसभेचे आमदार विकासाच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार करीत आहेत. एकाच रस्त्यावर वारंवार काम करून बील लाटण्याचे प्रकार सुरू आहेत. काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना ग्रामपंचायतींमध्ये काम करताना अडचणी निर्माण करण्यात येतात. या अडचणी दूर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काँग्रेसचा झेंडा फडकावणे अत्यावश्यक आहे. त्यांनी पुढे विश्वास व्यक्त केला की तिन्ही तालुक्यांमध्ये काँग्रेस पक्ष झेंडा रोवेल आणि सत्तेवर परत येईल.

या मेळाव्यात प्रा. रमेश मदरसे, विठ्ठल पाटील, मिथुन दिवे, बालाजी गोमसाळे, गंगाधर चव्हाण, किरण पाटील, प्रमोद मरुरे, हाजी सराफ, बबलू जाधव, सुतेज माने, बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. प्रविण सोळुंके, ॲड. तिरुपती शिंदे, ॲड. संदीप मोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

#### स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काँग्रेसचा झेंडा फडकणार : खा. काळगे

राज्य आणि केंद्र सरकारच्या फसव्या आश्वासनाला येथील जनता कंठाळून गेली असून शेतकरी, शेतमजूर व तरुण बेरोजगारांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भाजप सरकारला जनता अद्दल घडविणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत सर्वच पातळीवर काँग्रेसचा झेंडा फडकणार असा विश्वास खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी व्यक्त केला.

#### गद्दारांना पक्षात थारा नाही : बाळासाहेब देशमुख

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पक्षातील गद्दारांचा शोध घेण्याच्या सूचना पक्षाला दिल्या असून पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना पक्षात उमेदवारी तर सोडा साधा थारा मिळणार नाही अशी स्पष्ट भूमिका जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख यांनी जाहीर करत शिफारशीवर उमेदवारी मिळणार नाही तर विजयी मिरीटवर उमेदवारी दिली जाणार असल्याचे जाहीर केले. तसेच जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या कामाचे कौतुक करत देशातील टॉप टेन जिल्हाध्यक्षामध्ये अभय साळुंके यांची गगणा होत असल्याचे त्यांनी देशमुख यांनी सांगितले.

## कलकोटी ग्रामपंचायतीतील मनरेगा भ्रष्टाचार प्रकरणी ग्रामस्थांचे उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.३१, ऑक्टोबर -**
चाकूर तालुक्यातील कलकोटी ग्राम पंचायतीत मनरेगा योजनेअंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोर मागील तीन दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. शुक्रवारी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या भावना जाणून घेतल्या.

ग्रामस्थांनी मंत्र्यांसमोर स्पष्ट भूमिका घेत जोपर्यंत दोषींवर कडक कारवाई होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा ठाम आणि आक्रमक पवित्रा घेतला.या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी ना. पाटील यांनी चाकूरचे गटविकास अधिकारी यांच्याकडून सविस्तर माहिती मागवली. त्यांनी तत्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. तपास अधिकारी तथा लातूरचे गटविकास अधिकारी शाम गोडभरले यांना चौकशी अहवाल लवकरात लवकर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनाही तात्काळ कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी दिले.ग्रामस्थांच्या या आंदोलनामुळे कलकोटी ग्रामपंचायतीतील मनरेगा भ्रष्टाचार प्रकरणाने आता जिल्हा प्रशासनाचे तसेच राज्यस्तरीय लक्ष वेधून घेतले आहे.

## देवणी शहरात लांडग्याचा हल्ला; सहाजण जखमी



### दोघांची प्रकृती चिंताजनक

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.३१, ऑक्टोबर -**
देवणी शहरातील पंचायत समिती परिसरात आज (शुक्रवार) दुपारी सुमारे तीन वाजताच्या सुमारास एका पिसाळलेल्या लांडग्याने अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात पाच ते सहा जण गंभीररित्या जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांना उपचारासाठी उदगीर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

हल्ला इतका वेगाने झाला की नागरिकांना तो लांडगा होता की चित्ता, हे समजण्यासही वेळ मिळाला नाही. क्षणार्धात हल्ला करून तो प्राणी पसार झाला, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जखमींमध्ये इनाया इस्माईल मल्लेवाले (वय ३ वर्षे), फयजान फिरोज येरोळे (वय ९ वर्षे), युनूस सरदार मिर्झा (वय ५५ वर्षे), चन्नय्या अप्पा भद्रशेट्टे (वय ५५ वर्षे) आणि गोविंदा माणिकराव मेहत्रे (वय ३८ वर्षे) यांचा समावेश आहे. त्यापैकी युनूस मिर्झा व चन्नय्या भद्रशेट्टे यांची प्रकृती गंभीर आहे. घटनेची



माहिती मिळाल्यानंतर स्थानिक नागरिकांनी वनविभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु अधिकाऱ्यांचा संपर्क होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. तालुक्याच्या ठिकाणी वनअधिकाऱ्यांचे कायमस्वरूपी कार्यालय नसणे ही देखील स्थानिक पातळीवरील गंभीर समस्या असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ही देवणी तालुक्यातील अशा प्रकारची पहिली घटना असून, वनविभागाने तातडीने तपास आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

#### ▶▶ फॉरेस्ट अधिकारी 'नॉट रिचेबल'...

घटनेनंतर नागरिकांनी तात्काळ वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित फॉरेस्ट अधिकाऱ्यांचा मोबाईल 'नॉट रिचेबल' असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला.

## महायुतीत पीपल्स रिपब्लिकन पार्टीला योग्य प्रतिनिधित्व मिळेल : प्रा. कवाडे



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३१, ऑक्टोबर -**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या शिवसेनेकडून पीपल्स रिपब्लिकन पार्टीला अपेक्षित प्रतिनिधित्व मिळेल, असा विश्वास पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी गुरुवारी लातूर येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

प्रा. कवाडे म्हणाले की, आमच्या पक्षाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी युती केली असून, राज्यातील महायुतीच्या यशात आमचे मोलाचे योगदान आहे. सध्या आम्ही शिवसेनेच्या नेत्यांशी संपर्कात आहोत आणि स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळेल, अशी अपेक्षा आहे. मात्र, जर अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, तर भविष्यात वेगळा विचार करावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, शिक्षणाचे व्यापारीकरण सामान्य विद्यार्थ्यांसाठी घातक आहे. त्यामुळे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत व्यापारीकरणाच्या मार्गावर जाऊ नये. अट्रॉसिटी कायदा हा संरक्षणासाठी आहे, त्यासाठी जलदगती न्यायालयांची स्थापना करावी. फुले-शाहू-आंबेडकरांच्या राज्यातच बौद्ध व अनुसूचित जातींवरील खोटे गुन्हे नोंदवले जात आहेत, ही बाब खेदजनक आहे.

देशभर समान शिक्षण पद्धती लागू करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच मागासवर्गीयांच्या विकासासाठी असणारा समाजकल्याण विभागाचा निधी पूर्णपणे खर्च केला जात नाही, त्याची चौकशी करून न वापरलेला निधी पुढील आर्थिक वर्षात समाविष्ट करावा, असेही त्यांनी सांगितले.

कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातही अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना लागू करून ती रक्कम वेळेत विद्यार्थ्यांना देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. भूमिहीन शेतमजुरांना न्याय मिळावा आणि बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावा, अशीही त्यांनी मागणी केली.

या पत्रकार परिषदेस पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राज्य संघटक व लातूर जिल्हाध्यक्ष एन.डी. सोनकांबळे, सुमेध सोनकांबळे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## औसा शहर विकास आराखड्याला गती देण्याची महायुतीची मागणी



**विकासविरोधी प्रवृत्तींचा निषेध, नागरिकांच्या सुविधांना प्राधान्य देण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१, ऑक्टोबर -**
औसा शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास साधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्याला तातडीने मंजुरी द्यावी, अशी ठाम मागणी भारतीय जनता पक्ष व शिवसेना महायुतीतर्फे नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येला अनुरूप रस्ते, वीज, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या या आराखड्यामुळे औसा शहराच्या प्रगतीला नवी दिशा मिळणार असल्याचे निवेदनात नमूद आहे. मात्र, काही विकासविरोधी आणि स्वार्थी प्रवृत्तींकडून या आराखड्याला जाणूनबुजून विरोध केला जात असल्याचा आरोप महायुतीने केला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आमदार अभिमन्यू पवार यांनी विकास आराखड्याच्या मंजुरीसाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला असून, त्यांचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत. तथापि, काही स्थानिक राजकीय नेत्यांनी विकासकामांना अडथळे आणण्याचा प्रयत्न करून नागरिकांच्या हिताला धोका निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महायुतीच्या प्रतिनिधींनी प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता विकास आराखड्याला तात्काळ मंजुरी द्यावी, अशी मागणी केली. वाढीव वस्त्यांतील नागरिकांना रस्ते, वीज व पाणीपुरवठा यांसारख्या आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, असेही निवेदनात नमूद आहे.

या निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष किरण उटगे, प्रा. भीमाशंकर राचट्टे, जयराज कारंजे, बंडू कोद्रे, शिव मुरगे, सुवर्णा नाईक, अक्रम खान, कल्पना डांगे, कंटापा मुळे, माधव परिहार, गोपाळ धानुरे, व्यंकटनाना मोरे, सदानंद शेट्टे, लहू कांबळे आदींच्या स्वाक्षऱ्या असून कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

महायुतीच्या या ठाम भूमिकेमुळे औसा शहरातील विकास आराखड्याच्या मंजुरी प्रक्रियेला नवा वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## औराद शहाजानी बाजार समितीला राज्यातील पहिले हमीभाव केंद्र मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१, ऑक्टोबर -**
कृषी उत्पन्न बाजार समिती, औराद शहाजानी येथे माजी मंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकाळात उल्लेखनीय कामगिरी होत आहे. त्याचाच परिपाक म्हणून महाराष्ट्र शासनाने नुकतेच राज्यभर मंजूर केलेल्या २५ हमीभाव खरेदी केंद्रांमध्ये औराद शहाजानी बाजार समितीचा लातूर विभागात पहिला क्रमांक लागला आहे.




शासनाने यासाठी विविध निकष निश्चित केले होते. सर्व निकषांमध्ये आणि तयारीत औराद बाजार समितीने उत्कृष्ट कामगिरी करून पात्रता सिद्ध केली. या पार्श्वभूमीवर बाजार समितीने सादर केलेला प्रस्ताव महाराष्ट्र कृषी पणन मंडळाकडून मंजूर झाला असून, शासनाकडून अधिकृत मंजुरी पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे.

या खरेदी केंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सोयाबीनचा दर ४२०० रुपयांवरून वाढून ५३२८ रुपये प्रती क्विंटल मिळणार आहे. अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयाचा थेट फायदा होईल.

या केंद्रासाठी बाजार समितीच्या संचालक मंडळाने एकमताने ठराव करून पाठपुरावा केला. केंद्रप्रमुख म्हणून सभापती नरसिंग शामराव बिरादार आणि सचिव सतीश मारुती मरगणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या माल नोंदणीची प्रक्रिया सुरू होणार आहे.

या योजनेच्या मंजुरीसाठी भाजप प्रदेश सचिव अरविंद पाटील यांनी विशेष सहकार्य केले. संपूर्ण शेतकरी वर्गातून निलंगेकर बंधू, बाजार समिती व संचालक मंडळावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### वानवडा फाट्यावर नूतन रोनक सीएनजी स्टेशनचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१, ऑक्टोबर -**
औसा-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील औसा शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या वानवडा फाटा येथे नूतन 'रोनक सीएनजी स्टेशन'चे उद्घाटन गुरुवारी पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे सहअध्यक्ष हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते थाटात पार पडले.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, महानगर गॅसचे मुख्य कार्यकारी अधिकारी यज्ञेश धुरी, विष्णुदासजी अग्रवाल, लातूर-धाराशिव महानगर गॅसचे जी.ए. मुख्य व्यवस्थापक महेश बिलगुडी, प्रोजेक्ट मॅनेजर समीर संकपाळ, अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सीए संजय अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.